# महासागर

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | सोमवार, २३ जून २०२५ | वर्ष: १० | अंक: ५४ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६


## सिंहस्थ कुंभासाठीच्या सर्व रस्त्यांना मंजुरी

**नागपूर, दि. २२ प्रतिनिधी**

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित आज नागपुरात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत काय निर्णय घेण्यात आले याबाबत मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली. "नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये२०२७ मध्ये जो महाकुंभ मेळा आयोजित करण्यात येणार आहे, त्यासाठी रस्त्यांचं नेटवर्क तयार व्हावं या दृष्टीने मी राष्ट्रीय महामार्ग बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले होतें. त्याच अनुषंगाने आज केंद्रीय रस्ते-वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी बैठक घेतली. या बैठकीत आम्ही आठ-नऊ रस्त्यांची मागणी केली होती. ते सर्व रस्ते त्यांनी मंजूर केले आहेत. त्यामध्ये रिंगरोड, त्र्यंबकेश्वरला जाणारा रस्ता आणि सहा बाजूने नाशिकच्या दिशेला रस्ते येतात. त्या सर्व रस्त्यांच्या कामकाजांनादेखील त्यांनी मान्यता दिली आहे", अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नागपूरच्या विविध प्रकल्पांचा आम्ही आढावा घेतला आहे. विशेषत: नाग नदीवरील जायका फंडेड प्रोजेक्ट असेल तिथल्या अंडरग्राउंड वीज वाहिन्यांचा विषय असेल, खासगी बसेससाठी बाहेर वाहनतळचा विषय असेल, अशा अनेक विषयांबाबत निर्णय घेतले आहेत", अशीमाहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

## अग्राग्रलेख — खरीखरी


### तिसऱ्या महायुद्धाच्या वाटेवर...

ट्रम्प नावाच्या एका बावळट माणसाने इराणच्या तीन अणुऊर्जा केंद्रांवर दणादण बॉम्ब टाकले. या ट्रम्पाने टाकलेले बॉम्ब म्हणजेच, तीनही ठिकाणी वापरलेली मिसाईल्स त्याचा इराणवर काहीच परिणाम झाला नाही. असे खुद्द इराणने जाहीर केले आहे. आमच्या अणू कार्यक्रमावर अशा प्रकारचे हल्ले कोणताही प्रभाव टाकू शकणार नाहीत. असेही इराणच्या खोमेनी यांनी जाहीर केलेले आहे. त्यापुढे खोमेनी म्हणतात की, युद्ध तुम्ही सुरू केले. आता आम्ही ते संपवू. भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे पहाटे दोन वाजता अमेरिकेने इराणवर हल्ला केला. त्यानंतर दोन तासातच आपल्या महाभयानक खैबरच्या बरोबरीने तीन डझन मिसाईल इस्रायलवर डागून इस्रायलची अत्यंत भीषण अवस्था करून टाकली आहे. त्यामध्ये इस्रायलची जी हानी झालेली आहे. ती खूप प्रचंड प्रमाणात आहे. आता इराणने जाहीर करून टाकलेले आहे की, ज्या ज्या ठिकाणी अमेरिकेचे सैनिक अड्डे आहेत. त्या त्या ठिकाणी इराण हल्ले करणार आहे. तिकडे अमेरिकेमध्ये अध्यक्षपदावर विराजमान झालेल्या हेकडी स्वभावाच्या ट्रम्प यांच्याविरुद्ध अमेरिकन जनताच रस्त्यावर उतरलेली आहे. अमेरिकन काँग्रेसची मंजुरी न घेता अर्धवट हल्ला करून ट्रम्पने जो मूर्खपणा केलेला आहे. त्यामुळे आता अमेरिकेला नुकसान भोगावे लागेल. इकडे इराणच्या समर्थनार्थ रशिया, चीन आणि उत्तर कोरिया उघडपणे समोर आलेले आहेत. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, बहरीन वगैरे सारख्या सातआठ ठिकाणी अमेरिकेचे सैनिकी तळ आहेत. हे सैनिकी तळ किंवा अमेरिकेचे अड्डे इराणला उध्वस्त करणे सहज शक्य आहे. त्याची प्रचिती इस्रायलवरवर हल्ला करून इराणने दाखवून दिलेली आहे. केवळ इस्रायलची राजधानीच नाही. तर इतर १४ शहरांवर केलेल्या इराणच्या हल्ल्यांमुळे इस्त्रायलचे जबरदस्त नुकसान झालेले दिसत आहे. इराक जवळ घातक रासायनिक बॉम्ब आहेत. असे यापूर्वी अमेरिकेने घोषित करून टाकले होते. त्यासाठी काही वर्षांपूर्वी अमेरिकेने इराकवर सुद्धा हल्ला करून सद्दाम हुसेन यांना ठार मारले होते. पण त्यानंतर इराककडे अशी घातक शस्त्रे नाहीत. असे सार्वजनिकरित्या अमेरिकेला सांगावे लागले. अगदी तसाच प्रकार अमेरिकेच्या या बिनडोक अध्यक्षांनी म्हणजेच ट्रम्पाने इराणबाबत करून दाखवलेला आहे. इराण हे इराकपेक्षा कितीतरी पटीने मोठे आणि समृद्धीसंपन्न राष्ट्र आहे. त्यामुळे त्यावेळी अमेरिकेच्या दादागिरी विरुद्ध कोणताही देश समोर येऊन बोलत नव्हता. मात्र आता तशी स्थिती किंवा परिस्थिती अजिबात नाही. अत्यंत भांडकुदळ इस्रायलने आतापर्यंत कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याची तमा बाळगली नव्हती. गाझातील नागरिकांना अन्नधान्यही मिळू नये. म्हणून युद्धखोर नेत्यान्याहूचा राक्षसीपणा तसाच चालू होता. आता इराणने हल्ला केल्यावरती इस्रायलला आंतरराष्ट्रीय कायदे आठवत आहेत. इराणकडून अमेरिकेचे काय वाकडे होईल. हे बहुधा ट्रम्पला ठाऊक असेल. पण इराणचे असेच जबरदस्त बॉम्ब हल्ले सुरू राहिले. तर आत्तापर्यंत फुकटची दादागिरी करणाऱ्या इस्रायलचे काय होणार, याचे उत्तर बहुधा ट्रम्पालाही ठाऊक नसेल. दुसऱ्या जागतिक महायुद्धात जर्मनी, इटली आणि जपान यांच्याविरुद्ध संपूर्ण जग होते. यावेळी मात्र अमेरिकेच्या भैताडपणामुळे हे जग विभागले जाणार आहे. मुख्य मुद्दा असा की खुद्द अमेरिकेतच ट्रम्प यांच्या मूर्खपणाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी अमेरिकेतील जनताच निदर्शन करीत आहे. एकूण परिस्थिती पाहता अमेरिकेने तिसऱ्या महायुद्धाची नांदी घोषित करून टाकली आहे काय, असाच प्रश्न जगातील शांतता प्रेमींना पडला असेल. आता इराणने अमेरिकेवर किंवा त्यांच्या अड्ड्यांवर कोणताही प्रहार न करता केवळ इस्रायलवरच धडाधड मिसाइलबाजी सुरू केलेली आहे. ती जर अशीच सुरू राहिली. तर पुढील दोन-चार दिवसात इस्रायलला केवळ दगड-धोंड्याचा प्रदेश म्हणून स्वतःकडे बघावे लागेल. नेत्यानाहूने कितीही आव आणला. तरी इराण त्याला भाव देईल असे अजिबात वाटत नाही. तिकडे ताव खाऊन अमेरिकेने १४ दिवसाचा अल्टिमेटम देऊनही दोन-तीन दिवसातच जो हल्ला केलेला आहे. त्याचा बदला घेण्यासाठी इराणला घाई नाही. पण अमेरिकेने पुन्हा हल्ला केला तर मात्र जागतिक युद्धाला तोंड फुटेल. भविष्यात कोणकोण भस्मसात होईल आणि काय काय विनाशाची लक्षणे दिसू लागतील. याची कल्पना करणेही कठीण आहे. या वेडपट ट्रम्पने युद्धात जम्प तर मारली. पण इराणच्या बम्पमुळे त्याचाच पाय फ्रॅक्चर झालेला आहे. हे त्या लंगड्याला कोण सांगणार. विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे भारतात आपण म्हणूया. जय जगत !


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023



# अमेरिकेची युद्धात उडी

## अणुऊर्जा केंद्रांवरील हल्ल्यामुळे रेडिएशनचा धोका





**अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने पुन्हा इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली**



**तेल अविव, दि. २२ वत्तसंस्था**

अमेरिकेने शनिवारी रात्री इराणच्या तीन अणू प्रकल्पांवर हवाई हल्ले केले. अमेरिकन वायू दलाने फोर्डो, नतान्झ व इस्फहानमधील तीन अणू प्रकल्पांवर बॉम्बवर्षाव करत अचूक लक्ष्यभेद केल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. या घटनेवर इराणने पहिली प्रतिक्रिया दिली आहे. इराणने म्हटलं आहे की "अमेरिकेच्या हल्ल्यात इराणच्या अणू प्रकल्पांचं कुठल्याही प्रकारचं नुकसान झालेलं नसून सर्व अणू संशोधन केंद्र सुरक्षित आहेत". दरम्यान, या हल्ल्यामुळे अणू प्रकल्पांमधून रेडिएशन लीक होऊन मोठी दुर्घटना होण्याची शक्यता वर्तवली जात होती. ही शक्यता देखील इराणने फेटाळली आहे. कोणत्याही प्रकारच्या रेडिएशन लीकची शक्यता इराणने फेटाळली आहे.

इराणची अणुऊर्जा संशोधन संस्था एईओआयने अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर देशातील प्रमुख आण्विक केंद्रातून रेडिएशन लीकचा धोका नाकारला आहे. इराणच्या शासकीय वृत्तसंस्थेने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. एईओआयने इराणी जनतेला आश्वस्त केलं आहे की "आमच्या सुरक्षा तपासणीत कोणत्याही प्रकारचं रेडिएशन निदर्शनास आलेलं नाही". दरम्यान, एईओआयने स्पष्ट केलं आहे की "अशा हल्ल्यानंतरही आपल्या देशाचा अणुकार्यक्रम थांबणार नाही".

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने पुन्हा इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला करून प्रत्युत्तर दिले. तेल अवीवसह अनेक भागात इराणने ३० क्षेपणास्त्र डागली. इराणकडून करण्यात आलेल्या हल्ल्यांनंतर इस्त्राईलच्या विविध भागांत सतर्कतेचे सायरन वाजवण्यात आल्याची माहिती इस्रायलच्या संरक्षण दलाने दिली.

आयडीएफच्या प्रवक्त्याने इस्रायलच्या नागरिकांना होम फ्रंट कमांडच्या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. सध्या इस्रायलचे हवाई दल संभाव्य धोके रोखण्यासाठी आणि देशाच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती कारवाई करत आहे. इराणने इस्रायलच्या दिशेने क्षेपणास्त्रे डागली असल्याचे इस्रायली लष्कराने म्हटले आहे. तेल अवीव आणि मध्य इस्रायलवर अनेक स्फोट झाल्याचे वृत्त आहे. लष्कराने सांगितले की, क्षेपणास्त्रांचा मारा इस्रायलच्या दिशेने करण्यात आला आहे. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर देशाच्या विविध भागांमध्ये अनेक ठिकाणी नुकसान झाल्याचे इस्रायली माध्यमांनी म्हटले आहे. दरम्यान, इस्रायलच्या विमानतळ प्राधिकरणाने देशाची हवाई हद्द सर्व उड्डाणांसाठी बंद केली आहे. इजिप्त व जॉर्डनसोबतच्या जमिनीवरील सीमा फक्त खुल्या आहेत. एल अल आणि आर्किया एअरलाइन्सने पुढील सूचना मिळेपर्यंत इस्रायलमधील उड्डाणे स्थगित करत असल्याचे म्हटले आहे. एल अल इस्रायल एअरलाइन्सने आता २७ जूनपर्यंत आपली नियोजित उड्डाणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

### ३७ तास नॉनस्टॉप उड्डाण, अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर्सचा इराणच्या अणुऊर्जा केंद्रावर हल्ला

अमेरिकेच्या मिसूरी येथून निघालेल्या बी-२ बॉम्बर्सनी इराणमधील अणुऊर्जा केंद्रांवर हल्ला केला आणि परत येण्यापूर्वी हवेत अनेक वेळा इंधन भरलं आणि तब्बल ३७ तासांपेक्षा जास्त प्रवास केला. तब्बल २ अब्ज डॉलर्स किमतीचं हे प्रगत विमान मिसूरी एअरबेसपासून इराणमध्ये पोहोचलं, त्या ठिकाणी इराणमधील तीन अणुऊर्जा केंद्रांवर हवाई हल्ला केला आणि त्यानंतर पुन्हा अमेरिकेत परतंल. या संपूर्ण प्रवासात अंदाजे ११,४०० किलोमीटर अंतर या विमानाने कापलं. या कारवाई दरम्यान फोर्डोवरील हल्ल्यात सहा बंकर-बस्टर बॉम्ब वापरण्यात आले, तर ३० टॉमहॉक क्षेपणास्त्रांनी इतर दोन अणुस्थळांना लक्ष्य केल्याचं सांगितलं जात आहे. रविवारी पहाटे अमेरिकेने एक मोठं पाऊल उचललं आणि बी-२ स्टेल्थ बॉम्बर्स आणि बंकर-बस्टर बॉम्बचा वापर करून इराणमधील अणुऊर्जा केंद्रांवर मोठा हवाई हल्ला केला. हल्ल्यानंतर लगेचच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याची माहिती दिली.

### संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक बोलावण्याची मागणी

अमेरिकेच्या हल्ल्यांबद्दल इराणने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. इराणच्या संयुक्त राष्ट्रातील राजदूतांनी अमेरिकेचे इराणविरुद्धचे घृणास्पद हल्ले आणि बेकायदेशीर बळाचा वापर, असे वर्णन केले आहे. तसेच सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक बोलावण्याची मागणी केली आहे.

### "अमेरिकेचा निषेध करा", इराणचे आंतरराष्ट्रीय समुदायाला आवाहन

एईओआयने या म्हटलं आहे की "देशातील अणुऊर्जा प्रकल्पांवर झालेले हल्ले हे आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन आहे. मात्र, आपणही स्वस्थ बसणार नाही. आपल्या राष्ट्रीय हितांच्या रक्षणासाठी कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, इराणने आंतरराष्ट्रीय समुदायाला या हल्ल्यांचा निषेध करण्याचं व शांततापूर्ण अणुविकासाच्या इराणच्या अधिकाराला पाठिंबा देण्याचं आवाहन केलं आहे.

## पहलगाममध्ये दहशतवाद्यांना मदत करणारे दोघे अटकेत

**श्रीनगर, दि. २२ वृत्तसंस्था**

दोन महिन्यांपूर्वी २२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरमधील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भीषण हल्ला केला होता. या हल्ल्यावेळी दहशतवाद्यांनी पर्यटकांची धार्मिक ओळख पटवून त्यांची हत्या केली होती. या हल्ल्यात एकूण २६ पर्यटक मारले गेले होते. त्यानंतर भारतीय सैन्यदलांनी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्ड्यांना लक्ष्य केले होते. मात्र पहलगाममध्ये हल्ला करणारे चार दहशतवादी मात्र सुरक्षा दलांच्या हाती लागलेले नाहीत. त्यामुळे सुरक्षा दलांसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. अशा परिस्थितीत या प्रकरणाचा तपास करत असलेल्या एनआयएच्या हाती मोठं यश लागलं असून, पहलगाम हल्ल्याप्रकरणी एनआयएने रविवारी दोन जणांना अटक केली आहे. या दोघांनी दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आणि हल्ल्यापूर्वी त्यांना मदत केल्याचा आरोप आहे.

अटक करण्यात आलेले दोघेही काश्मिरी असून, त्यांची ओळख पहलगाममधील बटकोट येथील रहिवासी परवेझ अहमद जोथर आणि हिल पार्क येथील रहिवासी बशीर अहमद जोथर अशी पटली आहे. परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर यांनी पहलगाममधील हिल पार्क येथे असलेल्या झोपडीमध्ये लष्कर ए तोयबाच्या तीन दहशतवाद्यांना जाणीवपूर्वक आश्रय दिला होता, असे असे या हल्ल्याचा तपास करत असलेल्या एनआयच्या तपासामधून समोर आहे होते. या दोघांनीही दहशतवाद्यांना जेवण, आश्रय आणि रसद पुरवली होती. एवढंच नाही तर सुरक्षा दलांची दिशाभूल करण्यासाठी त्यांची ओळखही लपवली होती.

## अमेरिकेच्या हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींना इराणच्या राष्ट्राध्यक्षांचा फोन

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे इराणच्या अणु प्रकल्पांवरील हल्ले आणि मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी फोनवरून संवाद साधला. पंतप्रधानांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर याबाबत माहिती दिली आहे. पंतप्रधानांनी म्हटले आहे की, इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी झालेल्या संभाषणादरम्यान त्यांनी सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली आणि परिस्थिती बिघडत चालल्याबद्दल चिंता व्यक्त केली.



याबाबत एक्सवरील पोस्टमध्ये माहिती देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, यावेळी त्यांनी तणाव कमी करण्याचा, संवाद आणि राजनयिकतेद्वारे समस्या सोडवण्याचा आपला संकल्प पुन्हा एकदा व्यक्त केला. याचबरोबर प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थिरता प्रस्थापित करण्यावर भर दिला.

अमेरिकेने इराणच्या अणु प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, इराणचे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांनी पंतप्रधान मोदींना फोन केला होता. त्यांनी पंतप्रधान मोदींना परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. हा फोन ४५ मिनिटे चालला.

## डॉ. दीपक सावंत यांना मंत्रिपदाचा दर्जा

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**



राज्यातील आदिवासी क्षेत्रातील कुपोषण, माता व बालकांचा मृत्यू दर कमी करण्यासाठी तसेच विविध संसर्गजन्य रोग नियंत्रणासाठी शासनाच्या माध्यमातून एक कृती दल (टास्कफोर्स) तयार करण्यात आला आहे. या कृती दलचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांना शासनाकडून मंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

माता व बालके यांचा सर्वांगिण विकास हे शासनाचे प्रथम उद्दिष्ट असून ते साध्य करण्यासाठी कृती दल कार्यरत असणार आहे. या विषयासंदर्भात वेळोवेळी आढावा घेवून उपाययोजना सुचवून नाविण्यपूर्ण संकल्पना डॉ. सावंत यांच्या माध्यमातून पुढे येतील. आरोग्य खात्यातील अभ्यासपूर्ण कामाचा आढावा घेता त्यांना सोपविण्यात आलेली जबाबदारी ते उत्कृष्टरित्या पार पाडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील माता व बालके यांची आरोग्यविषयक काळजी घेत शासनामार्फत विविध योजना व उपक्रम राबविले जात आहेत. या योजना, उपक्रमांविषयी आदिवासी भागात जनजागृजी करण्यासाठी शासन कार्यरत आहे. कृती दलच्या माध्यमातून प्रभावीपणे यासंदर्भात काम केले जाणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कृती दल नियोजनबद्ध व प्रभावी कार्य करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## भाजपमध्ये आज ९०% लोक हे बाहेरचे - एकनाथ खडसे

**सोलापूर, दि. २२ प्रतिनिधी**

पूर्वीची भाजप ही भ्रष्टाचारमुक्त आणि गुन्हेगारमुक्त अशा चौकटीतील होती, अगदी एकनाथ खडसेंवर भ्रष्टाचाराचा आरोप झाल्यानंतर तातडीने मंत्रीपदाचा राजीनामा घेतला होता. मात्र, आता जेलमध्ये जाऊन आलेले किंवा ईडी चौकशीत अडकलेले लोक पक्षात घेतले जात आहेत. अगदी दाऊदचा हस्तक असलेला सलीम कुत्तासोबत नाचणाऱ्या सुधाकर बडगुजरला देखील भाजपमध्ये घेतले हे अति झाले, अशा शब्दात राष्ट्रवादीचे आमदार आणि पूर्वाश्रमीचे भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी भाजप नेतृत्वावर खरमरीत टीका केलीय. भाजपमध्ये आज ९०% लोक हे बाहेरचे असून विविध आरोप झालेले असल्याची टीका स्वतः एकनाथ खडसे यांनी केली. दरम्यान, खडसे यांनी केलेल्या टीकेवरुन मंत्री गिरीश महाजन यांनीही तिखट पलटवार केला आहे. ते राष्ट्रीय नेते आहेत, मी लहान कार्यकर्ता असल्याचे महाजन यांनी म्हटले.

पंढरपूरमध्ये विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी एकनाथ खडसे आले होते, तेव्हा त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ज्या भ्रष्ट नेत्यांच्या विरोधात मी विरोधी पक्ष नेता असताना टीका केली होती, ते आज पक्षात असून ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केले होते, तेही आज यांच्यासोबत आहेत, असा टोला एकनाथ खडसेंनी मुख्यमंत्र्यांना लगावला. विशेष म्हणजे आजच त्यांच्या सुनबाई आणि केंद्रीय क्रीडा मंत्री रक्षा खडसे यादेखील पंढरपूरमध्ये आल्या होत्या. त्या पंढरपुरातून गेल्यानंतर दुपारी एकनाथ खडसे हेही पंढरपूरमध्ये आले. यावेळी बोलताना, भाजप हा विषय माझ्यासाठी पूर्णपणे संपला असून मी अंधारात असताना मला साथ देणाऱ्या शरद पवार यांच्यासोबतच मी असणार असल्याचा पुनरुच्चार खडसे यांनी केला.

भाजपच्या या अवस्थेला राज्याचे नेतृत्व जबाबदार आहेत का असे विचारले असता खडसेंनी मात्र देवेंद्र फडणवीस यांना क्लीन चीट देत यासाठी त्यांना एकट्याला दोष देणे चुकीचे असल्याचे म्हटले. प्रक्रियेत असणारे सर्व आणि पक्षात प्रवेश देणारे संघटनेचे नेते यास जबाबदार असल्याचे खडसेंनी म्हटले. मी भाजपमध्ये असताना गिरीश महाजन माझा सामान्य कार्यकर्ता होता, मी मंत्री असताना त्याला मंत्रिमंडळात स्थान नव्हते. मी गेल्यावर तो कार्यकर्त्याचा मंत्री झाला, असे म्हणत गिरीश महाजन यांच्यावरही खडसेंनी टीका केली.

### महाजनांचा खडसेंवर पलटवार

सुधाकर बडगुजरचा प्रवेश घेतल्यावर एकनाथ खडसे म्हणाले त्यापेक्षा मी वाईट नाही, मला का घेत नाहीत. खडसे पक्षात येण्यासाठी किती उत्सुक आहेत हे दिसतं, असा पलटवार मंत्री गिरीश महाजन यांनी केला. तसेच, मी लहान कार्यकर्ता आहे, ते दिल्लीत बोलले, त्यांचे कनेक्शन दिल्लीत आहे. मी त्यांच्याबद्दल काही टिपणी करणार नाही, कारण ते राष्ट्रीय नेते आहेत. दिल्लीत त्यांनी भाजपचा दुपट्टा गळयात टाकल्याचे त्यांनी सांगितले होते. पण, त्याचे फोटो समोर येत नसल्याचा टोलाही महाजन यांनी लगावला.

## पालख्यांमुळे रस्ता जाम होतो; आम्ही १० मिनिटे रस्त्यावर नमाज पठण केल्यावर आमच्यावर कारवाया होतात - अबू आझमी

**सोलापूर, दि.२२ प्रतिनिधी**

आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे अनेकदा चर्चेत राहिलेले समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आझमी यांनी आणखी एक वादग्रस्त वक्तव्य केले. महाराष्ट्रात ठिकठिकाणांहून वारकऱ्यांच्या पालखी पंढरपूरकडे रवाना झालेल्या असतानाच त्यावरच आझमी यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याने मोठा वाद होण्याची शक्यता आहे.

पालख्यांमुळे रस्ता जाम होतो, हिंदूंचे सण साजरे केले जातात तेव्हा मुस्लिम व्यक्ती विरोध करत नाहीत. मात्र मुस्लिमांनी १० मिनिटे रस्त्यावर नमाज पठण केल्यावर आमच्यावर कारवाया होतात, असे वक्तव्य आझमी यांनी केले आहे.



पालख्यांमुळे रस्ता जाम होतो, रस्त्यावर हिंदूचे अनेक सण साजरे केले. त्यावेळी कोणताही मुस्लिम व्यक्ती हिंदू सणांविरोधात तक्रार करत नाही. तर मग मुस्लिम व्यक्ती दहा मिनिटासाठी रस्त्यावर नमाज पठण केल्यावर तक्रारी का केल्या जात आहेत. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तर रस्त्यावर नमाज पठण करणाऱ्याचा पासपोर्ट रद्द करू अशी धमकी दिली आहे, असेही आ. आझमी म्हणाले.

दरम्यान, शरद पवार एक मोठे नेते आहेत. शरद पवार यांची ज्यांनी साथ सोडली ते केवळ ईडी आणि इन्कम टॅक्स यांच्यामुळे सोडली आहे, असेही ते म्हणाले.

### राज ठाकरेंची ताकद नाही

राज उद्धव एकत्र आले तर शिवसेनेची ताकद कमी होऊ शकते. दोघा भावांची ताकद आणि दोघांमधली दिवार ह्या वेगवेगळया गोष्टी आहेत. एकाच घरात जन्माला आले आहेत, त्यांनी एकसाथ राहावे. त्यात आम्हालाही आनंद आहे. राज ठाकरेंची काही ताकद नाही ते फक्त द्वेषाचे राजकारण करतात. दररोज हिंदी किंवा उत्तर भारतीयांविरोधात बोलणे हेच राज ठाकरेंचे काम आहे, असेही आझमी म्हणाले.

## ...तर नाराजी घ्यायची ताकद ठेवावी लागते - शरद पवार

**पुणे, दि. २२ प्रतिनिधी**

नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, सहकारी संस्था या सगळ्या ठिकाणी महिलांना आरक्षण दिले. लोकांना सुरुवातीला पटलं नव्हतं, पण शेवटी लोकांनी ते मान्य केलं. कोणतेही बदल हिताचे करायचे असतात, नाराजी असते, पण समाजाचं हित असेल, तर ती नाराजी घ्यायची ताकद ठेवावी लागते. लोकांची मानसिकता बदलली असं सांगता येणार नाही. स्त्री आणि पुरुष कर्तृत्वाच्या बाबतीत कुठेही कमतरता नाही. कर्तृत्वाचा मक्ता फक्त पुरुषाकडे असतो, ही गोष्ट विसरायला पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी सांगितले.



यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने महिला धोरणाची त्रिदशकपूर्तीनिमित्त रविवारी यशस्विनी सन्मान सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी शरद पवार बोलत होते. शरद पवार म्हणाले, महिलांसंदर्भात देशातील पहिलं धोरण हे महाराष्ट्रात तयार केलं गेलं. पण निर्णय घेताना अनेक वेळेला कुठे ना कुठेतरी विरोध होत होता. मानसिकता बदलायची आवश्यकता होती. समाजातल्या पुरुषवर्गाची ती मानसिकता त्या काळात बदलली नव्हती. हल्ली सुद्धा तीच मानसिकता आपल्याला दैनंदिन जीवनामध्ये बघायला मिळते. त्यातलं एक एक कलम, तरतूद याच्यासाठी तासन्तास चर्चा करावी लागली. त्याला ज्यांचा विरोध आहे त्यांना समजावून सांगावं लागलं. काही कायद्यात दुरुस्ती करावी लागली. काही लहान प्रश्नांबाबतीतसुद्धा काही पुरुषांची मानसिकता ही बदल स्वीकार करायची नसते. त्यामुळे अशा गोष्टींना विरोध होतो. सुदैवाने महाराष्ट्रामध्ये हा कायदा आपण केला. महिलांना अधिकार दिले ते निव्वळ या कायद्याने प्रॉपर्टीत नाही तर सत्तेमध्ये सुद्धा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांना अधिकार देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात दिला. लोकांची मानसिकता बदलली असं सांगता येणार नाही. स्त्री आणि पुरुष कर्तृत्वाच्या बाबतीत कुठेही कमतरता नाही.


इतर आवृत्त्या : पालघर- ठाणे, नाशिक, नागपूर, अकोला, अमरावती, खामगाव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर महासागर

# रोहा तालुका कुणबी समाज कार्यकारणीची सभा उत्साहात संपन्न

## जातीच्या दाखल्यासाठी गाव निहाय डेटा तयार करण्याचा निर्णय.

**महासागर प्रतिनिधी,**

रोहा: कुणबी समाजोन्नती संघ मुंबई सलग्र ग्रामीण शाखा तालुका रोहा ची कार्यकारणी सभा कुणबी समाज नेते माजी आमदार स्व.पा.रा.सानप कुणबी भवन रोहा येथे शनिवारी 21 जून रोजी तालुका अध्यक्ष रामचंद्र सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली तसेच महाराष्ट्र राज्य उच्चाधिकार समितीचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ कुणबी समाज नेते शंकरराव म्हसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाली.प्रसंगी तालुक्यातील सर्व तालुका कार्यकारणी तसेच विभागीय कार्यकारणीचे सर्व पदाधिकारी बहुसंख्येने यावेळी उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील विशेषतः उत्तर रायगडातील रोहा,सुधागड, पेण, अलिबाग, खालापूर, पनवेल,कर्जत, येथील कुणबी दाखल्याची मोठी समस्या उद्भवत आहे. कुणबी दाखला नसल्याने समाजाला मुलांच्या शैक्षणिक समस्यांसह अनेक सोयी सुविधां पासून वंचित रहावे लागत आहे. यासाठी येथील समाजाने शासन दरबारी अनेकदा निवेदन दिली, अनेक आंदोलने केली मात्र त्यावर आजतागायत कोणतीही कारवाई झालेली नाही.आम्ही जन्माने आणि कर्माने कुणबी आहोत मात्र 1967 चा पुरावा नसल्याने दाखल्यांस अडचणी निर्माण होत असून यावर शासनाकडून उपाय योजना करण्यासाठी संघाच्या मार्फत तसेच रायगड रोहा तालुका कुणबी समाजाच्या वतीने सद्यतिथी दर्शक माहिती संकलित करण्यासाठी सर्व्हेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला. जातीच्या दाखल्याचा महत्वाचा



विषय हाती घेतला असून त्या साठी संपूर्ण गाव निहाय डेटा येत्या काळात तयार करून शासन दरबारी पाठवण्यात येणार आहे. कुणबी दाखल्यासाठी पुन्हा एकदा या समाजाची जोरदार धडपड सुरू झाली असून आम्ही जिद्द सोडणार नाही न्याय मिळाल्याशिवाय गप्प बसणार नाही या भूमिकेवर येथील कुणबी समाज बांधव ठाम आहे. त्यादृष्टीने या दाखल्याचा पाठपुरावा शासन दरबारी करत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी पुन्हा एकदा रोहा तालुका कुणबी सर्वेक्षण २०२५ ला धडाक्यात सुरुवात होत आहे.या सर्वेक्षणासाठी कालबद्ध कार्यक्रम आयोजित सभेत जाहिर करण्यात आला आहे. सदरच्या सभेत सर्वानुमते ठराव करण्यात आला असून यात परिपत्रकाची परिपूर्ण माहिती तसेच अ, ब , क, ड, पत्रक यावर अरुण आगळे सर आणि सतीश भगत यांनी दिली. तर 22 जून 2025 ते 23 जून पर्यंत विभागीय कमिटीने गाव प्रगणकांना सर्वेक्षण परीपत्र उपलब्ध करुन देणे,24 ते 29 जून गाव कमिटीने गाव यादी तयार करणे,30 जून ते 15 जुलै प्रगणकाने प्रत्यक्ष घरोघर फिरून कुटुंब प्रपत्र- अ भरून घेणे.16 ते 21 जुलै गाव प्रगणकाने गाव संकलन प्रपत्र- ब भरून विभागीय कमिटीकडे देणे,22 ते 27 जुलै विभागीय कमिटीने गाव संकलन प्रपत्र- ब वरून विभाग संकलन प्रपत्र- क तयार करणे,28 ते 30 जुलै विभागीय कमिटीने दिलेल्या प्रपत्र -क, वरून तालुका कमिटीने तालुका संकलन प्रपत्र- ड तयार करणे,वरील कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार तालुका कमिटीकडे राहणार आहे.तसेच रोहा तालुक्यातील सर्व कुणबी समाज बांधवाना आपली वस्तूनिष्ठ माहिती आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना म्हणजेच सर्वेक्षण करण्यासाठी येणाऱ्या कुणबी बांधावाला द्यावी असे आवाहन रोहा तालुका कुणबी समाजोन्नती संघ यांचे कडून आयोजित सभेत करण्यात आले. सदरील परिपत्रकात अ मध्ये आपल्या कुटुंबाची कुणबी म्हणून माहिती तर ब मध्ये गाव निहाय घरांची माहिती डेटा भरून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.तसेच यावेळी विभागीय अध्यक्ष यांच्याकडून माहिती घेत त्यांना या परिपत्रकाचं वाटप तालुका अध्यक्ष रामचंद्र सपकाळ ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर तालुका महिला अध्यक्ष दीपिका ताई भगत तसेच प्रमुख उपस्थितीत वाटप करण्यात आले.

# महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती नवनियुक्त राज्याध्यक्ष प्रसाद म्हात्रे सर यांचा भव्य सत्कार

**महासागर प्रतिनिधी,**

रोहा: "त्याग निष्ठा व सेवा" हे ब्रीदवाक्य असणारी "शिक्षक विद्यार्थीयांच्या न्याय हक्कासाठी लढणारी" महाराष्ट्रातील लोकप्रिय शिक्षक संघटना म्हणजे महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती .जी सातत्याने शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यात राज्यात अग्रेसर असते. या संघटनेच्या सर्वोच्च म्हणजेच राज्याध्यक्ष पदी विद्यमान कोकण विभाग अध्यक्ष प्रसाद अनंत म्हात्रे यांची छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्य कार्यकारणीच्या महामंडळ सभेमध्ये एक मुखाने एकमताने निवड करण्यात आली. रायगड जिल्हा संघटनेसाठी ही एक अभिमानाची बाब असल्याने दिनांक २१ जून २०२५ रोजी प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी पेण येथे प्रसाद म्हात्रे सरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशाच्या प्रतिमेचे पूजन व ईशस्तवनाने करण्यात आली. रायगड जिल्हा सरचिटणीस सुरेंद्र मनवे यांनी आपल्या प्रास्ताविक पर मनोगतामध्ये प्रसाद म्हात्रे सरांच्या संघटनात्मक कारकीर्दीचे भरभरून कौतुक केले. जिल्हाध्यक्ष अजय कापसे जिल्हा कार्याध्यक्ष भालचंद्र पाटील, जिल्हा समन्वयक संतोष यादव, पनवेल



तालुकाध्यक्ष व पेण सोसायटी व्हाईस चेअरमन आनंद पाटील, रोहा तालुकाध्यक्ष नारायण गायकर, माणगाव तालुकाध्यक्ष संतोष मालोरे , पेण सरचिटणीस मनोज ठाकूर, पेण सोसायटीचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक मोहन भोईर, रवींद्र पाटील, विठोबा पाटील ,सेवानिवृत्त शिक्षक ज.शं.घरत, पांडुरंग भोपी, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी रा.ना.पाटील, अशा विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि प्रसाद म्हात्रे सरांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हाध्यक्ष अमिता बामणे यांनी राज्याध्यक्षांना शुभेच्छा देताना विद्यार्थिनींचा गणवेश संदर्भात एक प्रश्न देखील त्यांच्यासमोर मांडला. राज्याध्यक्षांनी तो विषय शासन स्तराव मांडणार असल्याचे सर्वांसमक्ष जाहीर केले. जिल्हाध्यक्ष अजय कापसे यांनी सर्वप्रथम एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शिक्षक बंधू-भगिनींना धन्यवाद दिले. श्री.प्रसाद म्हात्रे यांना राज्याध्यक्षपदी नियुक्ती दिल्याबद्दल राज्य कार्यकारणीचे धन्यवाद व्यक्त केले.

# माजी मुख्याध्यापिका अंजली कांबळे यांचा प्रथम स्मृतिदिन संपन्न

**महासागर प्रतिनिधी,**

पेण: पीआरपीचे रायगड जिल्हा अध्यक्ष सिताराम कांबळे यांच्या सुविद्य पत्नी माजी मुख्याध्यापिका तथा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त दिवंगत अंजली सीताराम कांबळे यांचा प्रथम स्मृतिदिन पीआरपी चे संस्थापक अध्यक्ष जोगेंद्र कवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अंजली कांबळे या केवळ शिक्षिका नव्हत्या तर शालेय जीवनात त्या एक उत्कृष्ट खेळाडू म्हणून नावाजलेल्या होत्या. अंजली कांबळे यांना अभिवादन करताना आज अनेकांनी त्यांच्या जीवनातील आठवणी आणि त्यांच्या स्वभाव गुणांना उजाळा दिला. यावेळी बोलताना पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांनी माई म्हणजेच दिवंगत अंजली कांबळे या आपले कुटुंब, आपले शेजारी, शालेय कार्यकाळातील सहकारी आणि सामाजिक संघटनेचे काम करत असताना अष्टपैलू नेतृत्वाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ बालपणापासूनच आपल्यात रुजवून ती कायम ठेवली याची आठवण करून दिली. त्याचप्रमाणे इतर विद्यार्थ्यांपेक्षा प्राथमिक शाळेतील विद्यार्थी घडविण्याचे



जे कठीण काम असते ते त्यांनी केले असून शिक्षकी पेशातून त्यांनी सर्वसमावेशकांना शिस्त लावण्याचे काम अंजली कांबळे यांनी केले आहे.बाबासाहेबांचे तसेच धम्माचे आणि थोर पुरुषांचे विचार प्रत्येकाच्या मनात रुजविण्याचे काम जे माईंनी केले आहे या माईचा वारसा असाच पुढे चालू ठेवा असा मोलाचा सल्ला देखील प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी उपस्थितांना दिला. यावेळी पेणच्या माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, यशवंत वाशीकर, नाना सुर्वे गुरुजी,भीमसेन शिंदे, यशवंत शिंदे सर, भूपेंद्र अजय शेठ शिरसागर उद्योगपती मयूर शेठ वनगे विद्यार्थी संघटना तालुकाध्यक्ष नागेश सुर्वे प्रभाकर घायतळे दिपक सोनावणे चवादकर, सुनिल धामणकर, जी एम पाटील, सुनील साळवी, नंदा म्हात्रे, देवेंद्र कोळी, समीर घायतळे यांसह अंजली कांबळे यांचे कुटुंबीय आणि हितचिंतक तसेच नातेवाईकांनी अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण केली.

# नव्याने बोर्ली -बोरिवली गाडी सुरू ग्रामस्तांनी जल्लोष केला

**महासागर प्रतिनिधी,**

श्रीवर्धन: बोर्लीपंचतन परिसरातील प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता श्रीवर्धन आगारप्रमुख महेबूब मणेर यांच्याकडे गेली तीन चार महिने विजय कांबळे यांच्याकडून सातत्याने मागणी होत होती. परंतू डेपोमध्ये गाड्या उपलब्ध नसल्या कारणाने गाडी व गाडीची वेळ ठरत नव्हती. अखेर दि.(२० )ला परीसरातील मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत नव्या बोर्लीपंचतन बोरीवली गाडीचा दिमाखात शुभारंभ करण्यात आला.त्या प्रसंगी आवर्जून उपस्थित असलेल्या दत्ता खोत यांच्याहस्ते हार अर्पण करून श्री. सुधाकर शिरवटकर यांच्याहस्ते श्रीफळ वाढविण्यात आला. गेली अनेक वर्ष बोरिवलीला जाणारी बाराची एकच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाकडून गाडी सोडली जात होती.मात्र सायन पासून पुढे संपूर्ण उपनगरात श्रीवर्धन म्हसळा तालुक्यातील अनेक परीवार मोठ्या प्रमाणात



वास्तव्य करीत असल्यामुळे बारा वाजता सुटणाऱ्या बोरीवली गाडीवर भार येत होता त्यामुळे अनेक प्रवाशांकडून वारंवार तक्रार होत होती. ती गाडी कायम भरलेली जात असल्याने अनेक प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. बोर्लीपंचतन हून दुपारी।१.३० वा. तर बोरीवली हून पहाटे ४.४५ वा. गाडी सुटेल. दुपारी १.३० मिनिटांनी सुटणाऱ्या या नविन बोर्ली बोरीवली गाडीच्या शुभारंभ प्रसंगी श्रीवर्धन स्थानक प्रमुख शर्वरी लांजेकर , बोर्लीपंचतनच्या माजी सरपंच जोती परकर, अखंड आगरी समाज अध्यक्ष वैभव पाटील, कापोलीचे माजी अध्यक्ष परशुराम पाटील, माजी उपसरपंच प्रकाश तोंडलेकर,प्रदिप हेदुकर,ट्राफिक हप शिंदे आदि परीसरातील मान्यवर उपस्थित

# नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास कटिबद्ध - माजी सभागृहनेते परेश ठाकूर

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: घोटगावाला स्मार्ट सिटी बनवण्यासाठी तसेच परीरातील नागरीकांचे जीवनमान उंचावण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी करत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात नागरीकांचे सर्व प्रश्न मार्गी लावून त्यांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी भाजप काम करेल अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी घोट येथे विविध विकास कामांच्या शुभारंभावेळी केले. दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षनिमित्त विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्याअंतर्गत भाजपचे युवानेते नितेश पाटील यांच्यावतीने घोट गावातील नागरीकांना मोफत छत्री आणि परिसरातील सोसायट्यांना डस्टबिन वाटप कार्यक्रम आयोजित केला



होता. तसेच यावेळी घोट गावाजवळ सुमारे १२ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन, १२ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीमधून साकारण्यात येणाऱ्या कोयनावेळे ते आरटीओ पर्यत्ताच्या रस्त्याच्या डांबीकरणाच्या कामाचे आणि सुमारे ९ कोटी ५ लाख रुपयांच्या निधीमधून बांधण्यात येणाऱ्या स्मशानभूमी भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. या कामांचे शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाले. या वेळी माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, खारघर मंडल अध्यक्ष प्रविण पाटील, पनवेल उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, चिटणीस आशिष कडू, नवनाथ पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, निर्दोष केणी, भाजपा नेते नितेश पाटील, हालोजी निघुकर, बाळकृष्ण पाटील, मोहन पाटील, शिवराम निघुकर, हरिभाऊ पाटील, एकनाथ पाटील, मोहन निघुकर, रमेश पाटील, दिनेश केणी, रविकांत म्हात्रे, नंदुकुमार म्हात्रे, सुरेश पोरजी, मंदार कदम, विनेश कदम, सुनील कदम, जयराम कदम, विजय कदम, गणेश निकोडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल लोकल मार्गावर गेल्या 5 महिन्यात 29 जणांचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: रेल्वेच्या तिन्ही उपनगरीय रेल्वे मार्गावर दरवर्षी होणाऱ्या अपघाती घटनांमधून बळी जाणाऱ्यांची संख्या चिंता करायला लावणारी असते. त्यात नुकतीच ठाणे दरम्यानच्या दिवा-मुंब्रा मार्गावर झालेल्या अपघातात काही प्रवाशांचा बळी जाण्यासह अनेक जण जखमी झाले. या घटनेमुळे रेल्वेतून दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. पनवेल लोहमार्ग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रेल्वे मार्गांवर यंदा जानेवारी ते मे या 5 महिन्यांच्या कालावधीत झालेल्या अपघाती घटनांमधून 29 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर 31 जणांना जखमी व्हावे लागले असल्याची माहिती सुत्रांनी दिली

# शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप




**महासागर प्रतिनिधी,**

सुधागड:सुधागड तालुक्यातील रा. जि. प. शाळा तिवरे येथे जय भवानी ग्रामविकास सामाजिक व सांस्कृतिक मंडळ रासळवाडी यांच्या कडून नुकतेच विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. हे मंडळ मागील १२ वर्षापासुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या कार्यक्रमासाठी सुधागड तालुक्याचे तहसीलदार उत्तम कुंभार, तिवरे माजी सरपंच मनोहर देशमुख यांच्यासह चंद्रकांत जाधव, कृष्णा मोरे, अरुण मोरे, पेडली तलाठी, मंडळ अधिकारी, पोलिस पाटील, यावेळी मुख्याध्यापिका श्रावणी मोरे, शिक्षक रविंद्र आंधळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व ग्रामस्थ तिवरे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका श्रावणी मोरे यांनी मंडळ अध्यक्ष श्रीकांत मोरे, चंद्रकांत जाधव, कृष्णा मोरे, अरुण मोरे, अशोक मोरे, किशोर मोरे, अनिल मोरे, सुनील मोरे, रामदास मोरे, अमृत मोरे, सखाराम मोरे, ज्ञानेश्वर मोरे, भागवत मोरे, अनंत मोरे, राजेश मोरे, रमेश मोरे, शैलेश मोरे, शिरीष मोरे, ऋषिकेश मोरे, कार्तिक मोरे, सौरभ मोरे या सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रविंद्र आंधळे यांनी केले.

# तळा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला

**महासागर प्रतिनिधी,**

तळा: तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. पोपट कसबे आणि प्रा. कैलास वाडीकर उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना योग प्रात्यक्षिकाच्या माध्यमातुन अतिशय सुलभ पद्धतीने योग अभ्यासाची माहिती दिली. त्याचबरोबर कुमारी विद्या गावडे या विदयार्थिनीने विविध आसन करून दाखवली.या कार्यक्रमाचे



प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख डॉ. राजाराम थोरात यांनी केले तर प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी समर्पण भावनेने योग करून योगाचा प्रचार व प्रसार करावा असे आवाहन केले. तसेच महाविद्यालयीन तरुणांनी आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी दैनंदिन जीवनात योगाला महत्त्व दिले पाहिजे. या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी मानले तर निवेदन डॉ. तृप्ती थोरात यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक, प्राध्यपकेत्तर कर्मचारी,राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रबळगड माची येथे "योग विथ आमदार प्रशांत ठाकूर" उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: जागतिक योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने पनवेलजवळील प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी आयोजित करण्यात आलेल्या "योग विथ आमदार प्रशांत ठाकूर" या विशेष उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, प्रांताधिकारी पवन चांडक, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यासह शेकडो युवक, महिला, स्थानिक नागरिक, तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विचुंबे ग्रामपंचायत सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, शिवकर ग्रामपंचायत सरपंच आनंद ढवळे, माजी सरपंच संगिता भुतांबरा, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, केदार भगत, राकेश भुजबळ, रोहित जगताप, चिन्मय समेळ, मयूर कदम, तेजस जाधव, देवांशु प्रबाळे, अक्षय सिंग, विवेक होन, शुभम कांबळे, यांच्यासह अनेक पदाधिकारी व निसर्गप्रेमी सहभागी झाले होते. मागील काही वर्षांमध्ये झालेल्या योग प्रचाराचा आढावा घेतला असता, योग प्रशिक्षणाची मागणी सर्वत्र वाढत आहे, योग कडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टीकोन वाढीस चालला आहे.

# सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचा एकमेकांशी यथायोग्य समन्वय आणि संसूचन साधणे होय. याच धर्तीवर २१ जून हा दिवस भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात आणि विश्वभर 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जातो. सदर दिवसाच्या औचित्याने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) च्या जिमखाना असोसिएशन, राष्ट्रीय सेवा योजना, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, आजीवन अध्ययन तथा विस्तार विभाग आणि आर्ट ऑफ लिव्हींग यांच्या संयुक्त विद्यमाने 'योग सत्राचे' आयोजन शनिवार,दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ६:४५ वाजता महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात करण्यात आले. सदर सत्राची सुरवात योग प्रशिक्षकांच्या स्वागताने झाली, यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी आर्ट ऑफ लिव्हींगचे योग प्रशिक्षक श्री. चंद्रशेखर सापळे, श्री. संजय म्हात्रे आणि श्री. कुणाल पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत



केले. सर्व उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी 'शरीर आणि मन दोन्ही नैसर्गिक पद्धतीने निरोगी ठेवण्यासाठी योगसाधना करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि एन.सी.सी. च्या ५२ कॅडेट्सनी वृक्षासन, ताडासन, अनुलोक-विलोम, प्राणायाम आदी उत्स्फुर्तपणे सादर करत 'एक पृथ्वी- एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेतून सर्वांगीण कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढवण्यात योग्य विद्येचे अनन्य साधारण महत्व आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ.बी.डी.आघाव , वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस.बी. यादव, जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही. बी. नाईक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अध्यक्ष डॉ. आर. व्ही. येवले, नॅशनल कॅडेट कॉर्प्स च्या असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर प्रा. एन. पी. तीदार, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे अध्यक्ष डॉ. एस. एन. वाजेकर, विभागांचे विभागप्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, योगसत्राचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्ही. पाटील तर आभार प्रदर्शन जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही. बी. नाईक यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखाना समिती, राष्ट्रीय सेवा योजना, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग या समितीमधील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिला पायलटचा धावत्या कॅबमध्ये विनयभंग
## चालकासह तिघांवर गुन्हा दाखल

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

घाटकोपर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. एका २८ वर्षीय महिला पायलटचा धावत्या कॅबमध्ये विनयभंग करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली आहे. याप्रकरणी घाटकोपर पोलिसांनी कॅब चालकासह तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, मुख्य आरोपी असलेल्या कॅब चालकाला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला पायलट रात्रीच्या वेळी मुंबईतील काळा घोडा परिसरातून घरी जाण्यासाठी एका कॅबमध्ये बसली होती. मात्र, कॅब चालकाने ठरलेल्या मार्गाने न जाता गाडी एका वेगळ्याच ठिकाणी नेली. तिथे त्याने गाडीत आणखी दोन अनोळखी व्यक्तींना बसवले.

गाडी पुन्हा सुरू झाल्यावर, त्या दोन व्यक्तींपैकी एकाने पीडित महिलेचा हात पकडून पिळला, तर दुसऱ्याने तिचा विनयभंग केला. हा धक्कादायक प्रकार सुरू असतानाच पुढे पोलिसांची नाकाबंदी दिसल्याने दोन्ही आरोपी गाडीतून उतरून पळून गेले. त्यानंतर कॅब चालकाने महिलेला तिच्या घरी सोडले.

घरी पोहोचल्यानंतर पीडित महिलेने कॅब चालकाला त्या दोन व्यक्तींबद्दल जाब विचारला असता, त्याने कोणतेही उत्तर न देता तिथून निघून गेला. घडलेल्या प्रकाराने हादरलेल्या महिलेने संपूर्ण हकीकत आपल्या कुटुंबीयांना सांगितली. त्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ घाटकोपर पोलीस ठाण्यात धाव घेऊन कॅब चालक आणि त्याच्या दोन साथीदारांविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने कारवाई करत आरोपी कॅब चालकाला अटक केली आहे. तर, त्याच्या इतर दोन फरार साथीदारांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे रात्रीच्या वेळी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# मुंबई, चेन्नईत सीबीआयचे छापे; 800 कोटींच्या भ्रष्टाचार
## जेएनपीएच्या माजी मुख्य व्यवस्थापकासह चौघांवर गुन्हा

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे (जेएनपीए) तत्कालीन मुख्य व्यवस्थापक, खासगी व्यक्ती व संस्थांनी ८०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याची बाब केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) चौकशीत उघड झाली आहे. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध भ्रष्टाचार आणि आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच सीबीआयने मुंबई व चेन्नई येथे पाच ठिकाणी छापे टाकून कारवाई केली आहे.

जेएनपीएचे तत्कालीन मुख्य व्यवस्थापक सुनील कुमार मदभावी (पीपी डब्ल्यूडी), टीसीईचे प्रकल्प संचालक देवदत्त बोस, मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स (मुंबई), मे. बोस्कालीसस्मीत इंडिया (मुंबई) व मे. जान दे नुल ड्रेगिंग (चेन्नई) व इतर अनोळखी आरोपींविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

जेएनपीएच्या तत्कालीन अधिकारी आणि दोन खासगी कंपन्यांनी संगनमत करून गुन्ह्याचा कट रचला. त्यात दोन कंपन्यांचाही सहभाग होता. याप्रकरणी सीबीआयने जून २०२२ मध्ये प्राथमिक चौकशी सुरू केली होती.



तक्रारीनुसार, आरोपी कंपन्यांना न्हावा शेवा येथील जेएनपीटी येथील जहाजांना येण्या-जाण्याच्या मार्गातील खोली वाढवण्याचे कंत्राट दिले होते. तर, या प्रकल्पासाठी एका खासगी सल्लागार कंपनीला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमले होते.

**खोट्या दाव्यांच्या आधारे रक्कम अदा**

प्रकल्पाच्या टप्पा-१ मध्ये मार्गांची खोली वाढवण्यासह गाळ काढण्यात आला. यावेळी खोट्या दाव्यांच्या आधारावर ३६५ कोटी ९० लाख रुपये देण्यात आले. पहिल्या टप्प्यात २०१० ते २०१४ दरम्यान, तर दुसऱ्या टप्प्यात २०१२ ते २०१९ दरम्यान कामे झाल्याचे दाखवले.

दोन्ही टप्प्यांमधील २०१२ ते २०१४ हा देखभालीचा कालावधी सारखाच होता. त्यानंतरही त्या काळात ४३८ कोटींची अतिरिक्त रक्कम दिली. त्यावरून पहिल्या टप्प्यात प्रत्यक्षात कोणतेही अतिरिक्त खोदकाम अथवा गाळ काढण्याचे काम झाले नसतानाही मोठ्या प्रमाणात रक्कम दिल्याचे सीबीआयच्या तपासात स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी सखोल तपास सुरू आहे.

**आणखी काही जण रडारवर**

सीबीआयने याप्रकरणी मुंबई आणि चेन्नईतील पाच ठिकाणी छापे टाकले. त्यात जेएनपीएच्या अधिकाऱ्याचे निवासस्थान, सल्लागार कंपनीचे कार्यालय आणि खासगी कंपन्यांच्या कार्यालयाचा समावेश आहे.

या छाप्यांमध्ये कॅपिटल ड्रेझिंग प्रकल्पाशी संबंधित दस्तऐवज, डिजिटल उपकरणे आणि शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या गुंतवणुकीचे पुरावे हस्तगत केले. सर्व दस्तऐवजांची तपासणी सुरू आहे. आणखी काही जण सीबीआयच्या रडारवर असून, यातून काय उघड होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मी अजूनही ठाकरेंसोबत
## तेजस्वी घोसाळकरांचे स्पष्टीकरण

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**



मुंबै बँकेच्या संचालकपदी निवड झाल्यानंतर उद्धवसेनेच्या माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर भाजपमध्ये जाणार असल्याच्या चर्चेचे पेव फुटले होते. मात्र, माझी संचालकपदी निवड झाली म्हणून त्याला कुणीही राजकीय रंग देऊ नका. मी आजही उद्धव ठाकरेंसोबत असून त्यांच्यासाठीच काम करीत आहे, असे स्पष्ट करत घोसाळकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला.

घोसाळकर यांनी काही दिवसांपूर्वी उद्धवसेनेतील पदांचा राजीनामा दिला होता. त्यामुळे त्या पक्षांतर करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी 'मातोश्री'वर माजी नगरसेवकांच्या झालेल्या बैठकीत त्यांनी उपस्थितीही लावली होती. त्याच्या दुसऱ्याच दिवशी मुंबै बँकेच्या संचालकपदी नियुक्ती झाल्यानंतर त्या पक्ष सोडणार, अशी पुन्हा चर्चा सुरू झाली. त्यासंदर्भात घोसाळकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

संचालकपदाच्या निवडीला प्रसारमाध्यमांनी वेगळे वळण लावले. पक्षात नाराज होते, पण उद्धव ठाकरे यांना भेटल्यानंतर त्यांनी माझी नाराजी दूर केली. त्यामुळे मी अजूनही उद्धव ठाकरे यांच्यासोबतच आहे. ते माझे कुटुंबप्रमुख आहेत. मला कोणत्याही पक्षाकडून ऑफर आलेली नाही, असे सांगत मी दुसऱ्या कुठल्याही पक्षात प्रवेश करण्याचा विचार केलेले नाही, असेही त्या ठामपणे म्हणाल्या.

**'राजकारण आणि सहकार दोन्ही क्षेत्रे वेगळी'**

राजकारण आणि सहकार ही दोन्ही क्षेत्रे वेगवेगळी असून ही दोन्ही क्षेत्रे बाजूला ठेवून येत्या काळात समाजकारणाचे काम करणार आहे. यापूर्वी वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले आहे.

आता सहकार क्षेत्रात पहिल्यांदाच काम करत आहे. अभिषेक घोसाळकर हे दोन टर्म येथे संचालक होते. त्यांचा सहकार क्षेत्राचा अभ्यास खूप होता. त्यामुळे आपण देखील चांगले काम करण्याचा प्रयत्न करू, असे तेजस्वी घोसाळकर म्हणाल्या.

सहकार क्षेत्रात आपण काम करावे हे अभिषेक यांचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्या म्हणाल्या.

# अंधेरी सबवे ठरतोय डोकेदुखी, 'मिलन' प्रमाणे उड्डाणपुलही अशक्य

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

दरवर्षी पावसाळ्यात तुडुंब भरणारा अंधेरी सबवे मुंबई महापालिकेची डोकेदुखी ठरत आहे. पाणी तुंबल्यामुळे ठप्प पडणाऱ्या वाहतुकीला पर्याय म्हणून मिलन सबवेप्रमाणे येथे उड्डाणपूलही उभारणे शक्य नाही. त्यामुळे तुंबणाऱ्या पाण्याचा तातडीने निचरा करण्यासाठी येथून जाणाऱ्या मोगरा नाल्याचे रुंदीकरण हा एकमेव पर्याय ठरू शकतो. सांताक्रुझ-विलेपार्ले दरम्यान असणाऱ्या मिलन सबवेमध्ये तुंबणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी मुंबई महापालिकेने अनेक उपाययोजना हाती घेतल्या. परंतु याचा काही फायदा झाला नाही. अखेर पाणी तुंबल्यामुळे ठप्प पडणाऱ्या वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून सबवेलगत रेल्वे मार्गावरून उड्डाणपूल उभारण्यात आला.

यातून वाहतूक सुरळीत झाली असली तरी, मिलन सबवेमध्ये दरवर्षी पावसाळ्यात तुंबणाऱ्या पाण्याचा स्थानिक नागरिकांना आजही त्रास सहन करावा लागतो. अंधेरी सबवेही पावसाळ्यात पालिकेची डोकेदुखी ठरत आहे. तासभर पाऊस पडला तरी हा सबवे पाण्याने पूर्णपणे भरून जात आहे. त्यामुळे या सबवेतून जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प पडते.

अंधेरी पश्चिमेकडील एस. व्ही. रोड येथून अंधेरी पूर्वेला जाण्यासाठी हा सबवे जवळचा मार्ग आहे. पण दरवर्षी पावसाळ्यात किमान 25 ते 30 वेळा हा सबवे तुडुंब भरत असल्यामुळे वाहन चालकांना गोखले पूल, अथवा जोगेश्वरी उड्डाण पुलावरून ये-जा करावी लागते.

अंधेरी सबवेमध्ये तुंबणाऱ्या पाण्याचा तातडीने निचरा व्हावा, यासाठी येथे पाणी उपसा पंपही बसवण्यात येतात. परंतु येथे पाणी तुंबण्याचा वेग जास्त असल्यामुळे पंपांचाही फारसा फायदा होत नाही. अनेकदा मोठा पाऊस झाला तर सबवेतील पाणी थेट एस. व्ही. रोडपर्यंत येते. त्यामुळे हा रोडही वाहतूक कोंडीत सापडतो. याचा त्रास हजारो वाहन चालकांना दरवर्षी सहन करावा लागत आहे. तुंबणाऱ्या पाण्याचा तातडीने निचरा करणे सध्या तरी शक्य नसल्यामुळे येथे उड्डाणपूल उभारता येईल का, याची चाचपणी झाली होती. पण पश्चिमेला पूल उतरण्यासाठी जागाच नसल्यामुळे उड्डाणपूल उभारणे शक्य नाही.

**मोगरा नाल्याचे रुंदीकरण रखडले**

अंधेरी पूर्व येथील मोगरापाडा येथून वाहत येणारा मोगरा नाला अंधेरी पश्चिमेला अंधेरी सबवेखालून भरडावाडी परिसरापर्यंत येतो. पूर्वेला सुमारे 17 ते 18 फूट रुंद असलेला हा नाला पश्चिमेला साडेसात ते आठ फूट इतका निमुळता झाला आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात अंधेरीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी तुंबते. यावर उपाय म्हणून नाल्याच्या रुंदीकरणाची व आवश्यक ठिकाणी वळवण्याची शिफारस चितळे समितीने केली होती. परंतु याकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.

# संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांना बायोमेट्रिक सर्वेक्षणासाठी अखेरची संधी
## सर्वेक्षणात सहभाग होण्याचे म्हाडाचे आवाहन

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत, मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व संक्रमण शिबिरांमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असून मंडळातर्फे असे आवाहन करण्यात आले आहे की या उर्वरित रहिवाश्यांनी या सर्वेक्षणात सहभाग घेऊन मंडळातर्फे सुरू असलेल्या मोहिमेत सहकारी करावे.

मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबिरांमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण १० फेब्रुवारी, २०२५ पासून सुरू करण्यात आले आहे. संक्रमण शिबिरांमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांच्या अधिकृत नोंदीसाठी मंडळातर्फे राबविण्यात येत असलेले बायोमेट्रिक सर्वेक्षण आवश्यक असून, प्रत्येक भाडेकरू अथवा रहिवाश्यांनी यामध्ये सहभागी होणे बंधनकारक आहे, असे म्हाडातर्फे सांगण्यात आले आहे.

मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की, संक्रमण शिबिरांतील काही भाडेकरू/रहिवाशी बोयोमेट्रिक सर्वेक्षणास प्रतिसाद दिलेला नाही, करिता मंडळामार्फत संबंधितांना शेवटची संधी देण्यात येत आहे. तसेच जे भाडेकरू / रहिवासी या आवाहनानंतरही बायोमेट्रिक सर्वेक्षणास प्रतिसाद देणार नाहीत त्यांच्याकडे कोणतेही अधिकृत कागदपत्र उपलब्ध नाही, किंवा संक्रमण शिबिरात वास्तव्यास असण्यास त्यांना स्वारस्य नाही, असे गृहीत धरले जाईल. अशा रहिवाश्यांना अधिकृत घुसखोर असे घोषित करण्यात येईल व त्यांच्यावर म्हाडा अधिनियम, १९७६ च्या कलम ९५ (अ) (३) नुसार तात्काळ निष्कासनाची प्रक्रिया राबवली जाईल. त्यामुळे सर्व रहिवाश्यांनी याची गंभीर नोंद घ्यावी व तातडीने बायोमेट्रिक सर्वे करून घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

# शिरढोण, खोणी येथील म्हाडा गृहप्रकल्पातील 6 हजार 248 सदनिकांच्या विक्री किंमतीत कपात

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांसाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर विक्रीस उपलब्ध असलेल्या मौजे शिरढोण (ता. कल्याण, जि. ठाणे) व मौजे खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील ०६ हजार २४८ सदनिकांची विक्री किंमत कमी करण्यात आली असल्याने हक्काचे घर घेऊ इच्छिणाऱ्यांव नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या मुख्य अधिकारी रेवती गायकर यांनी केले आहे .

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (भा. प्र. से.) यांनी मौजे शिरढोण येथील सदनिकांच्या सुधारित विक्री किंमत प्रस्तावास मान्यता दिली असून सदर मान्यतेनुसार कोकण मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेतील ठाणे जिल्ह्यातील मौजे शिरढोण येथील अत्यल्प उत्पन्न गटातील ५२३६ सदनिकांची विक्री किंमत प्रती सदनिका ०१ लाख ४३ हजार ४०४ रुपयांनी कमी करण्यात आली असून सदर सदनिकेची सुधारित विक्री किंमत आता १९ लाख २८ हजार ७४२ रुपये आकरण्यात येणार आहे, असे गायकर यांनी सांगितले.

तसेच मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील मौजे खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील अत्यल्प उत्पन्न गटातील १०१२ सदनिकांची विक्री किंमत प्रती सदनिका ०१ लाख ०१ हजार ८०० रुपयांनी कमी करण्यात आली असून सदर सदनिकेची सुधारित विक्री किंमत आता १९ लाख ११ हजार ७०० रुपये असणार आहे.

कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) मार्फत इच्छुक व पात्र अर्जदारांना या कमी झालेल्या दरांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# देवनार, कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडवर बसवणार वजनकाटा
## डम्पिंग ग्राऊंडवर जाणाऱ्या कचऱ्याची अचूक माहिती समोर येणार

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**



मुंबई महापालिकेच्या कचऱ्या विल्हेवाट लावण्यात येणाऱ्या कांजूरमार्ग आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडवर वाहनातून येणाऱ्या कचऱ्याचे वजन मोजण्यासाठी वजनकाटे खासगी कंपनीकडून बसवण्यात आले असले तरी आता या दोन्ही ठिकाणी मुंबई महापालिकेच्यावतीने वजनकाटे बसवण्यात येणार आहे. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी येणाऱ्या कॉम्पॅक्टरमधील कचऱ्याचे वजन खासगी वजन काट्यावर केल्यानंतर महापालिकेच्या वजनकाट्यावरही केले जाणार आहे. ज्यामुळे मुंबईतून उचण्यात येणाऱ्या कचऱ्यातील मापातील पाप शोधून नेमका किती कचरा डम्पिंग ग्राऊंडवर जातो याची अचूक माहिती समोर येणार आहे.

मुंबईतील विविध विभागांतून महानगरपालिकेद्वारे नेमणूक केलेल्या कंत्राटदारांच्या आणि महानगरपालिकेच्या कॉम्पॅक्टरद्वारे उचलून कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंड आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडवर येथे कचरा वाहून नेला जातो. कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडवर सुमारे ५९०० मेटीक टन आणि देवनार डम्पिंग ग्राऊंडवर सुमारे ६०० मेट्रिक टन एवढा कचरा टाकला जातो. सद्यस्थितीत कांजूरमार्ग घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प येथे खासगी कंत्राटदार असलेल्या ऍन्टोनी लारा एनव्हायरोमेंट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्यावतीने वजनकाटा बसवण्यात आला असून या वजनकाट्यांचा सहाय्याने कचऱ्याचे वजन केले जाते. तसेच देवनार डम्पिंग ग्राऊंडवरही वजन काटा बसवण्यात आला असून या दोन्ही डम्पिंग ग्राऊंडवरील वजन काट्याच्या माध्यमातून मुंबईतून कॉम्पॅक्टरद्वारे आणलेल्या कचऱ्याचे वजन केले जाते.

मात्र, कांजूरमार्ग आणि डम्पिंग ग्राऊंड येथे वजनकाटे उपलब्ध असले तरीही महापालिकेच्यावतीने आता अत्याधुनिक पद्धतीचे वजनकाटे बसवण्यात येणार आहे. यासाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या वजनकाट्याची उभारणी करण्यासाठी पाटील इलेक्ट्रिकल्सची नेमणूक करण्यात आली आहे. देवनार आणि कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंडवर खासगी कंपनीच्यावतीने वजनकाटा असला तरी भविष्यात महापालिकेच्यावतीने देण्यात येणाऱ्या नवीन कंत्राट कामांमध्ये कचऱ्याच्या कामाचे पैसे हे वजनावर आधारित असल्याने त्यासाठी पुरक वजनकाटे बसवण्याचा महापालिकेच्यावतीने निर्णय घेण्यात आला.

# पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सर्व पुलांचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट
## अहवालानंतर होणार दुरुस्ती



**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

मुंबईतील अनेक पुलांच्या स्थिरतेबाबत मुंबई व्हिजेटीआय या तज्ज्ञ संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. हे ऑडिट केल्यानंतर पश्चिम उपनगरातील ३६ भुयारी रस्ते, स्कायवॉक आणि पादचारी आदी पुलांचे पुन्हा एकदा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मुंबई आयआयटीकडून ऑडिट केले जाणार आहे.

मुंबईतील पश्चिम आणि पूर्व द्रुतगती महामार्ग महापालिकेला हस्तांतरित झाल्यानंतर या रस्त्याची सुधारणा महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. या मार्गावरील सर्व पादचारी भुयारी मार्ग, रस्ते वाहतूक भुयारी मार्ग आणि स्कायवॉक हे महापालिकेच्या ताब्यात आलेले असून या सर्व पूल आणि भुयारी मार्गाच्या स्ट्रक्चरल ऑडिट करता महापालिकेने व्हिजेटीआय संस्थेच्यावतीने नेमणूक केली होती. त्यानुसार ३५ पूल आणि भुयारी मार्गांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते.

## जाहीर नोटीस

**प्रबंधक/तनिस/मु. उप/सुनावणी/२०२५ / अपिल क्र २१९/२०२४**

जा.क्र.१०८४

**संतोष कृष्णाजी नाईक,**
**विरुध्द**
**अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलिय प्राधिकारी, पूर्व उपनगरे, चर्चगेट आणि ईतर**

अपिलार्थी संतोष कृष्णाजी नाईक, यांनी अपर जिल्हाधिकारी तथा अपिलिय प्राधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) १९७१ अधिनियम कलम ३५ अंतर्गत नियम ७ (२(अ)) अन्वये तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) आमचे कार्यालयात अपिल क्र. २१९/२०२५ दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) याचे न्यायालयासमोर दिनांक १३/०६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी प्रतिवादी यांना नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी प्रतिवादी क्र ३. सचिव/अध्यक्ष, शिवगंगा एसआरए कौ.हो.सो., प्रतिवादी क्र ४ विकासक, मे. अरिहंत कंस्ट्रक्शन, प्रतिवादी क्र.५ चंद्रशेखर एस. नाईक, यांचा जो पत्ता दिला आहे त्या पत्यावर नोटीस प्रतिवादी यांना बजावली होती. परंतु सदर प्रकरणी ते गैरहजर होते.

सदर अपिल प्रकरणी अपिलार्थी यांनी मा. तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे) यांचे दालनात दाखल केलेल्या अपिलात प्रतिवादी क्र ३. सचिव/अध्यक्ष, शिवगंगा एसआरए कौ.हो. सो., प्रतिवादी क्र ४ विकासक, मे. अरिहंत कंस्ट्रक्शन, प्रतिवादी क्र.५ चंद्रशेखर एस. नाईक, यांचे म्हणणे ऐकण्यासाठी म्हणून दिनांक २७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगरे), पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फ़ोर्ट, मुंबई ४०० ००१ यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. सदर प्रकरणी प्रतिवादी क्र ३. सचिव/अध्यक्ष, शिवगंगा एसआरए कौ. हो.सो., प्रतिवादी क्र ४ विकासक, मे. अरिहंत कंस्ट्रक्शन, प्रतिवादी क्र.५ चंद्रशेखर एस. नाईक, यांनी आपलेकडील मूळ कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित राहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस देण्यात येत आहे. सदर सुनावणीस आपण उपस्थित न राहिल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

**स्थळ - मुंबई शहर**
**दिनांक - १९/०६/२०२५**

**सही/-**
**(नंदकुमार आर. साळवी)**
**प्रबंधक तक्रार निवारण समिती**
**(मुंबई उपनगरे)**

# मुंबई मेट्रोवर प्रवाशांचा रेकॉर्डब्रेक प्रवास
## एकाच दिवशी 294,681 प्रवाशांनी केला प्रवास

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

एकीकडे पावसाळयामुळे संपूर्ण महाराष्ट्राची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असताना दुसरीकडे मुंबई मेट्रोने मात्र वेगळाच रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. एकाच दिवशी २.९४ लाखांहून अधिक प्रवाशांची वाहतूक करण्याचा कारनामा मुंबई मेट्रोने केला आहे. १८ जून २०२५ रोजी मुंबई मेट्रोतून तब्बल २९४,६८१ प्रवाशांनी प्रवास केला आहे. या रेकॉर्ड ब्रेक प्रवासी वाहतुकीनंतर मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडने ट्विट करत प्रवाशांचे आभार मानले आहेत. तसेच प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी प्रवासाची हमी सुद्धा दिली.

मुंबई मेट्रोने ट्विट करत प्रवाशांचे आभार मानले आहेत. 'महा मुंबई मेट्रोने भरारी घेतली आहे! आमच्या प्रिय प्रवाशांनो, तुम्ही आमच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे आमची प्रवासी संख्या सातत्याने वाढत आहे. १८ जून रोजी आम्ही २,९४,६८१ प्रवासी संख्येचा टप्पा ओलांडला, जो एका दिवसातला सर्वात जास्त आहे. ही वाढ केवळ तुमच्या आमच्यावरील विश्वासामुळे आणि आमच्या टीमच्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे शक्य झाली आहे. तुमच्या पाठिंब्याने आम्हाला दररोज अनेक टप्पे पार करण्याची आशा आहे. हवामान काहीही असो, महा मुंबई मेट्रो तुम्हाला सुरक्षित, आरामदायी प्रवासाची हमी देते.

धन्यवाद... असे ट्विट मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडने केले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक २३.६.२०२५ ते ३०.६.२०२५ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद नियिवा दिनांक १.७.२०२५ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्थिकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार कोऱ्या | निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | राजभवन, मुंबई येथील जलदर्शन, जलसंकेत, नीरसिंचन, जलगर्जन, निर्मल निवास, नीररंजन, नीरदर्पण, नीरगुंजन, नीरनर्तन, गॅरेज, बॅडमिंन्टन हॉल आणि जलसागर इत्यादी इमारतीचे देखभाल व दुरूस्ती करणे. | ८,३५,२३६/- | ८,४००/- | १२ महिने | ब-१ | रू. ५९०/- |
| २ | राजभवन, मुंबई येथील जलभूषण, जललक्षण, जलचिंतन, जलपुजन, जलकिरण इत्यादी इमारतीची देखभाल व दुरूस्ती करणे. | ८,३८,९२१/- | ८,४००/- | १२ महिने | ब-१ | रू. ५९०/- |
| ३ | राजभवन, मुंबई येथील जलविहार, दरबार हॉल, सचिव कार्यालय, दवाखाना व सांस्कृतिक क्लब इत्यादी इमारतीचे देखभाल व दुरूस्ती करणे. | ८,३४,२७९/- | ८,४००/- | १२ महिने | ब-१ | रू. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविंदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र. इशवि/निलि/६६३८**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय इलाखा शहर विभाग,**
**२ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**
**दिनांक :- १८/६/२०२५**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१२८४**

**सही/-**
**(व्ही. ए. पाटसकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर विभाग, मुंबई.**

# वारी : परंपरा, विज्ञान आणि माणुसकीचा संगम

पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी अध्यात्मिक चळवळ आहे. हजारो वारकरी, स्त्री-पुरुष, बालक-वृद्ध, गरीब-श्रीमंत अशा विविध थरांतील लोक पंढरपूरच्या दिशेने टाळ, मृदुंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषात, विठ्ठलनामाच्या गजरात पायी चालत एकत्र येतात. ही यात्रा केवळ एक धार्मिक परंपरा म्हणून नाही तर ती विज्ञान, आरोग्य, सामाजिक समतेचा संदेश देणारी आणि माणुसकीच्या शिक्षणाची शाळा आहे.

-----------------




आपण आधुनिक युगात विज्ञानावर भर देतो, आणि श्रद्धा-परंपरांकडे संशयाने पाहतो. पण वारी ही परंपरा केवळ श्रद्धेची फलश्रुती नाही. संतांनी वारीच्या माध्यमातून लोकजीवनात चालण्याची सवय निर्माण केली.

पायी चालण्याने होणारा व्यायाम, शारीरिक आरोग्य वाढवतो. एकेका दिवशी २० ते ३० किलोमीटर चालल्याने शरीरातील चयापचय क्रिया सुधारतात, फुफ्फुसे, हृदय मजबूत होते. अनेकदा आधुनिक वैद्यकीय शास्त्रदेखील पायी चालण्याचा आग्रह धरते. संतांनी ही गोष्ट शतकांपूर्वी ओळखली होती.

आजच्या यंत्रयुगात लोक फार कमी चालतात. स्थूलपणा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार यांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. या आजारांवर चालण्याइतका प्रभावी आणि सहज उपाय नाही. पण कोणी 'चाल' म्हणाले तर ईगो अडथळा ठरतो. म्हणूनच संतांनी 'वारी' सारख्या सामाजिक अध्यात्मिक चळवळीद्वारे पायी चालण्याला धार्मिक अधिष्ठान दिलं. हेच त्यांचं द्रष्टेपण!

**वारी म्हणजे माणुसकीचा झरा**

वारीत सहभागी झाल्यावर मनात एक विलक्षण शांतता येते. अहंकार गळून पडतो. 'मी कोणीतरी खास आहे' ही भावना आपोआप विरते. कारण वारीत कोणी मोठा, लहान, श्रीमंत, गरीब नसतो. सगळे एकाच पंक्तीत उभे असतात. एकमेकांना 'माऊली' म्हणत हाक मारतात. हे संबोधनच दुसऱ्यामधील देवत्वाची जाणीव करून देतं.

वारीत माणसं एकमेकांशी बोलतात, एकमेकांचं दुःख समजून घेतात, अन्न, पाणी, निवारा शेअर करतात. इथे परस्पर सहकार्य, सेवा, सहानुभूती आणि एकोपा हाच धर्म असतो. ही सगळी शिकवण कोणत्याही विद्यापीठात मिळत नाही. वारी म्हणजे माणुसकीची शाळा आहे.

**वारीतून सामाजिक समतेचा संदेश**

वारीमध्ये कोणाचं वंश, जात, वर्ग, धर्म विचारात घेतला जात नाही. इथे प्रत्येक माणूस फक्त वारकरी असतो. टाळ, चिपळ्या, अभंग आणि विठ्ठलनाम हेच त्याचं ओळखपत्र. ही समता संतांनी स्वखुशीने नाही, तर जनतेला समजावून, जगवून, प्रत्यक्ष कृतीतून रुजवली आहे.

आजही हजारो माणसं विठ्ठलाच्या नामात एकरूप होऊन पंढरपूरकडे जातात. त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास असतो झ्र ₹विठ्ठलाचं दर्शन, आणि माणूस म्हणून जगणं.₹ यासाठी कोणालाही वेगळं वाटत नाही, कोणी मागे रहात नाही. ही खरी धर्मनिरपेक्षता आणि मानवतावाद आहे.

**वारी आणि नैतिक अधिष्ठान**

वारीमध्ये शिस्त, संयम, त्याग आणि सहनशीलतेचं शिक्षण आपोआप मिळतं. वारीच्या काळात अनेक वारकरी नियमाने उपवास करतात, साधी राहणी ठेवतात, सेवा करतात. अनेक तरुण अल्कोहोल, तंबाखू, व्यसने सोडून या प्रवासात सहभागी होतात. एक नवीन सुरुवात करण्याचा संकल्प करतात.

वारी म्हणजे केवळ चालणं नाही, ती म्हणजे आपले दोष, अहंकार, मोह, मत्सर यांना गळून टाकण्याची प्रक्रिया आहे. विठ्ठलाचं दर्शन घेण्यापूर्वी आपलं अंतरंग शुद्ध करणं ही खरी तयारी असते. म्हणूनच वारी जीवन बदलते.

**वारी टिकली पाहिजे**

वारी ही परंपरा, श्रद्धा आणि शारीरिक आरोग्य यांचा अद्भुत संगम आहे. तिचं स्वरूप टिकवणं, वाढवणं हे प्रत्येक सुजाण नागरिकाचं कर्तव्य आहे. संत नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखामेळा, बहिणाबाई, सावता माळी यांचं जीवनच वारीमय होतं. त्यांचं कार्य आजही चालू ठेवणारे अनेक वारकरी, कीर्तनकार, साधू, सेवेकरी समाजात कार्यरत आहेत. त्यांचं योगदान हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे.

आज वारीवर अंधश्रद्धा किंवा जुनाट परंपरा म्हणून टीका होते. पण ही टीका करणाऱ्यांनी प्रत्यक्ष वारीत सहभागी होऊन अनुभव घ्यावा, मग समजेल झ्र वारी काय असते!

वारीच्या निमित्ताने भक्ती, विज्ञान, समता, आरोग्य, माणुसकी, एकात्मता, शिस्त, अहिंसा झ्र हे सगळे गुण एकत्र येतात. ही केवळ महाराष्ट्राची नव्हे तर भारताचीही अनोखी सांस्कृतिक देणगी आहे. शेवटी एकच....

चला वारीला, जपा माणुसकीला!

माझं स्पष्ट मत आहे की, प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी वारी केलीच पाहिजे. ती केवळ पंढरपूर दर्शनासाठी नव्हे, तर स्वतःला ओळखण्यासाठी. आपल्यातील अहंकार झटकण्यासाठी, माणसातला माणूस जागवण्यासाठी. वारी केल्यावर माणूस अधिक नम्र होतो, सहृदयी होतो, समाजाभिमुख होतो. म्हणूनच ही परंपरा विज्ञानाच्या कसोटीवरही खरी ठरते आणि अध्यात्मिक दृष्टिकोनानेही उन्नत करणारी असते. जय हरि! राम कृष्ण हरि!

-----------------

■ गजानन हरणे
समाजसेवक, वारकरी,
निर्भय बनो जन आंदोलन,
जि. प. नगर खडकी, अकोला.
९८२२९४२६२३
लेखक हे स्वतः पाच वर्षापासून पायी वारी करीत आहेत.

■ ■ ■

# युवकांनो कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवा...

आजकालचे युवक आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेले आहेत. आणि नको त्या फालतू छंदात वेळ वाया घालवत आहेत. त्यांना स्वतःच्या कर्तव्याची जान आणि जबाबदारीचे भान जराही राहिले नाही. आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहेत? आणि आपण सध्या काय करत आहोत? याचा त्यांना विसर पडला आहे. म्हणूनच ते भरकटत आहेत.

दारू, सिगारेट व गांजा या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेत आहेत आणि स्वतःच मृत्यूला जवळ करत आहेत. व्यसनी तरुणांचा देश ही भारताची नवी ओळख जगासमोर आली आहे. आपल्या भारतात मिसरूड न फुटलेले अगदी पाच ते सहा वर्षांची मुले देखील व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. मग हे युवक कशाला कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवतील?

शिक्षणाच्या नावाखाली आपल्या वडिलांकडून भरपूर पैसा मागवतात मात्र तो पैसा ढाब्यावर जाऊन मौज मजा करण्यात लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून मवाली पोरांसोबत टवाळक्या करत फिरत आहेत. वाईट व्यसनाने नुसते बरबटून गेले आहेत.

खरे तर युवकांनी तरुणपणात खूप खूप शिक्षण शिकून आपले जीवन ध्येय गाठायला हवे. शिक्षणाच्या जोरावर एखादी नोकरी काबीज करायला हवी. आई-वडिलांचे, गावकऱ्यांचे व समाज बांधवांचे स्वप्न साकार करायला हवे. नंतर सामाजिक बांधिलकी म्हणून किंवा सामाजिक कर्तव्य व जबाबदारी म्हणून युवकांनी स्वतः शिक्षित होऊन इतरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे, जेणेकरून ते युवक शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला प्रगतीपथावर नेऊ शकतील.

युवकांनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे काम आहे. त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची सुरक्षा करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. युवकांनी समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारायला हवा. समाजातील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करायला हवेत.

युवकांनी आपल्या कला आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी व देशासाठी करावा. युवकांनी एक जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या विकासात सक्रियपणे सहभाग नोंदवावा. युवकांनी समाजाला दिशा देण्यासाठी उत्तम नेतृत्वाची भूमिका पार पाडावी. तसेच नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि समाजाला प्रेरित करावे.

गोरगरीब, वंचित, उपेक्षित व तळागाळातील युवकांच्या शिक्षणाला थोडाफार हातभार लावावा. त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी. आणि त्यांना सुद्धा आपल्या बरोबरीला आणून त्यांच्या जीवनात आनंदाची व चैतन्याची मंगलमय पहाट आणावी. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा.? अनाथांना व वृद्धांना आश्रमात जाऊन कपडे, भेटवस्तू व अन्नदान वाटप करावे. आपल्या आई वडिलांना सुखाचे व आनंदाचे क्षण दाखवावेत. त्यांना कष्टाची कामे करू देऊ नयेत. उतारवयात त्यांची अधिक काळजी घ्यावी. पत्नीचे ऐकून त्यांना अंतर देऊ नये. त्यांची हेळसांड करू नये.

आजकाल शिकून नोकरीला लागलेले काही महाभाग पत्नीचे ऐकून आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. त्यांना घाण घाण शिव्या देऊन घराबाहेर काढत आहेत. युवकांनो आई-वडिलांसोबत असे अमानुष प्रकार न करता, त्यांना गद्दार न होता आणि त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता न दाखवता त्यांना खूप खूप जीव लावूया, त्यांना अगदी आनंदात व मजेत ठेवून त्यांना सुखाचे दिवस दाखवूया. कारण आई-वडिलांनी आपल्यासाठी खस्ता खाऊन व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला उच्च शिक्षण शिकवलेले असते. त्यांच्या जीवावरच तर आपला उच्च शिक्षणाचा डोलारा उभा असतो. हे आपण कधीच विसरता कामा नये. त्यांनी कष्ट करून आपल्या शिक्षणाला पैसा लावलेला असतो. आपण नोकरीला लागेपर्यंत त्यांना एकदिवस सुध्दा सुखाची झोप लागत नसते. मग आपण आई-वडिलांना सुखात ठेवणे व म्हातारपणात त्यांचे योग्य पालन पोषण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी असते. हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवायला हवे.

आजकाल नोकरीला लागलेले युवक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी विसरून, आई-वडिलांना गावी ठेवून नोकरीच्या ठिकाणी स्थायिक होतात आणि तिकडेच पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. तिकडच्याच दुनियेत बायको लेकरांसोबत रममान होतात. समाज बांधवांना व आई-वडिलांना मदत करायची असते हे विसरून जातात. नेमके हेच डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित नव्हते.

डॉ. बाबासाहेब म्हणायचे की, लावलेला एक दिवा हजारो दिव्यांना प्रज्वलित करू शकतो. म्हणजे एक नोकरीला लागलेला समाज बांधव आपल्या हजारो बांधवांना आपल्या बरोबरीला आणू शकतो पण आजकालच्या लोकांची मानसिकता फार गढूळ झाली आहे. त्यांना वाटत आहे की, माझ्यासारखा उच्चपदस्थ अधिकारी दुसरा कोणीच होऊ नये, समाजात मलाच अधिक मान मिळावा, मीच भरपूर पैसा व संपत्ती कमवावी आणि इतरांनी फक्त माझ्याकडे बघत राहावे. साहेब, साहेब करत माझ्या मागे पुढे फिरावे असे आजकालच्या नोकरदारांना वाटते.

आजकालचे नोकरदार स्वार्थी व मतलबी झाले आहेत. त्यांना फक्त आपलेच भले व्हावे वाटत आहे. आणि इतरांचे वाटोळे व्हावे वाटत आहे. आपल्या महापुरुषांनी जर स्वतःचा स्वार्थ पाहिला असता तर ते आज खूप श्रीमंत झाले असते पण आज आपण कुठे असतो? कोणाच्या तरी दावणीलाच बांधलेले गुलाम असतो ना...याचा एकदा विचार करून बघा.

आपले महामानव स्वतः शिकले, मोठे झाले आणि समाजालाही मोठे केले आणि आपल्यालाही खूप खूप शिकून मोठे व्हा आणि आपल्याबरोबर समाज बांधवांनाही मोठे करा असे सांगून गेले. मग माझा आजच्या नोकरदारांना प्रश्न आहे की, आपण नोकरीला लागल्यावर किती लोकांना आपल्या बरोबरीला आणले? किती समाज बांधवांचा उद्धार केला? महापुरुषांच्या नावाचा डंका आजही संपूर्ण जगभर गाजत आहे. हे केवळ त्यांनी केलेल्या कार्यामुळेच! हे आजच्या नोकरदारांनी मनोमन ध्यानात ठेवावे.

आज या महापुरुषांना जाऊन कित्येक वर्षे झाली आहेत, तरी हे महामानव अख्या जगाच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपण देखील स्वतःबरोबरच समाजाचा आणि देशाचा विचार केला तर नक्कीच आपण देखील मेल्यानंतर सुध्दा लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहाल. कारण बांधवांनो मेल्यावर आपल्याला काहीच सोबत घेऊन जायचे नाही, जसे रिकाम्या हाताने आलोय तसेच एकदिवस रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे... म्हणून जीवनात असे काहीतरी ऐतिहासिक व अलौकिक कार्य करा की, मेल्यानंतरही तुमचे नाव एक चांगला व्यक्ती म्हणून पंचक्रोशीत आदराने निघत राहील...

--------------

■ बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर. जि. लातूर.
7498715661

■ ■ ■

# कृषी हीच नवी करिअर क्रांती
## एआय आणि स्टार्टअप्सच्या युगात नवा दृष्टिकोन



ऋषिकेश गजानन कोकाटे
पुणे.

१२ वी नंतर उएळ, खएए आणि ठएएळ यांचे निकाल लागलेत. अनेक विद्यार्थ्यांनी आपापले लक्ष्य ठरवले आहे, तर काही अजूनही विचारात आहेत.. पुढे काय? इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट या पारंपरिक मार्गांपेक्षा वेगळा आणि सशक्त पर्याय म्हणजे कृषी क्षेत्र. होय! कृषी आता केवळ शेतात राबणं एवढंच उरलेलं नाही; हे क्षेत्र आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन आणि उद्योजकतेच्या संधींनी भरलेलं आहे.

**कृषी क्षेत्र का निवडावे?**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात तर कृषी हा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. बदलत्या हवामान, जागतिकीकरण आणि अन्न सुरक्षा या पार्श्वभूमीवर सक्षम, तंत्रस्नेही आणि दूरदृष्टी असलेल्या कृषी व्यावसायिकांची मोठी गरज आहे.

**१२ वी नंतर कृषी क्षेत्रातील अभ्यासक्रमः**

१. B.Sc. Agriculture **(कृषी पदवी) :**

**४ वर्षांचा अभ्यासक्रमः**

हा अभ्यासक्रम शेती विज्ञान, मृदविज्ञान, बियाणे तंत्रज्ञान, पिक उत्पादन, कृषी अर्थशास्त्र, कीड व्यवस्थापन, सिंचन व जलसंधारण, अन्न प्रक्रिया आदी विषय शिकवतो.

२. B.Sc. Horticulture / Forestry / Animal Husbandry / Dairy Technology / Agri-Biotechnology :

शेतीची विविध रूपं आणि शाखा समजून घेण्यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत.

**३. डिप्लोमा कोर्सेस :**

१२ वी नंतर थोड्या कालावधीचे (१-२ वर्ष) अभ्यासक्रम झ्र कृषी पत्रकारिता, कृषी विपणन, अन्न प्रक्रिया, शेती यंत्रसामग्री, ऑर्गेनिक फार्मिंग

४. B.Tech in Agricultural Engineering:

हे इंजिनिअरिंग आणि शेतीचे संयोजन आहे. सिंचन, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान यावर भर दिला जातो.

पुढील संधी आणि करिअर मार्ग :

१. सरकारी नोकऱ्या (MPSC, IBPS-AFO, कृषि अधिकारी) :

शासन दरबारी कृषी पदवीधारकांना अनेक संधी आहेत. तालुका कृषी अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी, बँकांमध्ये कृषी अधिकारी इत्यादी.

२. कृषी संशोधन आणि शिक्षणः

M.Sc. Agriculture U Ph.D. ICAR, कृषि विद्यापीठे, KVKs यामध्ये संशोधक व प्राध्यापक म्हणून काम करता येते.

**३. उद्योजकता**

(Agri-Entrepreneurship):

सेंद्रिय शेती, हरितगृह शेती, अन्न प्रक्रिया यामध्ये स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. शासनाकडून अनुदान, कर्ज आणि प्रशिक्षणही उपलब्ध असते.

४. कृषी स्टार्टअप्स आणि Agri-Tech:

ड्रोन टेक्नॉलॉजी, IoT आधारित शेती, e-Mandi, कृषी डेटा अ?नालिटिक्स, ॲप आधारित सेवा यामध्ये आधुनिक स्टार्टअप्स उभे करता येतात.

**५. खाजगी क्षेत्रात संधी :**

बी-बियाणे कंपन्या, अन्न प्रक्रिया उद्योग, खत-किटकनाशके उत्पादक कंपन्या, बँका, विमा कंपन्यांमध्ये कृषी सल्लागार, फील्ड ऑफिसर इ. पदांवर काम करता येते.

**कृषी हे भविष्य घडवणारे क्षेत्र!**

कृषी म्हणजे फक्त शेतात नांगर चालवणं नव्हे, तर एक शाश्वत, विज्ञानाधिष्ठित आणि उद्योजकीय क्षेत्र आहे. जागतिक लोकसंख्या वाढ, अन्न सुरक्षा, हवामान बदल, पाण्याचे दुर्भिक्ष्य हे मुद्दे लक्षात घेतले, तर कृषी हीच 'फ्युचर इंडस्ट्री' आहे.

या क्षेत्रात काम करताना तुम्ही समाज, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था या तिन्ही पातळ्यांवर सकारात्मक प्रभाव पाडू शकता. त्यामुळे कृषी क्षेत्र हे केवळ करिअर नव्हे, तर एक जीवनधर्म ठरू शकतो.

**आधुनिक शेतीकडे वळावे**

**नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने क्रांती घडवावी**

आजच्या पिढीतील कृषी पदवीधरांनी केवळ खासगी कृषी कंपन्यांमध्ये नोकरी करण्यापुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या ज्ञानाचा खरा उपयोग हा स्वतःच्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनक्षमता वाढवण्यात, अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करण्यात, किंवा कृषी स्टार्टअप्स उभारण्यात आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), ड्रोन टेक्नॉलॉजी, स्मार्ट सेंसर्स, IoT बेस्ड सिंचन प्रणाली, मृदा आरोग्य विश्लेषण, कृषी डेटा अ?नालिटिक्स इत्यादी अत्याधुनिक साधनांचा उपयोग करून शेती अधिक शास्त्रीय, अचूक आणि नफ्याची करता येते. कृषी पदवीधारकांनी जॉब सीकर न राहता जॉब क्रिएटर बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

ग्रामीण भागात कृषी-आधारित स्टार्टअप्स उभे राहिल्यास केवळ स्वतःचं भवितव्य नाही तर इतर शेतकऱ्यांनाही नव्याची दिशा मिळेल. त्यामुळे कृषी पदवीधर हे ग्रामीण परिवर्तनाचे खरे शिल्पकार ठरू शकतात.

जिथे माती आहे, तिथे संपत्ती आहे;

जिथे बी आहे, तिथे भविष्यातील बीज आहे!

आजचा तरुण विचारशील आहे. तो केवळ नोकर नको म्हणतोय, तर निमार्ता व्हायचं ठरवत आहे. कृषी क्षेत्र त्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ देऊ शकतं.

■ ■ ■

**: लेखक परिचय :**

ऋषिकेश गजानन कोकाटे हे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर, ताथवडे, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक (कृषी विभाग) म्हणून कार्यरत आहेत. ते कृषी सुवर्णपदक विजेते असून, निंदण व्यवस्थापन (Weed MaQagement) या क्षेत्रात त्यांचे विशेष संशोधन आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात Emerging Scientist Award, राष्ट्रीय प्रतिष्ठा पुरस्कार, डॉ. एम. एस. स्वामिनाथन पुरस्कार, तसेच oung Researcher Award या राष्ट्रीय पातळीवरील मान्यतांचा सन्मान मिळवला आहे. कृषी शिक्षणासोबतच, ते विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन करत असून, आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कृषी उद्योजकतेकडे विद्यार्थ्यांनी वळावे यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

# आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धमार्ची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले.

हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे.

सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

**वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!**

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ■ ■ ■

# तुम्ही पण अशीच चपाती भाजता का? वाढेल कॅन्सरचा धोका.. बदला सवय..



भारतातील प्रत्येक घरात दररोज चपाती ही शक्यतो खाल्लीच जाते. चपात्या किंवा फुलके बनवण्यासाठी बऱ्याच घरात एक पद्धत वापरली जाते ती म्हणजे चपाती तव्यावर अर्धी भाजायची आणि नंतर थेट गॅसच्या आचेवर ठेवून ती फुगवणे. फुललेल्या चपात्या किंवा रोटी खायलाही गरम गरम छान लागतात. पण तुम्हाला हे जाणूव आश्चर्य वाटेल की चपाती भाजण्याची ही पद्धत कॅन्सरचा धोका वाढवू शकते. नक्की कोणत्या अशा चपाती भाजण्याच्या पद्धती आहेत ज्यामुळे कॅन्सर होण्याचे धोके असतात.

काही संशोधनातून असे दिसून आले आहे की उच्च तापमानावर रोटी भाजल्याने काही हानिकारक रसायने तयार होतात, जसे की HCA (हेटेरोसायक्लिक अमाइन्स) आणि ढअल्ल (पॉलीसायक्लिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स), ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार नैसर्गिक वायूच्या चुली कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड सारखे धोकादायक वायू आणि WHO च्या मानकांपेक्षा जास्त सूक्ष्म कण उत्सर्जित करतात. या वायूंचा श्वसनाचे आजार, हृदयरोग आणि कर्करोग यासारख्या समस्यांशी संबंध असू शकतो .

पोषण आणि कर्करोग या दुसऱ्या अभ्यासात असे म्हटले आहे की उच्च तापमानावर स्वयंपाक केल्याने कर्करोग निर्माण करणारी रसायने तयार होऊ शकतात.

थेट आगीवर स्वयंपाक करणे कर्करोगाशी जोडले जाऊ शकत नाही. निश्चितच काही रसायने डीएनएला नुकसान पोहोचवू शकतात, परंतु शरीरात स्वतःला बरे करण्याची क्षमता असते. जर कोणी असे अन्न जास्त काळ खाल्ले तरच त्याचा परिणाम होऊ शकतो. ते अधूनमधून खाल्ल्याने कोणतेही मोठे नुकसान होत नाही.

एचसीए, पीएएच आणि ॲक्रिलामाइड सारखी रसायने विशेषतः जेव्हा स्टार्च आणि मांस शिजवले जातात तेव्हा तयार होतात. त्यांचा कर्करोगाशी थेट संबंध नाही, परंतु खबरदारी म्हणून आपण कोळशावर किंवा गावच्या जन्या पद्धतींच्या चुलींवर स्वयंपाक करणे टाळले पाहिजे.

बहुतेक लोक भाकरी किंवा चपाती तव्यावर कमी आणि जास्त वेळ थेट गॅसवर ठेवून भाजतात. असे केल्याने चपाती आतून कच्ची राहते. कच्ची चपाती खाल्ल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### कॉन्ट्रॅक्ट भरती

मजुरांचे होते आर्थिक शोषण
कॉन्ट्रॅक्टर घेतो कापून कमिशन
सेवेची नसते मुळीच शाश्वती
लटकती तलवार डोक्यावरती..

कॉन्ट्रॅक्ट बेसवर केली भरती
शासनाला नसते धास्ती
आधी काम मग दाम
शेवटी भाऊ रामराम..

हमारी मांगे पुरी कर लो
कदाचित शासन कदरले
म्हणुन कॉन्ट्रॅक्ट भरतीला
झुकते माप असावे दिले.. !

## उबाठा सेनेची अगतिकता...

# कोणी युती करताय का युती?

एकनाथ शिंदे यांनी तीन वर्षांपूर्वी बंडाचा झेंडा फडकवल्यापासून उबाठा सेनेची सतत घसरण व अधोगती बघायला मिळत आहे. राहुल गांधी व शरद पवार यांच्या मदतीने उद्धव ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळवले. पण अडीच वर्षांतच त्यांना एककल्ली वागणुकीमुळे सर्वोच्चपदावरून पायउतार व्हावे लागले. राज्याची सत्ता गेली. पक्षाचे नाव, चिन्हही गेले आणि देशातील सर्वांत श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेतील सत्तेलाही ग्रहण लागले. मुंबई महापालिकेवर अविभाजित शिवसेनेने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईने पंचवीस-तीस वर्षे सत्ता उपभोगली. पण शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर पक्षाला मोठी गळती लागली. चार महिन्यांवर राज्यात महापालिका, जिपच्या निवडणुका अपेक्षित आहेत. वाट्टेल ते करून मुंबई महापालिकेची सत्ता कशी मिळवायची, या प्रश्नाने उबाठा सेनेतील नेत्यांची व पक्षप्रमुखांची झोप उडाली आहे. उबाठा सेनेतील बहुतेक सर्व दिग्गज नेते शिवसेनेत किंवा भाजपात गेले आहेत. शिल्लक सेनेला बरोबर घेऊन पुन्हा सत्ता मिळवता येणार नाही, याची उद्धव ठाकरे यांना पूर्ण जाणीव आहे, म्हणूनच राज ठाकरे यांच्या मनसेने महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेशी युती करावी म्हणून त्यांना आळवणी करण्याची पाळी उद्धव यांच्यावर आली आहे.

गेले दोन-तीन महिने उबाठा सेनेकडून मनसेचे लक्ष वेधण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. उबाठा सेनेच्या मुखपत्रातून उद्धव व राज एकत्र असलेले छायाचित्र प्रसिद्ध करून जणू दोघे बंधू आता मनाने एकत्र आलेले आहेत, अशी हूल उठविण्यात आली. राज ठाकरे यांनी वेगळा पक्ष स्थापन केल्यापासून कधी नव्हे ते उद्धव यांना त्यांची राजकीय गरज भासू लागली आहे. उबाठा सेनेच्या सैनिकांनाही उद्धव - राज एकत्र येणार, म्हणून पक्षातून मधाचे बोट लावण्यात आले आहे. दि. १९ जूनला शिवसेना पक्षाचे दोन वर्धापन दिन मुंबईत साजरे झाले. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा वर्धापन दिन शीव येथील षण्मुखानंद सभागृहात, तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा वरळी डोममध्ये साजरा झाला. या दोन्ही मेळाव्यात मनसेची संभाव्य युती हा कळीचा मुद्दा राहिला. महापालिका निवडणुकीत राज ठाकरे कुणाबरोबर जाणार की स्वबळावरच लढणार? हे अद्याप गूढ आहे. ते स्वत: या विषयावर काहीच बोलत नाहीत. पण युतीचा मुद्दा निघाला की त्यांचे शिलेदार इतकी वर्षे उद्धव ठाकरे यांनी मनसेला कशी वागणूक दिली असा प्रश्न विचारून अनेक उदाहरणांचा पाढा उगाळतात. उबाठा सेना व मनसे यांच्या युतीच्या चर्चेला उधाण आले असतानाच मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई पश्चिम उपनगरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट घेतली आणि उबाठा सेनेबरोबर युतीच्या चर्चेला तडा गेला. षण्मुखानंद सभागृहातील मेळव्यात उद्धव ठाकरे यांनी मनसेबरोबर युतीच्या मुद्द्यावर बोलताना जे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे, तेच होईल असे वक्तव्य केले. या विषयावर निर्णय घेण्यास आम्ही सक्षम आहोत, इतरांनी त्याची चिंता करू नये, असेही त्यांनी बोलून दाखवले. उबाठा सेना व मनसे युतीविषयी भाजपाचे नेते बोलताना, दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ते चांगलेच आहे, अशी भूमिका मांडताना दिसतात. पण त्यांना नक्की ठाऊक आहे, हे दोघे बंधू एकत्र येण्याची शक्यता कमी आहे. उद्धव यांच्याकडून राज ठाकरे एकदा नव्हे तर अनेकदा कमालीचे दुखावले गेले आहेत, हे त्यांना कधीही विसरता येणार नाही. अविभाजित शिवसेनेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असताना पक्षात राज यांचे महत्त्व वाढता कामा नये, याची दक्षता उद्धव यांनी नेहमीच घेतली होती. निर्णय प्रक्रियेत राज यांना डावलण्यात येत होते. उमेदवार निवडताना राज यांच्या शिफारसीला किमत दिली जात नव्हती. राज यांनी स्वत:चा वेगळा राजकीय पक्ष स्थापन केला, त्यामागे अनेक कारणे आहेत. पण उद्धव यांनी आपल्या भावाची कदर कधीच केली नाही. राज ठाकरे यांनी आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यापासून उद्धव व राज यांच्यात कधीच सुमधुर संबंध नाहीत. एवढेच नव्हे तर शिवसेनाप्रमुख हयात असताही ते नव्हते. उद्धव यांनी पक्षात सर्वकाही हातात घेतल्यापासून दोघा भावांमध्ये दुरावा आहे. शिवसेनाप्रमुखांच्या अंत्ययात्रेतही राज यांना अवमानकारक वागणूक मिळाली होती हे कसे विसरता येईल?

महाराष्ट्रनामा
सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com



उबाठा सेनेला युतीसाठी घाई झाली असली तरी मध्यस्थ कोण आहे, एवढा परिपक्व, विश्वासू व दोघांनाही मान्य होईल असा नेता दोन्ही पक्षांत नाही. युती झाली तर बॉस कोण? जागा वाटप कसे होणार? दोघांची मदार मराठी मतांवर. मग माघार कोण घेणार? गेल्या वीस वर्षांत दोन्ही पक्षांत नवीन नेतृत्व निर्माण झालेले नाही. दोन्ही पक्षप्रमुख हेच दोन्ही पक्षांत सुप्रीम आहेत व त्यांच्याभोवतीच सारा पक्ष फिरताना दिसतो आहे. जरी दोन्ही पक्ष युती करायला तयार झाले तरी भाजपा त्यांना एकत्र येऊ देईल का? हा सर्वांत मोठा व कळीचा मुद्दा आहे.

राज्यात व केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यापासून मराठी माणसाची अवस्था वाईट झाली आहे. मराठी माणूस, मराठी भाषा व मराठी अस्मिता यांची गळचेपी चालू आहे. महाराष्ट्राला अवमानास्पद वागणूक मिळत आहे म्हणून मराठी माणसासाठी व महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव व राज यांनी एकत्र यावे अशी भावनिक मोहीम चालवली जात आहे. आमच्या वादांपेक्षा मराठी माणूस व महाराष्ट्र हित मोठे आहे असेही उबाठा सेनेने आवाहन केले आहे. ठाकरे बंधूच मराठी माणसाला वाचवू शकतील असे सांगण्यात आहे. पण या भावनिक जाळ्यात मनसे अडकणार नाही किंवा मनसेची तशी मानसिकता नाही असे आजचे तरी चित्र आहे.

मनसेबरोबर युती व्हावी यासाठी उबाठा सेना अगतिक झाली आहे. उबाठा सेनेला खूप घाई झाली आहे. एकनाथ शिंदे यांच्यात शब्दांत सांगायचे तर उबाठा सेना लाचार झाली आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार म्हणून राज्यात काही ठिकाणी पोस्टर्सही झळकले. मनसे सैनिकांच्या बरोबर उबाठा सेनेच्या सैनिकांच्या भेटी-गाठी वाढल्या आहेत. मनसे नेते भेटल्यावर उबाठा सेनेचे पदाधिकारी गळाभेटी घेत आहेत. पण हे सर्व एकतर्फी चालू आहे असे दिसते. एकीकडे भाजपा हा महाराष्ट्र व मराठी विरोधी आहे असे चित्र निर्माण करायचे व दुसरीकडे मराठी माणसाला वाचविण्यासाठी ठाकरे बंधूंनी युती करणे गरजेचे आहे असे सांगायचे अशी दुहेरी प्रचार मोहीम उबाठा सेनेकडून चालू आहे. मात्र उबाठा सेनेच्या आवाहनाला मनसेचा प्रतिसाद थंड आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई - विरार, मीरा - भाईंदर, अंबरनाथ तसेच पुणे, पिंपरी - चिंचवड, छ. संभाजी नगर, नाशिक अशा प्रमुख महापालिकांमध्ये मराठी मतांचे विभाजन होऊ नये यासाठी उबाठा सेना मनसेला बरोबर घेण्यासाठी उतावीळ झाली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना, उद्धव ठाकरे यांची उबाठा सेना आणि राज ठाकरे यांची मनसे असे तिन्ही पक्षांत मराठी मताचे विभाजन झाले, तर उबाठा सेनेचे सर्वाधिक नुकसान होणार आहे. भाजपा, काँग्रेसकडेही मराठी मतांचा टक्का आहे हे विसरून चालणार नाही. मराठी मतदारांची एकगठ्ठा मते एकाच पक्षाकडे अशी स्थिती नाही. भाजपाला मराठी मतांबरोबरच अमराठी मतांचा मोठा लाभ मिळतो ही या पक्षाची मोठी जमेची बाजू आहे. राज ठाकरे यांच्या संपर्कात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जसे आहेत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीयमंत्री व खासदार नारायण राणे, भाजपाचे अनेक नेते नियमित असतात. तसे उबाठा सेनेतून राज यांच्या संपर्कात उघडपणे कोण असते? आता महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेला एकदम राज ठाकरे यांच्या पक्षाची गरज भासू लागली यामध्ये स्वार्थाशिवाय दुसरे काय असू शकते

सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे काँग्रेसबरोबर गेले, मुख्यमंत्री झाले. तेव्हा निर्णय घेताना त्यांनी मतदारांना, पक्षातील पदाधिकाऱ्यांना किंवा शिवसैनिकांना कोणाला विश्वासात घेतले होते? तेव्हा मतदारांना विचारले होते का? तेव्हा राज ठाकरे यांना बोलावून चर्चा केली होती का, मनसेला काय वाटते अशी विचारणा केली होती का? शिवसेना पक्ष व चिन्ह हातातून गेले. फूट पडली. जेमतेम २० आमदार निवडून आले म्हणून उद्धव यांना राज यांची आठवण होते आहे का? चारच महिन्यांपूर्वी मनसेच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनाप्रमुखांचे फोटो लावले म्हणून उबाठा सेनेच्या नेत्यांनी व प्रवक्त्यांनी आक्षेप घेतला होता, मग आता एकदम मनसेची उबाठा सेनेला उचकी का लागते आहे? खरी शिवसेना कोणती हे एकनाथ शिंदे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दाखवून दिले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुन्हा एकदा मुंबईत येऊन ठणकावून सांगितले, यातच उबाठा सेनेने आपले भविष्य काय आहे हे समजून घ्यावे... कम ऑन किल मी... असे आवेशात आव्हान द्यायचे, अंगावर यायचे तर येताना ॲम्ब्युलन्स घेऊन या असे सांगताना, जाताना आडवे होऊन जाल अशी भाषा वापरायची, मग एवढी ताकद आहे, तर मनसेने युती करावी यासाठी अगतिकता कशासाठी? ७६ हजार कोटींचे बजेट असलेल्या मुंबई महापालिकेची निवडणूक ही उबाठा सेनेच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणूनच कोणी युती करताय का युती? असे विचारण्याची पाळी आली आहे...

## मुलाखत : जलक्षेत्रातील तांत्रिकतेच्या बाबत सुज्ञ असणे आवश्यक

आज महाराष्ट्र राज्य भीषण दुष्काळाच्या उंबरठ्यावर आहे किंबहुना आपण अगोदरच नो रिटर्न मर्यादा ओलांडली आहे. महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हायला हवा या दृष्टीने अनेकजण प्रयत्न करत आहेत. परंतु तरीसुद्धा जलसाक्षरता दृष्टीने आपण बाल्यावस्थेतच आहोत. तज्ञ, प्रशासन आणि लोकसहभाग यात कधी नव्हे एवढी मोठी दरी निर्माण झाली आहे. या सगळ्यात दुष्काळमुक्तीसाठी झटणारे म्हणून जे कोणी भूजल वैज्ञानिक आहेत यात सुरेश खानापूरकर, उपेंद्रदादा धोंडे अशी मोजकीच नावे आढळतात. यावितिरिक्त महाराष्ट्रात केंद्रीय भूजल विभाग आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा मधील भूजल वैज्ञानिक आणि काही खाजगी भूजल वैज्ञानिक सातत्याने प्रयत्नरत आहेतही परंतु ते कदाचित कायदे-नियमांच्या बंधनांमुळे प्रसिद्धीझोतात नसतात. महाराष्ट्राचे जलक्षेत्र अनेक सेलिब्रिटी आणि काही प्रसिद्ध जल महापुरुष वगैरे लोकांनीच व्यापलेले दिसते. मुळात महाराष्ट्राचे जलधोरण म्हणून आपण कुठे चुकत आहोत का? याचे आत्मपरीक्षण होत आहे असे काही दिसत नाही, या सगळ्या परिस्थितीकडे भूजल वैज्ञानिक म्हणून आपण कसे पाहतो या विषयावर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भूजल वैज्ञानिक उपेंद्रदादा धोंडे यांच्याशी केलेली ही चर्चा.

**१. महाराष्ट्र गेल्यावर्षी मुबलक पाऊस पडून देखील या उन्हाळ्यात ग्रामीण व शहरी भागात पाण्याची वानवाच का ?**

ज्या प्रमाणामध्ये पावसाच्या पाण्याचे भूजलात रूपांतर व्हायला हवे त्या प्रमाणात ते होत नाही. कारण आपले प्रयत्न तांत्रिक दृष्टीने योग्य नाहीत. महाराष्ट्राची जल निरक्षरता हे खरं तर एक मोठे आव्हान आहे. महाराष्ट्रातील जलक्षेत्रात स्वयंघोषित खड्डेखोरांनी धुमाकूळ माजवला आहे आणि यावर कुणाचेही नियंत्रण नाही. प्रशासन व लोकप्रतिनिधी देखील खड्डेखोरांचे समर्थन करताहेत. कुठलीही शैक्षणिक तांत्रिक पात्रता नसलेल्या लोकांना शासन समर्थन-प्रोत्साहन देत आहे. शिवाय सरकारी भूजल वैज्ञानिक देखील समोर येऊन बोलत नाहीत कारण त्यांना कुणाचीही नाराजी ओढवून घ्यायची नाही. म्हणूनच महाराष्ट्राचे जलक्षेत्र हे स्वयंभू जलतज्ञांच्या हवाली करणे हेच खरे दुष्काळाचे कारण आहे.

**२. जलतारा सारख्या प्रकल्पाबाबत आपले मत काय ? हा प्रकल्प नेमका फायदेशीर आहे का ? कसा ?**

दरवेळी कुणीतरी उठतो आणि काहीतरी संकल्पना मांडतो. सदरच्या संकल्पनेची प्रसिद्धीमाध्यमं आणि प्रशासन-लोकप्रतिनिधी मार्फत प्रसिद्धी करवून घेतो आणि लोकांना आकर्षित केले जाते. हे करत असताना तज्ञांना मात्र जाणीवपूर्वक दूर ठेवले जाते कारण ते अशा गोष्टीतला फोलपणा उघड करत असतात. दर दोन-चार वर्षांनी अशी कुठली तरी संकल्पना येते प्रसिद्ध होते आणि कालौघात विरून जाते. त्याच्या यशापयशाचे कसलेही मूल्यमापन होत नाही, अथवा कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित केली जात नाही. उदाहरणार्थ जलतारा व शोषखड्डा यात तसा विशेष काही फरक नाही. ही संरचना फक्त उथळ जलधराला काही अंशी रिचार्ज करणारी योजना आहे. यातून दुष्काळमुक्तीचे स्वप्न पाहणे म्हणजे मूर्खपणा आहे. शोषखड्डा, मैजिक पिट इत्यादी नावाने हि संरचना पुर्वीपासूनच आहे. परंतु ती आजवर बहूप्रचलित होऊ शकली नाही कारण त्याची मर्यादित यशस्वीता. डासमुक्त परिसरासाठी शोषखड्डा हि संकल्पना निर्माण झाली होती आणि सोबतच यात निश्चितपणे काही प्रमाणात उथळ जलधर हा खात्रीनं रिचार्ज होतो यामुळे तिला पुनर्भरण संरचना देखील मानले गेले. परंतु या संरचनेची व्याप्तीच अत्यंत मर्यादित असल्याने, अर्थात संरचनेसाठी येणारा खर्च आणि तुलनेत फायदा याचे प्रमाण व्यस्त असल्याने, याची फार काही यशस्वीता आढळली नाही त्यामुळे हि योजना तशी उपयुक्त व सुलभ असूनही लोकप्रिय होऊ शकली नाही. म्हणूनच फक्त प्रसिद्धीचा ढोल वाजवत कोणत्याही योजनेला लोकप्रिय करण्याचे तंत्र दिर्घकाळ टिकत नसते, लवकरच लोकांना त्यातला फोलपणा समजतो परंतु दुर्दैवाने तोवर लोकांचे मोठे नुकसान होऊन गेलेले असते. अर्थात जसा शासनाला जाब विचारला जातो तसा जाब या स्वयंघोषित जल महापुरुषांना विचारला जात नाही.

**३. शेतीत सिंचन व्यवस्था मजबूत करण्यासाठी जल संधारण म्हणून नेमकं काय केलं पाहिजे ? शेतकऱ्यांनी वैयक्तिक लाभासाठी काय केलं पाहिजे?**

तज्ञांच्या सल्ल्याने गावस्तरावर जल आराखडा तयार करून त्रिस्तरीय पुनर्भरणाचे नियोजन केले पाहिजे. यात वैयक्तिक पातळीवर करण्याच्या पद्धती, सामूहिक पातळीवरील उपक्रम आणि शासकीय मदतीने, अशा प्रकारे कामांचे नेमकेपणाने वर्गीकरण केले पाहिजे. सहज जलबोध अभियानात आपण हे वर्गीकरण केले आहे. याशिवाय केंद्रीय भूजल विभाग तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यामध्ये तज्ञ प्रशिक्षित भूजल वैज्ञानिक आहेत त्यांच्या तज्ञतेचा योग्य वापर केला गेला पाहिजे. जसे सामान्य माणसाला जलसंधारणासाठी भूजल वैज्ञानिकाचे महत्त्व समजले पाहिजे तसेच ते सेलिब्रिटी व लोकप्रतिनिधींना देखील कळले पाहिजे.

**४. शेततळे योजना हि महाराष्ट्रात खूप लोकप्रिय होताना दिसत आहे पण खरंच ती फायदेशीर आहे का ?**

होय, शेततळे हे निश्चित उपयुक्त आहे पण जर ते भूजलाचा उपसा करून भरले जात असेल तर मात्र ते मोठ्या प्रमाणात धोकेदायक ठरते. कोणत्याही पाणलोटात एका निश्चित संख्येपेक्षा जास्त शेततळी करणे धोकेदायक आहे. शेततळ्यापेक्षाही अधिक उपयुक्त असलेले पाझर तलाव दिवसेंदिवस नष्ट होत आहेत यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या हद्दीत लहान आकाराचे पाझर तलाव ज्याला आम्ही भैरव कुंड असे नाव दिले आहे अशा प्रकारचे लहान लहान तलाव निर्माण केले पाहिजेत तेच खऱ्या अर्थाने परिसराला दुष्काळमुक्त करू शकतात. या विषयावर अधिक माहितीसाठी लोकांनी प्रशिक्षित भूजल वैज्ञानिकास संपर्क साधला पाहिजे.

**५. सरकारी भूजल वैज्ञानिक म्हणून तुमचे पुढील जलक्षेत्रातील उद्दिष्ट काय ? महाराष्ट्रातील जलक्षेत्रासाठी तुम्ही काय उपाय सांगाल ?**

केंद्रीय भूजल विभागाची काम करण्याची निश्चित पद्धती आहे. यामध्ये संशोधन आणि जलधरांचे व्यवस्थापन मोजमाप या गोष्टी महत्त्वाच्या असतात. परंतु केंद्रीय भूजल विभागाच्या मार्फत उपभोक्त्यांसाठी थेट योजना नसतात. थोडक्यात केंद्रीय भूजल विभागाचे काम म्हणजे राज्याच्या जलधरांची नेमकी स्थिती सांगणे आणि त्यावर उपाय सुचवणे हे आहे. खरंतर राज्य सरकारांनी कोणत्याही प्रकारची जलसंधारण योजना राबविण्यापूर्वी केंद्रीय भूजल विभागाचा, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या विभागातील तज्ञ भूजल वैज्ञानिकांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्रीय भूजल विभागाच्या ध्येयधोरणांचा, तांत्रिक माहितीचा लोकांना अधिकाधिक परिचय व्हावा आणि महाराष्ट्राच्या जलसाक्षरतेसाठी त्याचा फायदा व्हावा यासाठी आपल्या कूवतीनुसार जास्तीत जास्त प्रयत्न करणे प्रत्येक भूजल वैज्ञानिकाचे कर्तव्य आहे ते मी माझ्या परीने पार पाडत राहीलच. या सोबतच मी विषयतज्ञ म्हणून आणि सहज जलबोध अभियानाची भुमिका म्हणून लोकांपर्यंत जलक्षेत्रातील तांत्रिकता नेमकेपणाने पोहोचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करील.

**मयुर बाळकृष्ण बागुल.**
**राज्य समन्वयक सहज जलबोध अभियान, महाराष्ट्र**
**चलभाषा ९०९६२१०६६९**

## ज्याठिकाणी श्रद्धा विश्वास आस्था असेल त्याठिकाणी मार्ग मिळतो : आचार्यश्री सुवीरसागरजी गुरुदेव

**नागपूर, २१ जून :** ज्याठिकाणी श्रद्धा, विश्वास, आस्था असेल त्याठिकाणी मार्ग मिळतो असे उदबोधन जैन आचार्यश्री सुवीरसागरजी गुरुदेवांनी बाहुबलीनगर येथील श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिराच्या वेदी शिलान्यास कार्यक्रमात दिले.

कार्यक्रमात दीप प्रज्वलन भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय महामंत्री संतोष जैन पेंढारी, श्री पार्श्वोदय तीर्थ नागठाणाचे अध्यक्ष डॉ. अरविंद भागवतकर, दिलीप राखे, सतीश जैन पेंढारी, पवन कान्हीवाडा, राकेश पाटणी, पंकज बोहरा, जितेंद्र तोरावत, किशोर मेंढे, हुकुमचंद सेठी, उल्हास क्षीरसागर, अशोक लाड, नितीन महाजन, अरुण पाटोदी, सुनील जैन पेंढारी, महेंद्र जैन, प्रशांत मानेकर, शशिकांत बानाईत, माजी उपमहापौर मनीषा कोठे, प्रा. उमेशचंद्र सरोदय, श्रीकांत मानेकर, सुधीर सिनगारे यांनी केले.

सकाळी जिनेंद्र भगवंताचा अभिषेक, पूजन, वास्तू विधान संपन्न झाले. शांतीधारा पदमा अरविंद कहाते यांनी केली. प्रतिष्ठाचार्य पं. संदीप जैन दौंड यांच्या मार्गदर्शनात पूजन विधी संपन्न झाला. संगीतकार शुभांगी जैन अमरावती यांनी सुमधुर आवाजात पूजनाची प्रस्तुती सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन नखाते यांनी केले. वेदीचा शिलान्यास डॉ. चंद्रनाथ जिवंधरजी भागवतकर यांनी केला. समृद्धी दर्यापूरकर, प्रमोद राखे, उल्हास जैन यांचे सहकार्य प्राप्त झाले. प्रथम कुर्म शीला जगदीश, विनोद, सोनासाव, आरती, येशू गिल्लरकर परिवाराने केली. आठ शीला डॉ. प्रांजली सावरकर, वर्षा राजेंद्र बंड, माधुरी जैन, जयंत सोईतकर, दीपिका व दिवाकर मांडवेकर, प्रकाश पळसापूरे, रिना राजेंद्र पिंजरकर, नितीन नखाते यांनी स्थापित केल्या.

नवग्रह पूजन अतिशय दीपेश जैन, आरोही सावरकर, कु. नित्या दर्यापूरकर, हर्ष भुसारी, सोहम मखे, आर्या सारंग कस्तुरे, शौर्य महात्मे, पवन दिलीप राखे, देवांश शहाकार, शर्वरी प्रमोद भागवतकर, अभिजीत जुननकर, विवान प्रणय राखे, मनस्वी मांडवगडे, आरना सागर तुपकर, समीक्षा उमेश मचाले, स्वर्णिमा जितेंद्र जैन, मिताली रोशन भुसारी, तीर्थ्या मुकेश पळसापूरे, अमूल्या अतुल येळवटकर, अधीर हितेश गडेकर यांनी पूजन केले.

आमदार कृष्णा खोपडे यांनी वेदी शिलान्यास कार्यक्रमात उपस्थित राहून आचार्यश्री सुवीरसागरजी गुरूदेवांचा आशीर्वाद घेतला आणि ते म्हणाले मंदिराचे काम पूर्ण होताच याठिकाणी एक शेड टाकून देण्यात येईल.


## आज का अंदाज

सोमवार २३ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २४५ | २४८ | १६० | २२८ | २४६ | २५८ | १६९ | ८९० |
| ५६० | ३४७ | २५० | ३७८ | ३९० | ७८० | ३३० | ७०० |
| ४८९ | ४४६ | ३४० | ४७७ | ३५७ | ३५७ | २४० | ४४९ |
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७३ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २९ | ५१ | ६४ | ७४ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २१ | ५९ | ६३ | ७८ |

२३ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ |
| २० | ३० | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या ह्दयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या ह्रुदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनमलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. जून रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंड देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**



## राशीभविष्य

**मेष :** आज चांगल्या कामात अडथळे येऊ शकतील. पण थोडे प्रयत्न केल्यास परिस्थिती अनुकूल होऊ लागेल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. पूर्वी प्रलंबित असलेले काही काम पूर्ण होतील.

**वृषभ :** आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. पूर्ण होत आलेल्या कामात बरेच अडथळे येतील. पण हळूहळू परिस्थिती अनुकूल होईल. तुमच्या भावनांना योग्य दिशा द्या. गायन क्षेत्रात सक्रियता वाढेल.

**मिथुन :** काही व्यावसायिक सहकार्यामुळे तुमच्या व्यवसायाला गती मिळेल. तुम्हाला तुमच्या वडिलांकडून पाठिंबा आणि साथ मिळेल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल.

**कर्क :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल.

**सिंह :** एखाद्या काही महत्त्वाच्या कामात अनावश्यक विलंब होऊ शकतो. तुम्ही व्यवसायात अत्यंत व्यस्त राहाल. सामाजिक कामात तुमची भूमिका महत्त्वाची असेल. प्रकृतीकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे

**कन्या :** कोणत्याही वादात पडूनका. अन्यथा तुम्ही अनावश्यक समस्यांमध्ये अडकू शकता. वाईट सवयी सोडून द्या. प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाने काम करा. यश नक्की मिळेल.

**तुळ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना नोकर, वाहन इत्यादी सुविधा मिळतील. आज बँकेत जमा असलेल्या भांडवलाची रक्कम वाढेल. खूप महत्त्वाचे काम यशस्वी होईल.

**वृश्चिक :** नातेवाईकांशी परस्पर मतभेद निर्माण होऊ शकतात. धार्मिक कार्यात रस वाढेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. व्यवसायातील तुमच्या समजूतदारपणामुळे मोठ्या नुकसानापासून वाचाल.


**धनु :** विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडथळे दूर होतील. तुम्हाला व्यावसायिक मित्राचा पाठिंबा आणि संगत मिळेल. चित्रकला कामात सहभागी असलेल्या लोकांना लक्षणीय यश आणि आदर मिळेल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी नफा आणि प्रगतीचा असेल. तुम्ही आधीच नियोजित केलेल्या कामांमध्ये यशस्वी व्हाल. विरोधकांपासून सावध रहा. तुमच्या योजना उघड करू नका.

**कुंभ :** व्यवसायात तुम्हाला कुटुंबातील सदस्याचा पाठिंबा आणि साथ मिळेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकंती करावी लागेल. तुम्हाला शारीरिक श्रम करावे लागू शकतात.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. तुमचे वर्तन लवचिक बनवण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी गोंधळ निर्माण होऊ देऊ नका. जमीन, इमारत, वाहन यांच्याशी संबंधित कामात तुम्हाला अधिक रस असेल.

## शब्दकोडे क्रमांक २१४४



**आडवे शब्द :-**

१) बातमी
४) बगल
६) जाणून-बुजून, हटकून
८) अधिक महिना
१०) लिंबू, साखर पाण्याचे पेय
१२) तुकडा, चावा
१३) पिता
१४) वेदना
१५) पत्र
१७) पृथ्वी
१९) एक आदिवासी जमात
२१) कुबेराचा सेवक
२२) एकाद्याच्या वतीने घातलेली भीड
२५) हाण! मार!
२७) धपाटा
२८) ओलसर हवा
३०) मर्यादा हद्द
३२) कोलकाताचे विमानतळ
३४) बारीक -सारीक
३६) आपले राष्ट्रगीत
३९) मान्यतेचा शब्द
४०) टिंगल
४१) **** कमीज एक पोषाख
४२) सत्ता
४४) दोरा
४६) प्रामाणिक
४७) रत्न
४९) फांदी तुटतानाचा आवाज
५१) धोका
५३) साल
५६) अवघड, कडक (इं.)
५७) कमीतकमी
६०) माफ
६१) संगीतातील एक राग
६२) जोखड
६३) चामखीळ
६४) त्वरा
६५) बशीचा जोडीदार
६७) चाबूक
६९) थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
७२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७३) दुर्गंधी येऊ लागलेला
७५) बारीक खांब
७६) युद्ध
७७) गीत
७८) दही घुसळण्याचे साधन
७९) पोलीस

**उभे शब्द :-**

१) वाळा
२) भरभराट
३) घासणे (इं)
५) दुष्ट माणूस
६) गुमान, मुकाट्याने
७) टप्प्याटप्पा घेत घेत
८) मध
९) गुरुजी
११) सिद्धता
१६) झाडाभोवतीचा कट्टा
१८) चीर, भेग, फट
१९) मंगळवेढ्यात जन्मलेली एक स्त्री संत
२०) तलवार
२३) कलंक
२४) घोडा, गाढवाची विष्ठा
२६) फूल, पुष्प
२९) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
३२) पानासकट कोवळी फांदी
३३) समुद्रकिनारा
३५) पुरुष
३७) बाज विणण्याची कापडी पट्टी
३८) नूतन
४१) नवऱ्याची दुसरी पत्नी
४३) सरसकट
४४) भीती, वचक, दरारा
४५) गवंड्याकडील दोरीचे एक साधन
४६) शर्करा
४८) मवाळ धोरण
५०) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५२) जबरदस्तीने लावलेला विवाह
५४) लोकर (इं.)
५५) मध्यस्थ
५८) लज्जास्पद
५९) स्थान, जागृत
६३) अंत:करण
६६) वारा
६८) मच्छर
६९) सटवाई, दुष्ट स्त्री
७०) छोटी विश्रांती
७१) मृत्यु नसलेला
७४) हात
७६) सदोदित, नेहमी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर



# फुकट्यांना 'बेस्ट'चा चाप
## ५.४७ लाखांचा दंड वसूल

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

तिकीट तपासनीसांची कमतरता, विनावाहक बससाठी नियोजनाचा अभाव आदी कारणांमुळे बेस्ट बसमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांची वाढतच आहे. १ एप्रिल २०२४ ते १ मे २०२५ दरम्यान 'बेस्ट'ने ९ हजार ८४८ फुकट्या प्रवाशांवर कारवाईचा चाप लावत त्यांच्याकडून ५ लाख ४७ हजारांचा दंड वसूल केला आहे.

बेस्ट ही मुंबईकरांची सेकण्ड लाईफलाईन आहे. दिवसाला सुमारे ३० ते ३२ लाख प्रवासी बेस्ट बसमधून प्रवास करतात. बेस्टच्या अपुऱ्या संख्येमुळे बसला प्रचंड गर्दी असते. याच गर्दीचा फायदा घेत विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत आहे. अनेकदा गर्दीत विनातिकीट प्रवासी हात दाखवून 'पास' असे सांगत निसटण्याचा प्रयत्न करतात. परिणामी फुकट्या प्रवाशांमुळे बेस्टचे आर्थिक नुकसान होते. पूर्वी तिकीट तपासणीसाठी असलेल्या मशीन बंद असल्याने, तिकीट तपासणी आणि विक्रीमध्ये अडचणी येत आहेत, ज्यामुळे फुकट्या प्रवाशांना संधी मिळत आहे. बेस्ट प्रशासनाने विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दंड वसूल केला आहे, तरीही फुकट्या प्रवाशांची संख्या कमी होताना दिसत नाही.

'बेस्ट' ने ऑक्टोबर २०१९ मध्ये विनावाहक बस सुरू केल्या. या बसमध्ये वाहक नसतो. बस थांब्यावरच उभे असलेले वाहक प्रवाशांना तिकीट देतात. गर्दीच्या वेळी काही प्रवासी मधल्या थांब्यांवरून बसमधून विनातिकीट प्रवास करतात. तर, काही वेळा बस थांब्यावरच तिकीट देण्यासाठी वाहक नसतो.

सध्या 'बेस्ट'कडून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून भाडे, तसे प्रवासी भाड्याच्या रकमेच्या दहापट एवढी रक्कम दंड म्हणून आकारण्यात येतो. दंड भरण्यास नकार दिल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८० च्या कलम ४६० (ह) अन्वये एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या कारावासाची किंवा २०० रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा एकत्रितपणे देण्याची तरतूद आहे.

# तलावांमधील पाण्याच्या पातळीत वाढ

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी



मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलाव क्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून समाधाकारक पाऊस पडला. त्यामुळे तलावांतील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. बुधवारी ३३.०० मिमी ते २३५ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली. गेल्या २४ तासांत तलाव क्षेत्रात ६४.०० मिमी ते १४३ मिमी इतका पाऊस पडला. त्यामुळे तलावांत ३,६४,२३३ दशलक्ष लिटर म्हणजे २५.१७टक्के इतका पाणीसाठा जमा झाला आहे. हा पाणीसाठा ९१ दिवस म्हणजेच १८ सप्टेंबरपर्यंत पुरेल इतका आहे.

मुंबईला दररोज ३,८५० दशलक्ष लिटर आणि ठाणे, भिवंडी महापालिकेला दररोज १८० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा मुंबई महापालिकेकडून करण्यात येतो. मुंबई महापालिकेकडून गुरुवारी सकाळी ६ वाजेपर्यंत सात तलावात मिळून १,९०,७७१ दशलक्ष लिटर इतका म्हणजे ४७दिवस पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक होता. मात्र गेल्या २४ तासांत पाणीसाठ्यात मोठी वाढ झाल्याने सात तलावातील हा पाणीसाठा आता ३,६४,२३३ दशलक्ष लिटर इतका झाला आहे. हा पाणीसाठा पुढील ९१ दिवस म्हणजे १८ सप्टेंबरपर्यंत पुरेल झाला आहे.

गेल्या आठवड्यात सात तलावातील पाणीसाठ्याची पातळी ९ टक्के होती. त्यामुळे पाणीकपातीची टांगती तलवार होती. मात्र गेल्या तीन-चार दिवसात तलाव क्षेत्रात समाधानकारक पाऊस पडल्याने तलावातील पाणीसाठ्यात वाढ होऊ लागली आहे. मुंबईला दररोज ३,८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. मुंबईला पावसाळा संपल्यावर १ ऑक्टोबरपासून पुढील वर्षभरासाठी सात तलावांत मिळून एकूण १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर इतक्या पाणीसाठ्याची गरज असते. त्यामुळे मुंबईकरांना वर्षभर पाणीकपातीच्या संकटाला तोंड द्यावे लागत नाही. मात्र जर पाणीसाठा कमी असेल तर मुंबईकरांवर किमान ५ टक्के ते २० टक्के इतक्या पाणीकपातीच्या संकटाला तोंड द्यावे लागते.

# श्वान पथकाची कार्यक्षमता वाढवणार

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

मुंबई पोलिस त्यांच्या श्वान पथकाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी एक मोठे पाऊल उचलत आहे. या अंतर्गत, अंधेरी पूर्वेतील मरोळ पोलिस प्रशिक्षण केंद्रात १० कोटी खर्चुन एक अत्याधुनिक केनेल कॉम्प्लेक्स बांधले जाणार आहे. या सुविधेमुळे सेवेत असलेल्या श्वानांसाठी निवास, प्रगत प्रशिक्षण आणि चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील. या उपक्रमामुळे मुंबई पोलिसांच्या डॉग युनिटची कार्यक्षमता आणि श्वानांची काळजी घेण्यास येणार आहे.



पोलिस सूत्रांनुसार, मुंबई पोलिसांकडे सध्या जर्मन शेफर्ड, बेल्जियन मलिनॉइस, लॅब्राडोर आणि डोबरमनसह विविध जातींचे ३३ श्वान आहेत. हे श्वान अंमली पदार्थ विरोधी, बॉम्ब शोध आणि निकामी करणे आणि व्हीआयपी सुरक्षा अशा युनिटमध्ये तैनात आहेत. प्रत्येक श्वानाची काळजी आणि व्यवस्थापनासाठी दोन पोलिस कॉन्स्टेबल नियुक्त केले जातात. १.५ कोटींहून अधिक लोकसंख्येचे रक्षण करण्यासाठी ५२,००० हून अधिक कर्मचाऱ्यांचे प्रचंड पोलिस दल असूनही, मुंबई पोलिस त्यांच्या अतुलनीय ट्रॅकिंग आणि डिटेक्शन क्षमतेसाठी त्यांच्या कॅनेन स्क्वॉडवर खूप अवलंबून आहेत.

श्वान पथक दोन प्राथमिक विभागात विभागले गेले आहे. गुन्हे शाखेच्या अंतर्गत काम करणाऱ्या एका विभागात आठ श्वान अंमली पदार्थ शोधण्यासाठी आणि गुन्ह्यांच्या ठिकाणाचा मागोवा घेण्यासाठी प्रशिक्षित आहेत. दुसऱ्या विभागात बॉम्ब शोधण्यासाठी आणि व्हीआयपी सुरक्षा कर्तव्यांसाठी २४ श्वान तैनात आहेत. नवीन सुविधेमुळे मुंबई पोलिसांच्या कॅनाइन युनिटची कार्यक्षमता वाढणार आहे.

या श्वानांसाठी आधुनिक निवास सुविधेची दीर्घकाळापासूनची मागणी अखेर गृह विभागाने मंजूर केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. होणाऱ्या संकुलात केवळ ५० श्वानच राहणार नसून तर वैद्यकीय मदतीची आवश्यकता असलेल्या आजारी किंवा जखमी श्वानांसाठी एक आयसोलेशन वॉर्ड देखील असेल.

# जिम ट्रेनरने केली रेल्वेखाली आत्महत्या

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

टिळक नगर आणि चेंबूर रेल्वे स्थानकांदरम्यान कर्जाच्या तगाद्याने कंटाळलेल्या एका २५ वर्षीय जिम ट्रेनरने लोकल ट्रेनसमोर उडी मारून आत्महत्या केली आहे. मृताचे नाव राहुल विश्वकर्मा असे आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आत्महत्या करण्यापूर्वी राहुलने त्याच्या मोबाईल फोनवर काही व्हिडिओ संदेश रेकॉर्ड करून अपलोड केले होते. ज्यामध्ये त्याने चार लोकांची नावे घेतली होती. त्यांनी त्याला मानसिक छळ करून आत्महत्या करण्यास भाग पाडल्याचा आरोप होता. व्हिडिओमधील मजकुराच्या आधारे, वडाळा रेल्वे पोलिसांनी चारही आरोपींविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. राहुल हा धारावीचा रहिवासी होता आणि एका खाजगी फिटनेस सेंटरमध्ये जिम ट्रेनर म्हणून काम करत होता. तो नुकताच जयपूरहून एका मैत्रिणीला भेटून परतला होता. परतताना त्याने टिळक नगर आणि चेंबूर रेल्वे स्थानकांदरम्यान ट्रेनसमोर उडी मारून आत्महत्या केली. राहुलने एका आरोपीकडून वैयक्तिक कर्ज घेतले होते. त्याने काही रक्कम परत केली असली तरी, उर्वरित हप्ते तो भरू शकला नाही. यामुळे, चारही आरोपी त्याला सतत त्रास देऊ लागले होते.

# पालिका शाळेतच मिळणार करिअरचे मार्गदर्शन

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाने आपल्या माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी आणि दहावी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन पद्धतीने करिअर संदर्भात मार्गदर्शन करण्याचा निर्णय घेतला आहे. इयत्ता दहावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर भविष्यात योग्य शाखेची निवड करणे तसेच स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या हेतूने विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने करिअर मार्गदर्शन देण्यासाठी पालिकेने हे पाऊल उचलले आहे. यासाठी तज्ञ मार्गदर्शकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून ते विद्यार्थ्यांना करिअर बाबत मार्गदर्शन करणार आहेत.

पालिका शिक्षण विभागाच्या ४९ माध्यमिक शाळा असून यामध्ये नववी आणि दहावी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची आवड, त्यांची क्षमता, त्यांचा एखाद्या क्षेत्राकडे असणारा कल ओळखण्यासाठी सोप्या प्रश्नावलीच्या साह्याने त्यांचा एकूणच कल ओळखून त्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दहावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अकरावीत नेमका कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा यापासून व्यावसायिक शिक्षण, स्किल डेव्हलपमेंट, डिप्लोमा कोर्सेस, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंग, ग्रीन टेक्नॉलॉजी अशा विविध क्षेत्रांची माहिती करिअर मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. या क्षेत्रातील तज्ञ विद्यार्थ्यांना दर शनिवारी हे करियर मार्गदर्शन करणार आहेत. यामुळे दहावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर होणारा गोंधळ थांबणार असून सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना आपले स्वतःचे भविष्य निवडण्यास मदत होणार आहे.

# 'एचएसआरपी'साठी दिली मुदतवाढ

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवण्याचे निर्देश दिले होते. मात्र तरीही अनेकांनी हा नियम पाळला नाही. त्यामुळे आता पुन्हा ही मुदत येत्या १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. मात्र आता जर हा नियम पाळला नाहीतर अशा वाहनांवर दंडात्मक कडक कारवाई करण्याचा इशारा परिवहन आयुक्त कार्यालयाने दिला आहे.

याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने एक परिपत्रक काढले आहे. त्यात १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (HSRP) बसविण्याबाबत आवाहन केले आहे. या काळात नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी ३१ मार्च २०२५ पर्यंत बसविण्याचे निर्देश देण्यात आले होते. 101 त्यानंतर जुन्या वाहनांना MB11' उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र सध्या अनेक जुन्या वाहनांवर एचएसआरपी पाटी बसविणे बाकी असून, ती बसविण्यासाठीची मुदत वाढवून देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. अनेक कारणांमुळे ही

पाटी बसवण्यात अनेकांचा हलगर्जीपणा झालेला आहे. त्यामुळे या आता काढलेल्या परिपत्रकाद्वारे १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना HSRP बसविण्यासाठी आता १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविणाऱ्या वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तर या मुदतीत ही पाटी बसविण्यासाठी पुढील अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहन मालकांवर कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

### सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक अधिकाऱ्यांना दिले गेले आदेश

दरम्यान, याबाबतचे आदेश मुंबईसह इतरही सर्व सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यात म्हटले आहे की, आपल्या कार्यक्षेत्रात याबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. तसेच स्थानिक वाहन वितरक, ऑटोरिक्षा टॅक्सी बस ट्रक संघटनांची बैठक घेऊन याबाबत सर्वांना अवगत करावे.

# निरंकारी मिशनतर्फे आयोजित ६५ योग शिबिरांमध्ये भक्तगणांचा उत्साहपूर्ण सहभाग

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने २१ जून रोजी संत निरंकारी मिशनच्या वतीने संपूर्ण भारतातील त्याच्या १००० हून अधिक शाखांमध्ये योगाभ्यास प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले. मुंबई महानगर प्रदेशात सुमारे ६५ ठिकाणी ही योगाभ्यास शिबिरे ठेवण्यात आली होती ज्यामध्ये शेकडोंच्या



संख्येने महिला व पुरुष भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. मुंबई व आस-पासच्या भागामध्ये पावसाळी वातावरणाचा विचार करुन हे आयोजन मुख्यत्वेकरुन जागोजागी असलेल्या संत निरंकारी सत्संग भवनांमध्ये करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी स्थानिक योग प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली भाविक-भक्तगणांनी योगासने केली आणि योगाचे जीवनातील महत्व या विषयावर मार्गदर्शन प्राप्त केले व त्यातून नियमितपणे योगाभ्यास करण्याची प्रेरणा प्राप्त घेतली. सर्व ठिकाणी हे कार्यक्रम सकाळी ६ ते ७ या वेळात आयोजित करण्यात आले.

मुंबईतील चेंबूर, नेव्ही नगर, वडाळा, दादर, विलेपार्ले, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, घाटकोपर, विक्रोली, भांडूप, मुलुंड या ठिकाणांशिवाय ठाण्यातील पाचपाखाडी, कळवा, वागळे इस्टेट तसेच भाईंदर, नवी मुंबईतील सानपाडा, वाशी व ऐरोली (साठे नगर), खारघर, उरण इत्यादि ठिकाणांचा या कार्यक्रमांमध्ये समावेश होता. या व्यतिरिक्त डोंबिवली परिक्षेत्रामध्ये डोंबिवली, ठाकुर्ली, गोग्रासवाडी, सोनारपाडा, कल्याण, द्वारली पाडा, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ, बदलापुर, शहापुर, टिटवाला, वाशिंद, कसारा, सावर्णे इत्यादी ठिकाणी हे आयोजन करण्यात आले. या शिवाय पालघर जिल्ह्यामध्ये नारिंगी (विरार), नालासोपारा, वालीव (वसई), बोईसर व नगावेपाडा या ठिकाणी योग प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले. अशा प्रकारे मुंबई महानगर प्रदेशामध्ये जवळपास ६५ ठिकाणी योग प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

# सत्ताधारी घाबरत असल्याने मला विरोधी पक्षनेतेपद मिळत नाही : भास्कर जाधव

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

सत्ताधारी कितीही बलाढ्य असला तरी त्यांच्या डोळ्यांत डोळे घालून जाब विचारण्याची ताकद असते तो विरोधी पक्षनेता असतो. त्यामुळे विधानसभेत मला विरोधी पक्षनेतेपद मिळेल असे वाटत होते. पण सत्ताधारी मला घाबरत असल्याने ते पद मला मिळू शकले नाही, अशी भूमिका शिव सेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केली. मी आतापर्यंत आठ वेळा निवडून आलेलो आहे. माझ्या घराण्यात कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. मी एकमेव राजकारणात प्रवेश केलेली व्यक्ती आहे. मला दिलेले काम मी नेहमी प्रामाणिकपणे करतो. राजकारणात सर्वस्व झोकून देऊन काम केले आहे, तशाच पद्धतीने समाजकारणात केले आहे. पण क्षमतेप्रमाणे काम करायला संधी मिळाली की आनंद वाटतो. काम करायला हुरूप येतो. माणूस अधिक जोमाने काम करतो, असे सांगत पक्षातून मला कोणीही बाजूला केलेले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राजकारण, समाजकारण, उत्सव, शेतीत मी रमतो, पण आता मनात राजकारणातून निवृत्ती घ्यावी असे येऊ लागले आहे. सत्तरी जवळ आली अशावेळी शेवटच्या क्षणी विरोधी पक्षनेतेपद मिळेल असे वाटले होते. पण सत्ताधारी पक्ष मला घाबरत असल्याने हे शक्य होऊ शकले नाही. कारण विरोधी पक्षनेता कसा असावा, वैधानिक कामे कशी करायची हे सत्ताधाऱ्यांना आणि महाराष्ट्राला दाखवून द्यायचे होते. स्वतःचा स्वार्थ काही नाही, असेही जाधव म्हणाले. सत्ताधारी पक्ष माळवणकरांचा संदर्भ देऊन दहा टक्के आमदारांचा नियम पुढे करतात. पण मी कायदा कोळून प्यायलो आहे, असे सांगत जाधव म्हणाले, ज्या पक्षाचे आमदार जास्त त्या पक्षाचा विरोधी पक्षनेता हे घटनेत लिहिलेले आहे. पण सत्ताधारी पक्षाला घटना मान्य नाही, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

# मतांची चोरी उघड होऊ नये म्हणून 48 तासांत नियम बदलला
## काँग्रेसचे नेते नाना पटोले यांचा आरोप

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

निवडणूक आयोग मोदी सरकारच्या हातातील बाहुले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी करून भाजप युती सरकार सत्तेत आले आहे. निवडणूक प्रक्रियेत गडबड करून महाराष्ट्रातील निवडणुकीत झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी असता आयोग समाधानकारक उत्तर देत नाही. हरियाणा निवडणुकीतही असाच घोटाळा करण्यात आला. चंदिगड उच्च न्यायालयाने मतदानासंदर्भातील सर्व माहिती आणि दस्तावेज देण्याचा आदेश आयोगाला दिला होता. पण आपली चोरी पकडली जाणार या भितीने आयोगाने मोदी सरकारच्या मदतीने अत्यंत घाईने अवघ्या ४८ तासात नियम ९३ बदलल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी शुक्रवारी नागपूरमध्ये बोलताना केला.

विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ५८ टक्के असलेले मतदान दुसऱ्या दिवशी ६५ टक्क्यांच्या वर वाढवण्यात आले. ही वाढ ८ टक्क्यांची असून ते जवळपास ७६ लाख मतदान आहे. हे ७६ लाख मतदान कसे वाढले, यावर निवडणूक आयोग सविस्तर खुलासा करत नाही. संध्याकाळी ५ नंतरच्या मतदानाचे सीसीटीव्ही फूटेज देण्याची मागणी केली, पण माहिती देता येणार नाही असा नियमच करून टाकला. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आठवडाभराच्या आतच १७ डिसेंबर २०२४ रोजी निवडणूक आयोगाने केंद्रीय कायदा मंत्रालयाला पत्र लिहून लोकप्रतिनिधी कायद्याच्या नियम ९३ मध्ये बदल करण्याची विनंती केली. नियम ९३ नुसार मतदानानंतरचे दस्तऐवज आणि माहिती मागवता येते. पण ही माहिती जनतेपर्यंत पोहोचू नये यासाठी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाने अत्यंत वेगाने हालचाली केल्या. १९ डिसेंबर रोजी आयोगाने कायदा मंत्रालयाला पत्र



पाठविले होते. त्याचा दुसऱ्याच दिवशी म्हणजे २० डिसेंबरला निवडणूक आयोग आणि कायदा मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांमध्ये बैठक होऊन त्याच रात्री १०:२३ वाजता नवीन नियम अधिसूचितही करण्यात आला, असा दावा पटोले यांनी केला.

मतदान प्रक्रियेत काही घोटाळा केलेला नाही तर नियम बदलण्याची घाई कशासाठी केली. यावरून 'दाल में कुछ काला है' हे स्पष्ट दिसते. भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्र आणि हरियाणाप्रमाणेच इतर राज्यातही मतांवर दरोडा टाकला आहे. काँग्रेस पक्षाने ही लढाई सुरुच ठेवली असून या प्रकरणी आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचेही पटोले म्हणाले.

## महत्त्वाच्या बातम्या

### ३१ मार्च २०२५ पर्यंतचे खटले मागे गृह विभागाचा निर्णय

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ मार्च २०२५ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील, असे खटले मागे घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गृह विभागाने शुक्रवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय झाल्याने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे. सार्वजनिक हिताच्या आणि इतर समस्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राजकीय तसेच सामाजिक संघटनेतील कार्यकर्त्यांकडून सरकार विरोधात आंदोलने केली जातात. निवडणुकीनंतर नव्याने सत्तेवर आलेले सरकार अशा खटल्यांचा आढावा घेऊन राजकीय आणि सामाजिक आंदोलनात दाखल झालेले खटले मागे घेते. यापूर्वी ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले होते, असे खटले मागे घेण्याचा धोरणात्मक निर्णय सरकारने घेतला होता. ही मुदत संपल्याने सरकारने आता ३१ मार्च २०२५ पर्यंतचे दोषारोपपत्र दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यास मान्यता दिली आहे.

### वृद्धाची फसवणूक

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

शेअर ट्रेडिंगमध्ये आकर्षक परतावा देण्याचे आमिष दाखवून एका ८३ वर्षीय वृद्धाची १.१९ कोटी रुपयांची फसवणूक केल्याची माहिती मुंबई पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने दिली. दादरमधील शिवाजी पार्कमध्ये राहणाऱ्या पीडितेची २ ते २८ मे दरम्यान फसवणूक झाली, असे अधिकाऱ्याने सांगितले. या वर्षी १० मार्च रोजी सोशल मीडियावर गुंतवणुकीशी संबंधित जाहिरात पाहिल्यानंतर त्याला एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये जोडले गेले. जाहिरातीतील एका लिंकवर क्लिक केल्यानंतर त्याला एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये जोडण्यात आले. २ मे रोजी त्याला विनिता पटोदिया नावाच्या एका व्यक्तीचा फोन आला, ज्याने त्याला शेअर गुंतवणुकीवर उच्च परतावा देण्याचे आश्वासन दिले.

### कंपनी संचालकांचा जामीन फेटाळला

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

६०० कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात एका स्थावर मालमत्ता कंपनीच्या चार संचालकांचा अटकपूर्व जामीन अर्ज शुक्रवारी मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळून लावला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. जी. शुक्ला यांनी पुलिन बोले, शिवानी वर्मा, शोवित राजन आणि प्रणव बजाज यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. न्यायालयाचा तर्कसंगत आदेश अद्याप उपलब्ध झालेला नाही. या प्रकरणात एडेलविस असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीच्या तक्रारीवरून इकॉनॉमिक ऑफिन्सेस विंगने एकस्टेसी रिएल्टी आणि कपनीच्या संचालकांविरोधात एफआयआर दाखल केला होता. एफआयआरनुसार, एका निवासी प्रकल्पासाठी सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या ६०० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आणि त्यामुळे प्रमोटर्स, संबंधितांना लाभ झाला.

### वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांचा सत्कार

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

गोरेगाव (पूर्व) येथील गोकुळधाम वृत्तपत्र विक्रेता संघाने काल इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा गोकुळधाम येथे आयोजित केला होता. यावेळी रोज वृत्त वितरण करणाऱ्या विक्रेत्यांच्या मुलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टी मुंबईचे उपाध्यक्ष प्रवीण मर्गज आणि प्रभाग क्रमांक ५२चे भाजप महामंत्री विनोद शुक्ला यांच्या हस्ते येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य आणि भेटवस्तू देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गोकुळधाम वृत्तपत्र विक्रेता संघाचे संघटक सुनील दुबे तसेच महादेव पवार, योगेश पांडे, विनायक बारशिंग व विविध वृत्तपत्र समूहाचे वितरण अधिकारी उपस्थित होते.

### औषध खरेदी प्रस्तावाला मंजुरी

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

तीन वर्षांनंतर मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमधील मोफत औषधांचा पुरवठा करणाऱ्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. २०२२ पासून प्रस्ताव रखडल्यामुळे महापालिका रुग्णालयांमध्ये औषधांसाठी आणीबाणी होती. दरम्यान, औषध खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यामुळे येत्या महिन्याभरात ही औषधे आणि वैद्यकीय साहित्य रुग्णालयात उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये आता औषधे गोळ्यांसह इतर आवश्यक साहित्यांची चणचण भासणार नसल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. मुंबई महापालिकेच्या प्रमुख रुग्णालयांसह विशेष आणि उपनगरीय रुग्णालये आणि दवाखाने, आरोग्य केंद्र आणि प्रसूतिगृहांमधील रुग्णांना महापालिकेच्या अनुसूचीवर औषधे मोफत पुरवठा करण्यात येतो.

### ५२ लाखांच्या हेवी डिपॉझिटचा अपहार करून फसवणूक

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

सुमारे ५२ लाखांच्या हेवी डिपॉझिटचा अपहार करून फसवणूक केल्याप्रकरणी एका प्रॉपटी एजंटसह चौघांविरुद्ध आंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आमीर अफल खांडवाला, मोहम्मद आसिफ नबीउल्ला शेख, शबाना मोहम्मद आसिफ शेख आणि सलमा सिंकदर खान अशी या चौघांची नावे आहेत. तक्रारदार अनिवासी भारतीय असून ते ब्रिटिश नागरिक आहेत. त्यांचे आई-वडील जोगेश्वरी परिसरात राहतात. तीन वर्षांपूर्वी त्यांना मुंबई शहरात नवीन व्यवसाय सुरू असून त्यात गुंतवणूक करायची होती. त्यांनी आमीरच्या सांगण्यावरून जोगेश्वरी येथे दोन फ्लॅट हेवी डिपॉझिटवर घेतले होते. त्यासाठी त्याने मोहम्मद आसिफ, शबाना आणि सलमा खान यांना अनुक्रमे २१ लाख आणि ३१ लाख रुपये हेवी डिपॉझिट म्हणून दिले होते. मात्र एक वर्षाने त्यांना हेवी डिपॉझिटची रक्कम परत केली नाही. चौकशीदरम्यान फसवणूक झाल्याचे समजल्याने त्यांनी संबंधित चारही आरोपींविरुद्ध आंबोली पोलिसांत तक्रार दिली.

### पदपथांचे काम पावसाळ्यानंतरच

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

मुंबईतील रस्ते सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे केवळ ४९ टक्के पूर्ण झाली आहेत. मात्र पदपथांकडे पालिकेचे दुर्लक्ष झाले आहे. काँक्रिटीकरणादरम्यान रस्त्याच्या बाजूला असलेले पदपथ खोदले. मात्र, ते अद्याप बनवलेले नाही. हे पदपथ पाऊस थांबल्यावरच बनवण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली. त्यामुळे भर पावसाळ्यात मुंबईकरांना रस्त्यांवरूनच मार्गक्रमण करावे लागणार आहे. मुंबई महापालिकेने २४ विभागांतील प्रमुख आणि दुय्यम मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत, वेगवान व शिस्तबद्ध व्हावी यासाठी सिमेंट काँक्रिटीकरण प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पांतर्गत टप्पा एक आणि टप्पा दोनमध्ये एकूण मिळून २,१२१ रस्ते कामांचे नियोजन केले. त्यापैकी ठरलेल्या मुदतीत पालिकेला १,३८५ रस्त्यांची मिळून ३४२.७४ किलोमीटरची कामे पूर्ण करता आली. मात्र काँक्रिटीकरणादरम्यान रस्त्यालगत खोद-लेल्या पदपथांचे काम मात्र अद्याप पूर्ण केलेले नाही. त्यामुळे मुंबईच्या सायन, माहिम, माटुंगा, दादर, परळ, वांद्रे, खार, कांदिवली, मालाड, गोवंडी या भागांतील पदपथ अजूनही खोदलेल्या स्थितीत आहेत.

# कॅलिडोस्कोप

## साबणात ब्लेड ?

मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेर येथील एका कुटुंबाने एका नामांकित साबण निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या उत्पादनासंदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. या कुटुंबाने विकत घेतलेल्या दहा रुपयांच्या साबणामध्ये ब्लेड सापडले. अंघोळीदरम्यान या कुटुंबातील एका चिमुकल्याने हा साबण गालावर घासल्याने त्याच्या गालाला साबणामधील ब्लेडमुळे इजा झाली. हा प्रकार समोर आल्याननंतर जखमी मुलाच्या वडिलांनी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन क्रमांक १९१५ वर कॉल करून अधिकृतरित्या कंपनीसंदर्भात तक्रार नोंदवली आहे. जखमी झालेल्या मुलाचे नाव अंश असे आहे. आपल्या मित्रांसोबत खेळून घरी आल्यानंतर हातपाय आणि तोंड धुण्यासाठी बाथरुममध्ये गेलेल्या अंशने साबण चेहऱ्यावर घासण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला गालातून रक्त येत असल्याचे जाणवले. त्यानंतर नीट पाहिले असता साबणात काहीतरी असल्याचे त्याला दिसले. तोपर्यंत त्याचा गाल रक्ताने माखला होता.

एका बाजूने चेहरा रक्तबंबाळ झाल्याने घाबरलेल्या अंशने बाथरुममधूनच आरडाओरडा सुरू केला. मुलाचा आवाज ऐकून धावत बाथरुममध्ये आलेले अंशचे वडील अंगद सिंह तोमर यांना साबणात ब्लेड दिसल्यानंतर नेमके काय घडले याचा अंदाज आला. त्यांनी मुलाला धीर देत बाथरुमबाहेर काढत त्याच्या गालावर झालेल्या जखमेवर प्रथमोपचार केले. त्यांनी ग्राहक हेल्पलाइन क्रमांकावर घडलेल्या प्रकाराची माहिती देत अधिकृत तक्रार दाखल केली.

**मुलाच्या जीवाला होता धोका**

पॅकेजिंगदरम्यान ब्लेड साबणात अडकले अथवा स्थानिक दुकानामध्ये साबणाशी काही छेडछाड केल्याने हा प्रकार घडला याबद्दलची कोणतीही माहिती अद्याप उपलब्ध होऊ शकली नाही. बाहोदपूरमधील आनंद नगर येथे राहणाऱ्या सिंह कुटुंबाने स्थानिक किरणामालाच्या दुकानातून खरेदी केलेल्या साबणामध्ये अशाप्रकारे ब्लेड आढळून आल्याने अंगद सिंह यांनी स्वत: या दुकानात जाऊन तक्रार केली. त्या वेळी दुकानदारालाही सारा प्रकार ऐकून धक्का बसला. त्याने या ब्लेड असणाऱ्या साबणाच्या जागी दुसरा साबण दिला; मात्र घरी गेल्यानंतर अंगद यांनी हा साबण पाण्यात टाकून चाचपणी केली असता त्यामध्येही ब्लेड आढळून आले. अंगद यांनी १९१५ या राष्ट्रीय ग्राहक तक्रार हेल्पलाइन क्रमांकावर कॉल केला. या प्रकारामुळे माझ्या मुलाचा जीवही जाऊ शकला असता, असे अंगद यांनी तक्रारीत म्हटले आहे.

**न्यायालयात जाण्याचा इशारा**

ऑनलाइन माध्यमातून तक्रार करताना त्यांनी साबणाच्या फोटोसहीत इतर माहितीही दिली आहे. या प्रकरणात संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर आपण न्यायालयात हे प्रकरण घेऊन जाऊ, असा इशारा अंगद यांनी दिला आहे.

**कंपनीचे म्हणणे**

साबणात रेझर ब्लेड आढळल्याच्या कथित प्रकरणांबद्दल आम्हाला मीडिया रिपोर्ट्समधून माहिती मिळाली आहे, असे कंपनीने यासंदर्भात जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. या दाव्याची सत्यता पडताळण्यासाठी कंपनी चौकशी करत आहे. आजपर्यंत, आम्हाला कोणत्याही ग्राहकाकडून कोणतीही औपचारिक तक्रार किंवा अशाप्रकारच्या घटनेची सूचना मिळालेली नाही किंवा कोणत्याही व्यक्तीने आमच्याशी थेट संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला नाही. आमच्या सर्व साबणाच्या कव्हरवर आमचे ग्राहक सेवा संपर्क तपशील छापलेले असतानाही आमच्याकडे कोणीही अधिकृत तक्रार नोंदवलेली नाही. त्यामुळेच आम्ही सध्या आरोपाच्या सत्यतेवर भाष्य करू शकत नाही. सध्या तरी प्रथम दर्शनी हे बनावट उत्पादनांचे प्रकरण किंवा ब्रँडची प्रतिष्ठा खराब करण्याच्या उद्देशाने चालवलेल्या दुर्दैवी मोहीमेचा भाग असल्याचे दिसत आहे.



**साबण विक्रेत्याच्याही संपर्कात**

आम्ही तक्रारदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहोत. तथापि, आमच्याकडे त्यांचे संपर्क तपशील नाहीत. याव्यतिरिक्त, आम्ही ज्या घाऊक विक्रेत्याकडून साबण खरेदी केला होता, त्यांच्याशी संपर्क साधला आहे आणि चाचणीसाठी नमुने गोळा केले आहेत. आम्ही माध्यमांना विनंती करतो, की त्यांच्याकडे असलेली कोणतीही संबंधित माहिती देऊन आम्हाला मदत करावी, विशेषतः त्यांनी दावा करणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घेतली असल्याने आम्हाला यामध्ये सहकार्य करावे, असे कंपनीने कंपनीने निवेदनात म्हटले आहे.

## आशियातील श्रीमंत गाव

भारतातल्या एका गावातील बहुतेक लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. हे गाव आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे. टुमदार घरे, डोंगर अन् विकसित असे हे गाव असून तिथे १७ बँका, शॉपिंग मॉल आणि थिएटरदेखील आहे. देशातील श्रीमंत गावांच्या यादीत हे गाव अव्वलस्थानी आहे. या ठिकाणचे लोक आजही शेती करतात, पण या लोकांची बँकातील रक्कम ऐकून आवाक होण्याची वेळ येते. लोक परदेशातून पैसे कमवून गावातील बँकांमध्ये ट्रान्स्फर करतात. गुजरातमधील भूजमधील माधापूर या छोट्याशा गावाची ही एक वेगळी ओळख आहे. आशियातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून या गावाची ओळख निर्माण झाली आहे. फक्त ३२ हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील लोकांकडे सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मुदत ठेवी आहेत. हा एक विक्रम आहे. भारत सरकारनेही तो मान्य केला आहे.



**६५ टक्के लोक एनआरआय**

एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के एनआरआय लोकसंख्येमुळे माधापूर इतके समृद्ध आहे. हे एनआरआय प्रामुख्याने आफ्रिका, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आहेत. माधापूरमधील बँक खात्यात जमा झालेले पैसे वाया जात नाहीत. त्यामुळे गाव विकासाचे एक मॉडेल बनले आहे. या पैशाने चांगले रस्ते, तलाव, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे आणि मंदिरे बांधण्यास मदत झाली आहे. या गावात एचडीएफसी, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, ॲक्सिस, आयसीआयसीआय, युनियन बँक आणि प्रमुख खासगी बँका मिळून तब्बल १७ बँका आहेत.



## राजस्थानात विधवांचे गाव!

राजस्थानमधील एक गाव 'विधवांचे गाव' म्हणून ओळखले जाते. या गावाची गोष्ट फारच दुःखद आहे. राजस्थानमधील अनेक गावे सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत, पण याच राज्यात बुंदू हे ठिकाण रकीबपासून ८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हदौती या भागात आहे. तिथे पुरुषांचा तारुण्यातच मृत्यू होतो. ४,५०० लोकसंख्या असलेले बुधपुरा हे बरार प्रदेशाचा भाग असल्याचे म्हटले जाते. त्या ठिकाणी अनेक खाणी आहेत आणि तिथले लोक या खाणींमध्ये काम करतात. याशिवाय तिथे बाहेरूनही लोक कामाच्या शोधात येतात आणि येथे स्थायिक होतात.

**खाणकामामुळे लोकांना टीबी**

सततच्या कामामुळे आणि दररोज उडणाऱ्या बारीक धुळीमुळे लोकांना टीबी होतो आणि तोही अशा प्रकारे, की ते थेट मृत्यूच्या दारात घेऊन जातो. गावात इतर कोणतेही काम नसल्याने तिथले पुरुष दगडाच्या खाणीत काम करतात आणि या दरम्यान दगडाची धूळ (सिलिका) हळूहळू त्यांच्या छातीत जमा होते आणि नंतर 'सिलिकोसिस'चे रूप धारण करते. 'सिलिकोसिस' किंवा टीबीमुळे त्यांची प्रकृती बिघडते. आजारी पडल्यावर गरिबीमुळे त्यांना योग्य उपचार मिळू शकत नाहीत आणि ते अगदी लहान वयातच मरण पावतात.

## केवळ स्टेशन वाचवण्यासाठी

उत्तर प्रदेशातल्या प्रयागराजमध्ये दयालपूर हे रेल्वे स्टेशन आहे. लोक इथे रोज येतात, तिकीट घेतात आणि घरी परत जातात. ट्रेनमध्ये चढतच नाहीत. या स्टेशनची कहाणी थोडी वेगळीच आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आग्रहावरून १९५४ मध्ये या स्टेशनचे बांधकाम झाले, तेव्हा आजूबाजूच्या गावांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हे स्टेशन खूप महत्त्वाचे होते.

अनेक गाड्या इथे थांबत असत, पण हळूहळू प्रवाशांची संख्या कमी झाली आणि २००६ मध्ये रेल्वेने तोटा होत असल्याचे सांगत हे स्टेशन बंद केले. रेल्वेच्या नियमांनुसार एखाद्या स्टेशनवर नियमितपणे ५० पेक्षा कमी तिकिटे विकली जात असतील तर असे स्टेशन बंद केले जाते. दयालपूर स्टेशनलाही हाच नियम लागू झाला आणि ते बंद करण्यात आले. पण स्टेशन बंद झाल्यावर लोकांना त्याची खरी गरज जाणवू लागली. त्यांनी प्रयत्न केले आणि अखेर २०२० मध्ये रेल्वेने हे स्टेशन पुन्हा सुरू करण्यात आले. पण ते पुन्हा बंद होऊ नये यासाठी काय करायचे, हा प्रश्न होता.



स्टेशन वाचवण्यासाठी गावकऱ्यांनी एक मार्ग काढला. प्रवास करायचा नसेल तरी रोज कोणी ना कोणी स्टेशनवर जाऊन तिकीट खरेदी करायचे असे त्यांनी ठरवले. फक्त स्टेशन सुरू राहावे हीच लोकांची इच्छा आहे. आजही तिथले लोक महिन्याला सुमारे ७०० रुपयांची तिकिटे विकत घेतात, पण ट्रेनने जात नाहीत. स्टेशनवर फक्त एकच ट्रेन थांबते. एक दिवस इथे अधिक ट्रेन थांबतील अशी गावकऱ्यांना आशा आहे. चक्क वर्गणी गोळा करून ते रोज तिकीट खरेदी करतात.


## चष्मा घालाल तर...




सध्या चष्मा लागण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. आजकाल लहानग्या मुलांनाही चष्मा लागतो. कॉम्प्युटरवर काम करणाऱ्यांना चष्मा लावाला लागतो. विविध कार्यालयांमध्ये कॉम्प्युटरला डोळे लावून बसलेल्यांच्या नाकावर चष्मा असतो. याला महिलाही अपवाद नाहीत. काही वर्षांपूर्वीपर्यंत चष्मा लावणं हे मागासपणाचं लक्षण मानलं जायचं. पण काळानुरुप यात बदल झाला. आता चष्मा लावणं स्टाईल स्टेटमेंट बनून गेलं आहे. पण जपानमधल्या कंपन्यांना महिला कर्मचाऱ्यांनी चष्मा लावणं रुचलेलं नाही. म्हणूनच महिलांनी चष्मा लावून कार्यालयात येऊ नये, असं फर्मान त्यांनी काढलं आहे. चष्मा लावल्यामुळे महिलांच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्याचं कारण देत चष्मा लावायला बंदी घालण्यात आली आहे. पुरुष कर्मचारी अगदी आरामात चष्मा घालू शकतात. एअरलाईन्सपासून रेस्टॉरंटपर्यंत खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला चष्मा घालून काम करू शकत नाहीत. या कंपन्या इथवर थांबलेल्या नाहीत तर काही कंपन्यांनी महिलांना मेक अप करून यायची सक्ती केली आहे. तसंच वजन कमी करण्याच्या सूचनाही केल्या आहेत. आपल्या कार्यालयातल्या महिला कर्मचारी आकर्षक दिसाव्यात, असं इथल्या कंपन्यांना वाटतं. अर्थात इथल्या महिलांनी या प्रकाराला विरोध करायला सुरूवात केली आहे. सोशल मीडियावरही विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यामुळे कंपन्या आपला हा निर्णय मागे घेणार का, याबाबत कुतुहल निर्माण झालं आहे.



## मिठाईत भरलीए हवा



भारतात तऱ्हेतऱ्हेच्या मिठाया मिळतात. या चविष्ट मिठाया बघितल्यावर कोणाच्याही तोंडाला पाणी सुटल्याशिवाय रहाणार नाही. भारतात मिठाई खाण्याचं प्रमाण जास्त असलं तरी जगभरातच वैविध्यपूर्ण मिष्टान्न तयार केली जातात. काहींचा आकार वेगळा असतो तर काहींचा प्रकार भन्नाट असतो. अशीच एक मिठाई सध्या चर्चेचा विषय ठरते आहे. ब्रिटनमधल्या शेफने जगातली सर्वात हलकी मिठाई तयार केली आहे. विशेष बाब म्हणजे ही मिठाई बनवण्यासाठी शास्त्रज्ञांची मदत घेण्यात आली आहे. या मिठाईचं वजन अवघं एक ग्रॅम आहे. आश्चर्य वाटण्याजोगी बाब म्हणजे या मिठाईच्या ९६ टक्के भागात हवा आहे. म्हणजे या मिठाईत फक्त चार टक्के घन पदार्थ आहेत. ही मिठाई बनवण्यासाठी एअरोजेलचा वापर करण्यात आला आहे. एअरोजेल हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ आहे. १९३१ मध्ये याचा शोध लावण्यात आला होता. एअरोजेलमध्ये ९५ ते ९९.८ टक्क्यांपर्यंत हवा असते. म्हणूनच हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ ठरतो. एअरोजेल विविध पदार्थांपासून तयार करता येतं. मात्र ही मिठाई बनवण्यासाठी अंड्याच्या पांढऱ्या भागापासून हायड्रोजेल निर्मिती करण्यात आली. यानंतर हायड्रोजेल कॅल्शियम क्लोराइड आणि पाण्यात बुडवून ठेवण्यात आली. काही काळानंतर ती एका साच्यात घालण्यात आली. ही मिठाई तयार करण्यासाठी बरीच मोठी प्रक्रिया करावी लागली. अखेर सगळ्यांच्या मेहनतीला यश आलं आणि जगातली सर्वात हलकी मिठाई तयार झाली.

## मुलाचा मृत्यू, पित्याचा स्पृहणीय उपक्रम

मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातून एक हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. दुचाकी चालवताना हेल्मेट न घालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हादरवून सोडणारी घटना खंडवा जिल्ह्यातील पंधना विधानसभेतील गुराडिया गावात घडली. येथे एका वडिलांनी आपल्या मुलाला गमावले, पण त्यांनी उचललेल्या पावलाने संपूर्ण परिसराला विचार करायला भाग पाडले. काही दिवसांपूर्वी गावातील आनंद सिंह सावनेर या युवकाचे रस्ते अपघातात अकाली निधन झाले. दुचाकी चालवत असताना हा अपघात झाला. दुर्दैवाने त्याने हेल्मेट घातलेले नव्हते. ही बातमी गावात पसरताच वातावरण उदास झाले. संपूर्ण गावावर शोककळा पसरली. मुलाच्या अंत्यसंस्काराच्या काही दिवसांनी वडील मुकेश सावनेर यांनी घेतलेला निर्णय या दुःखद घटनेला जनजागृती मोहिमेत रूपांतरित करणारे उदाहरण ठरला.

**पूजा, अर्चा, विधीला फाटा**

सामान्यतः पारंपारिक पूजा-पाठ आणि श्रद्धांजली सभा दहाव्या दिवशी आयोजित केल्या जातात, पण याला बगल देत मुकेश सावनेर यांनी सामाजिक संदेश देण्याचे हे एक माध्यम बनवले. त्यांनी त्यांच्या मुलाच्या स्मरणार्थ गावकऱ्यांना आणि जवळच्या तरुणांना हेल्मेट वाटप करण्याचा निर्णय घेतला. आनंदने त्या दिवशी हेल्मेट घातले असते तर तो आज जिवंत असता, असा विचार करून आपण हे पाऊल उचलल्याचे ते सांगतात. इतर कोणालाही आपला मुलगा अशा प्रकारे गमवावा लागू नये. हे दुःख कधीच संपणार नाही, पण माझ्या मुलाच्या मृत्युमुळे दुसऱ्याचे प्राण वाचू शकतील, तर कदाचित त्याचा मृत्यू व्यर्थ जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**हेल्मेट वाटप चर्चेचा विषय**

गावात आयोजित या अनोख्या श्रद्धांजली सभेत तरुणांची गर्दी जमली होती. सर्वांचे डोळे पाणावले होते. त्याच वेळी मुकेश सावनेर यांनी सर्वांना हेल्मेटचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी डझनभर तरुणांना हेल्मेट घालायला लावले आणि त्यांच्याकडून ते नेहमी घालणार असल्याचे वचन घेतले. यापुढे वाहन चालवताना नक्कीच हेल्मेट घालू, असे तरुणांनी या वेळी सांगितले. ही छोटीशी घटना तरुणांसाठी एक मोठा धडा बनली. एखाद्याच्या मृत्यूवर इतका अर्थपूर्ण सामाजिक संदेश पहिल्यांदाच पाहायला मिळाल्याचे स्थानिक सांगतात.



**वडिलांनी उचललेल्या पावलाचे कौतुक**

ही घटना फक्त गाव किंवा जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हती, तर ही बातमी 'सोशल मीडिया'वरून व्हायरल झाली. लोक मुकेश सावनेर यांच्या या पावलाचे कौतुक करू लागले. अनेक सामाजिक संघटना आणि स्थानिक प्रशासनानेही त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. असे जागरूक नागरिकच समाजात बदल घडवू शकतात, असे मत व्यक्त केले जात आहे.

## खेकड्यासाठी मोजले ३२ लाख रुपये

मध्यंतरी एका खेकड्याचा लिलाव पार पडला. या खेकड्यावर कोट्यवधींची बोली लागली. अखेरीस हा खेकडा भारतीय चलनात ३२ लाख ६६ हजार रुपयांचा विकला गेला. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला. जपानच्या पश्चिमेकडे असणाऱ्या टोट्टरी परिसरात या खेकड्याचा लिलाव पार पडला. हा क्रस्टेशियन खेकडा आहे. तो फक्त बर्फात सापडतो. म्हणूनच तो खरेदी करण्यासाठी बरीच चढाओढ पहायला मिळते. थंडीच्या काळात जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर मासे खाल्ले जातात. या काळात माशांचा लिलाव केला जातो. जपानी लोक या लिलावात मासे खरेदी करतात. या लिलावादरम्यान ट्यूना हा मासा मुख्य आकर्षण ठरतो. जगातल्या या सर्वात महागड्या खेकड्याचं वजन १.२ किलो असून लांबी १४.६ सेंटीमीटर आहे. गेल्या वर्षीही एक खेकडा भारतीय चलनात तेरा लाख रुपयांना विकला गेला होता. हा एक विक्रमच होता. या विक्रमाची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली होती. मात्र आता ३२ लाख ६६ हजार रुपयांना विकल्या गेल्या खेकड्याने सर्व विक्रम मागे टाकले आहेत. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला आहे.



महासागर



# सीए मंगेश किनरे यांचे ‘व्यावसायिक नैतिकता’ विषयावर मार्मिक मार्गदर्शन

## शिवाजी पार्क सीपीई स्टडी सर्कलचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

मुंबई दि. २२ प्रतिनिधी

शिवाजी पार्क CPE स्टडी सर्कल ऑफ WIRC अभ्यासमंडळाचा वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चार्टर्ड अकाउंटंट्स क्षेत्रातील १९६ सीए यांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

ICAI चे सेंट्रल कौन्सिल सदस्य सीए मंगेश किनरे यांनी “Professional Ethics” अर्थात व्यावसायिक नैतिकता या विषयावर तब्बल तीन तास सखोल आणि विचारप्रवर्तक मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपीठावर व्यासपीठावर कन्व्हेनर सीए आदित्य प्रधान, डेप्युटी कन्व्हेनर सीए रोशन मोरे आणि संस्थापक सीए शशिकांत देसाई आदी मान्यवरांची उपस्थिती होती.




यावेळी सीए किनरे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून चार्टर्ड अकाउंटंट कार्यक्षेत्रातील नैतिक जबाबदाऱ्या, क्लायंटशी प्रामाणिकपणा, गोपनीयता राखण्याचे महत्त्व आणि हितसंबंध टाळण्याचे भान या बाबींवर भर दिला. ICAI च्या Code of Ethics चा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की “ज्ञानासोबतच नैतिकता जपली गेली, तरच व्यवसायाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास होतो.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्टडी सर्कलच्या गेल्या वर्षभरातील उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. संयोजक व उपसंयोजकांनी संस्थेच्या २१ वर्षातील यशस्वी वाटचालीचा अभिमान व्यक्त केला. यावेळी उपस्थित सीए मंडळीनी स्टडी सर्कलच्या विकासातील आपली भूमिका आणि अनुभव उपस्थितांशी शेअर करत प्रेरणा दिली. स्नेहभोजनाने वर्धापन सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# पाकिस्तानचा पर्दाफाश झाला आहे

## अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यानंतर असदुद्दीन ओवेसींचे वक्तव्य

नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था


अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यामुळे पाकिस्तानचा खरा चेहरा समोर आला असल्याची टीका ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी केली आहे. ओवेसी यांनी पाकिस्तानचा पर्दाफाश झाल्याचं वक्तव्य केलं आहे. तसेच ट्रम्प यांच्यासारख्या नेत्याचा कोणी उदोउदो कसा काय करू शकतो असा प्रश्न उपस्थित केला आहे.

ओवेसी यांनी काही वेळापूर्वी एएनआय या वृत्तसंस्थेशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, “यासाठीच (अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यासाठी) पाकिस्तानने डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी केली होती का? या हल्ल्यासाठीच पाकिस्तानचे लष्करप्रमुख (असीम मुनीर)



डोनाल्ड ट्रम्प यांना भेटले व त्यांच्याबरोबर जेवले होते का? आता त्यांचा पर्दाफाश झाला आहे. पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर आला आहे”.

इस्रायलने शनिवारी रात्री इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पावर हवाई हल्ला केला. पाठोपाठ अमेरिकेने इराणच्या तीन अणुऊर्जा प्रकल्पांवर हवाई हल्ला करून इराण-इस्रायल युद्धात उडी घेतली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड



ट्रम्प यांनी समाजमाध्यमांवर पोस्ट करून या हल्ल्यांची माहिती दिली. ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की अमेरिकेच्या शूर जवानांनी इराणवर हवाई हल्ले करून फोर्डो, नतान्झ आणि इस्फहानमधील तीन अणुऊर्जा प्रकल्पांचा लक्ष्यभेद केला. हे तिन्ही हल्ले यशस्वी झाले आहेत. पाठोपाठ इराणने त्यांच्या अणऊर्जा प्रकल्पांवर हल्ले झाल्याचं जाहीर केलं आहे. मात्र, या हल्ल्यात कोणतंही मोठं नुकसान झालेलं नाही, असं म्हटलं आहे.

इस्रायल-इराण युद्धात अमेरिकेने उडी घेतल्यामुळे या युद्धाची व्यापकता वाढली आहे. यामुळे जग मोठ्या युद्धाच्या उंबरठ्यावर आल्याची चर्चा आहे. दरम्यान, इराणवरील हल्ल्याचे आदेश देणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेचा नोबल पुरस्कार दिला जावा यासाठी पाकिस्तान काही दिवसांपूर्वी शिफारस करत होता. मात्र, अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यामुळे पाकिस्तानवर टीका होऊ लागली आहे. ट्रम्प यांचा उदोउदो करणाऱ्या पाकिस्तानवर मुस्लीम राष्ट्रे टीका करत आहेत.

असदुद्दीन ओवेसी म्हणाले, “पाकिस्तान डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार दिला जावा यासाठी शिफारस करत होता. ते नेमकं कशासाठी? ज्या माणसाने राष्ट्राध्यक्षपदी बसल्यानंतर त्याच्याच देशाच्या संविधानाचं उल्लंघन केलं, ज्याने संयुक्त राष्ट्रांच्या सनदेला (घोषणापत्र) हरताळ फासला, ज्याने एनपीटीचं (अण्वस्त्र प्रसार प्रतिबंध करार) उल्लंघन केलं, त्या माणसाला शांततेचा नोबल पुरस्कार दिला जावा यासाठी पाकिस्तान वकिली करत होता. अशा माणसासाठी पाकिस्तान शिफारसी करत होता”.

# अमेरिकेचे मध्यपूर्वेतील सहा सैनिकी तळ धोक्यात

वॉशिंग्टन , दि. २२ वृत्तसंस्था

मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढताना दिसत असून, इराणने अमेरिकेला गंभीर परिणामांची चेतावणी दिली आहे. अमेरिका आणि इस्रायली लष्कराच्या संयुक्त हल्ल्यात इराणमधील तीन अणुस्थळांवर हल्ला झाल्यानंतर इराणने अमेरिकन सैन्य आणि नागरिक हे आता "थेट लक्ष्य" असल्याचे जाहीर केले आहे. इराणच्या सरकारी टीव्हीने दिलेल्या माहितीनुसार, फोर्डो, नतांझ आणि इस्फहान येथील अणुउद्योगांवर अमेरिकेच्या हवाई दलाने रविवारी सकाळी हल्ले केले.या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचे निकटवर्तीय व कठोर विचारसरणीच्या 'कायहान' वृत्तपत्राचे संपादक हुसेन शरियतमदारी यांनी अमेरिकेच्या नौदल तळांवर हल्ल्याची आणि होर्मूझ सामुद्रधुनीत अमेरिकन व युरोपीय जहाजांना अडवण्याची मागणी केली आहे.

इराणच्या संभाव्य प्रतिहल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेचे मध्यपूर्वेतील काही महत्त्वाचे सैनिकी तळ इराणचे संभाव्य लक्ष्य बनू शकतात. सध्या अमेरिकेचे 40000 हून अधिक सैनिक CENTCOM (U.S. Central Command) अंतर्गत या भागात तैनात आहेत. जाणून घेऊया मध्यपुर्वेत कोणत्या ठिकाणी अमेरिकेचे महत्त्वाचे तळ आहेत.

**बहारीन-** अमेरिकेच्या पाचव्या नौदल ताफ्याचे (फिफ्थ फ्लीट) मुख्यालय आणि U.S. Naval Forces Central Command येथे स्थित आहे. येथे अमेरिकेच्या अणुवाहक जहाजांसह मोठ्या नौदल जहाजांसाठी खोल पाण्याचे बंदर आहे. चार अँटी-माईन जहाजे, दोन लॉजिस्टिक जहाजे आणि कोस्ट गार्डची तैनाती आहे.अमेरिका 1948 पासून हा तळ वापरात आहे.

**कतार-** येथील अल उदीद एअर बेस हा मध्यपूर्वेतील अमेरिकेचा सर्वात मोठे एअर बेस आहे. येथे CENTCOM चे मुख्यालय आहे. विशेष सैनिकी दल आणि 379 व्या हवाई विंगची तैनाती येथे आहे. या तळावर विविध लढाऊ विमाने तैनात असून ती फिरती राहतात.

**इराक-** येथील अल असद एअर बेस (अल-अनबार प्रांत) आणि अल हरीर एअर बेस (एर्बिल) हे दोन अमेरिकेचे प्रमुख तळ आहेत. 2020 मध्ये जनरल कासिम सुलेमानीच्या हत्येनंतर इराणने अल असद तळावर क्षेपणास्त्र हल्ला केला होता. अंदाजे 2500 अमेरिकन सैनिक येथे दहशतवादविरोधी लढ्यांत कार्यरत आहेत.

**सिरिया-** येथील अल तनफ गॅरिसन तळ सीरिया, इराक व जॉर्डनच्या सीमेजवळ स्थित आहे. इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेविरुद्धच्या लढ्यासाठी अमेरिकेची येथे दीर्घकालीन तैनाती आहे. हा तळ अनेक वेळा इराणसमर्थित गटांच्या हल्ल्यांचा बळी ठरलेला आहे.

**कुवेत-** येथील अली अल-सालेम एअर बेस हा इराकी सीमेजवळ असून 386 व्या हवाई विंगचे केंद्र आहे. कॅम्प अरिफजान – CENTCOM च्या लष्करी घटकाचे आघाडीचे मुख्यालय येथे आहे. येथे लष्करी साठवणूक केंद्रही आहे.

**संयुक्त अरब अमिराती -** येथील अल धाफ्रा एअर बेस, येथे 380व्या हवाई विंगचे मुख्यालय आहे.

अमेरिकेची एफ-22 रॅप्टर जेट, MQ-9 ड्रोन आणि गुप्तचर विमाने या तळावर कार्यरत आहेत.

येथील गल्फ एअर वॉरफेअर सेंटरमध्ये हवाई आणि क्षेपणास्त्र संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते.

# माजी मुख्यमंत्र्यांच्या कारखाली चिरडून वृद्धाचा मृत्यू

हैदराबाद, दि. २२ वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि वायएसआर काँग्रेसचे प्रमुख जगनमोहन रेड्डी यांच्या स्वागतला आलेल्या गर्दीत एका ७०वर्षीय वृद्धाचा कारखाली चिरडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जगनमोहन रेड्डी शनिवारी सत्तेनपल्ली येथे एका कार्यक्रमासाठी आले असता, त्यांच्या स्वागताला कार्यकर्त्यांनी व चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी, त्यांच्या कारच्या ताफ्यासमोरच कार्यकर्त्यांनी धाव घेतल्याने सुरक्षा यंत्रणेला देखील ही गर्दी नियंत्रित करता आली नाही. त्यामुळे, जगमोहन रेड्डी ज्या कारमधून तिथं पोहोचले,



त्याच कारच्या चाकाखाली एका ५३ वर्षीय व्यक्तीचा चिरडून मृत्यू झाला आहे. चिल्ली सिंगा असं मृत व्यक्तीचे नाव असल्याची माहिती आहे.

जगनमोहन रेड्डी यांच्या स्वागतासाठी शेकडो कार्यकर्त्यांनी त्यांच्या कारकडे धाव घेतली. हातात बॅनर आणि फुलांच्या माळा घेऊन कार्यकर्ते त्यांच्या कारच्या दिशेने धावले. यावेळी, चिल्ली सिंगा हेही कारच्या दिशेने धावत असताना कारखाली आल्याने त्यांची मान कारच्या चाकाखाली दबली गेली. या दुर्घटनेत चिल्ली सिंगा यांचा जागीच मृत्यू झाल्याची दु:खद घटना घडली. आता, या घटनेवरुन विरोधी पक्षाने हल्लाबोल करायला सुरुवात केली असून राज्यात राजकारण सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, घटनास्थळी गुंटूरचे एसपी आणि मोठा पोलीस ताफा पोहोचला आहे. मात्र, माजी मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील सुरक्षा यंत्रणेवर बोट ठेवलं जात आहे.


# आत्मनिर्भर भारतासाठी आरआरपी इनोव्हेशन आणि ऑप्टिक्स बुल्गारियासोबत भागीदारी

भारताच्या आत्मनिर्भरता आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या दृष्टिकोनाला अधोरेखित करणाऱ्या एका ऐतिहासिक पावलांनी वेगाने वाढणाऱ्या भारतीय इलेक्ट्रो-ऑप्टिक्स कंपनीने, प्रगत इलेक्ट्रो-ऑप्टिक्स सोल्यूशन्समधील जागतिक प्रणेते असलेल्या ऑप्टिक्स बुल्गारियासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.२० जून रोजी औपचारिकरित्या संपन्न झालेला हा सामंजस्य करार, आरआरपी एस४ई इनोव्हेशन लि.साठी एक ऐतिहासिक क्षण आहे, जो अत्याधुनिक संरक्षण उत्पादनांच्या नवीन पिढीसाठी तंत्रज्ञान हस्तांतरण (टीओटी) साठी



मार्ग मोकळा करतो, ज्यामध्ये अल्ट्रा लाइटवेट थर्मल साइट्स विस्तारित लांब पल्ल्याची देखरेख पद्धती समाविष्ट आहे.हँडहेल्ड थर्मल इमेजर्स (एचएचटीआय) ऑप्टिक्स बुल्गारियाने खोलवर कौशल्य आणले आहे. इन-हाऊस संशोधन आणि विकासाद्वारे त्यांच्या सर्व उत्पादन ऑफरमध्ये त्यांनी प्रभुत्व मिळवले असून त्यांच्या नवकल्पनांची युद्ध-चाचणी केली जाते. तसेच जागतिक स्तरावर त्यांचा आदर केला जातो. या सहकार्याने, कंपन्यांचे उद्दिष्ट अशा प्रगत थर्मल तंत्रज्ञानाचा वापर करणे आहे, जे या क्षेत्रात कधीही वापरले गेले नाही. स्पर्धात्मक किमतीत उच्च कार्यक्षमता प्रदान करतात.

३०० हून अधिक थर्मल साइट्स आधीच धोरणात्मक ठिकाणी तैनात आहेत. ऑप्टिक्सचे प्रमुख उत्पादन 'डायना' हे इलेक्ट्रो-ऑप्टिक्समध्ये गेम-चेंजर म्हणून ओळखले जाते. हे नवोपक्रम आता भारतीय गरजांनुसार अनुकूलित केले जातील, जे वास्तविक युद्धक्षेत्रातील आव्हानांना व्यावहारिक, आघाडीचे उपाय प्रदान करतील.

लोकार्थ

# एलेनबेरी इंडस्ट्रीयल गॅसेसचा आयपिओ २४ जून रोजी

एलेनबेरी इंडस्ट्रियल गॅसेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी रु. २ दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ३८० ते रु. ४०० असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, २४ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २६ जून २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ३७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ ४०० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि पद्म कुमार अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या इक्विटी शेअर्स आणि वरुण अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश आहे.नवीन इश्यूमधून मिळणारे २१० कोटी रुपयांचे उत्पन्न कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्वपेमेंटसाठी वापरले जाईल; २२० टीपीडी क्षमतेच्या उलुबेरिया-II प्लांटमध्ये एअर सेपरेशन युनिटची स्थापना करण्यासाठी १०४.५० कोटी रुपये; आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरले जाईल.




# टाइमझोनचा सर्वात मोठा फ्लॅगशिप व्हेन्यू इनऑर्बिट मॉलमध्ये

टाइमझोन या ऑस्ट्रेलियातील फॅमिली आणि सोशल एंटरटेनमेंट क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँडने भारतात आपल्या सर्वात मोठ्या, सर्वात आकर्षक आणि अनुभव-आधारित फ्लॅगशिप व्हेन्यू इनऑर्बिट मॉल, मालाड येथे सुरू केला आहे. 2 दशकांपूर्वी या ब्रँडने याच ठिकाणी पहिला व्हेन्यू सुरू करत भारतात पदार्पण केले होते. पहिल्या व दुसऱ्या मजल्यांवर 24,626 चौरस फूट क्षेत्रफळात असलेले हे नवीन ठिकाण खेळ, खाद्यजत्रा आणि अविस्मरणीय समारंभांसाठी मुंबईतील एक हब म्हणून तयार झाले आहे.टाइमझोनचा फ्लॅगशिप व्हेन्यू अनुभवात्मक मनोरंजनात एक नवा मानक स्थापित करण्यासाठी डिझाइन केलेला आहे. सर्व वयोगटातील अभ्यागत एका उत्साही आणि जोशपूर्ण वातावरणात प्रवेश करतील, जिथे त्यांना मजा करता येईल आणि एकत्रितपणे आनंदी क्षण




घालवता येतील.

टाइमझोन कॅफे हा भारतातील पहिलाच इन-व्हेन्यू कन्सेप्ट म्हणून सुरू झाला आहे. या ठिकाणी जीभेची व पोटाची भूक आणि तहान भागवणारा मेन्यू सादर करण्यात येतो. या ठिकाणी सर्व वयोगटांचा विचार करून फ्यूजन-प्रेरित 26 पदार्थ उपलब्ध करून देण्यात येतात. त्याचप्रमाणे कॅफेच्या समकालीन प्लेटिंग स्टाइलमुळे कुटुंबीय आणि मित्रांसमवेत गप्पांचा फड रंगतो. जॅपनीज मोइतो मॅजिक व काश्मिरी रोझ पल्पी लिची कूलर यासारख्या खास हाताने तयार केलेल्या मॉकटेल्सपासून ते थिक शेक, किड-फ्रेंडली क्रिस्पी कॅरेमल आणि स्थानिक चव असलेली शिकंजी या ठिकाणी उपलब्ध आहे. कॉफीच्या चाहत्यांसाठी ताजी ब्रू केलेली कॉफी टर्किश कॉफी व ब्लॅक फॉरेस्ट पर्यायांसह एका खास ढंगात सादर केली जाते

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com


# काकासमोरच पुतण्याने केले काकूशी लग्न

पटना, दि. २२ वृत्तसंस्था

आतापर्यंत प्रेमासाठी वाट्टेल ते करणारे प्रेमवीर, प्रेमिका पाहिल्या असतील. पण आता बिहारमधुन प्रेमात आंधळी झालेल्या एका महिलेचा प्रताप समोर आला आहे. या महिलेने तिच्या दिराच्या मुलाशी म्हणजेच पुतण्याशीच प्रेमविवाह केला आहे. विषेश म्हणजे पूतण्या - काकूच्या या विवाहासाठी काका म्हणजेच महिलेचा पतीही उपस्थित होता. काकासमोरच पुतण्याचे काकीला वरमाला घातली. नात्यांना काळीमा फासणाऱ्या या घटनेची सध्या चर्चा सुरू आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की जुमई जिल्ह्यातील सदर पोलिस ठाणे क्षेत्रातील सिकहरिया या गावात हा प्रकार घडला आहे. या गावातील रहिवासी विशाल दुबे यांची पत्नी आयुषी कुमारी हीने गावातच राहणारा पुतण्यासोबतच लग्न केले. गावातीलच एका मंदिरात हा विवाह सोहळा पार पडला. २०२१ मध्ये विशालबरोबर आयुषीचा विवाह झाला होता. या लग्नाची तिला तीन वर्षांची एक मुलगी पण आहे. दरम्यान शेजारी राहणारा विशालचा पुतण्या सचिन बरोबर काकू आयुषी हिचे सूत जुळले, गेली दोन वर्षे हा प्रकार सुरू होता. भेटी गाठी, मोबाईलवरुन संभाषण हे नवीन प्रेमीयुगलासारखे सुरू होते. तेही या दोघांच्या कुंटुंबाला न कळता. या दोघांमधील गोष्ट जेव्हा हे दोघे गेल्या रविवारी पळून गेले तेव्हा समोर आली. विशाल यांनी आपली पत्नी बेपत्ता झाली असल्याची तक्रार सदर पोलिस ठाण्यात दिली होती त्याचेवेळी आयुषी कुमारी हिने जमुई कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. तसेच विशाल व तिच्या मुलगीला स्वीकारण्यासही नकार दिला आहे. त्यानंतर या दोघांमध्येही सामोपचार होऊन पतीच्या कुटुंबाच्या साक्षीने तिने सचिनबरोबर शुक्रवारी लग्नच केले.

# कर्नाटक सरकारने आणला 'फेक न्यूज' कायदा, ७ वर्षांपर्यंतची शिक्षा

बेंगळुरू, दि. २२ वृत्तसंस्था

सोशल मीडियाद्वारे फेक बातम्या पसरवण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. अशा खोट्या बातम्यांना आळा घालण्यासाठी कर्नाटकातील काँग्रेससरकार कायदा आणत आहे. त्याबाबत कर्नाटकसरकारचे मंत्री प्रियांक खरगे म्हणाले की, खोट्या बातम्यांच्या बाबतीत भारत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यामुळे, यावर उपाययोजना करण्यासाठी आपण काही महत्त्वाची पावले उचलणे आवश्यक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने अलीकडेच एक विधेयक मांडले आहे. यामध्ये खोट्या बातम्या पसरवणाऱ्या व्यक्तीला ७ वर्षांपर्यंतची शिक्षा आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. खोट्या माहितीला आळा घालण्यासाठी कर्नाटक सरकारने आणलेल्या विधेयकाबाबत कर्नाटकचे मंत्री प्रियांक खरगे म्हणाले की, चुकीची माहिती पसरवण्यात भारत पहिल्या क्रमांकावर आहे. कर्नाटक सरकारने प्रस्तावित केलेल्या कायद्यात म्हटले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने बनावट बातम्या किंवा चुकीची माहिती पसरवण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्याविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाईल. या कायद्यानुसार, जर तुम्ही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे खोटे किंवा चुकीचे रिपोर्टिंग करत असाल, किंवा ते संपादित करून ऑडिओ किंवा व्हिडिओ सादर करत असाल, तर या कायद्यानुसार तुमच्याविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाईल.

# सात धर्मगुरूंकडून जागतिक नेत्यांना युद्ध थांबवण्याचे आवाहन

नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था

जगभरात वाढत चाललेल्या युद्धसंकट आणि आंतरराष्ट्रीय तणावाच्या पार्श्वभूमीवर, दिल्लीतील फॉरेन करस्पॉन्डंट्स क्लबमध्ये झालेल्या एका पत्रकार परिषदेत सात प्रमुख धर्मांचे धर्मगुरू एकत्र आले आणि जागतिक नेत्यांना युद्ध थांबवण्याचे आवाहन केले. या प्रसंगी जागतिक शांततेसाठी समर्पित असलेले डॉ. के. ए. पॉल यांनी सर्व धर्मगुरूंसह अमेरिका, इजरायल, ईरान आणि जगभरातील प्रमुख संस्था यांना विनंती केली की त्यांनी वेळीच पावले उचलून मानवतेला विनाशाच्या उंबरठ्यावरून वाचवावे. डॉ. पॉल, ज्यांनी आजवर १५५ देशांना भेट देऊन राष्ट्राध्यक्ष आणि प्रधानमंत्र्यांशी शांततेसाठी चर्चा केली आहे, त्यांनी सांगितले की, "मी आयुष्यात खूप काही पाहिले आहे, पण आजसारखी गंभीर परिस्थिती कधीही पाहिली नव्हती." त्यांनी पुढे म्हटले, "राष्ट्रपती ट्रम्प, पंतप्रधान नेतान्याहू आणि इराणी नेतृत्व – अजूनही वेळ आहे, संवाद साधा, युद्ध थांबवा."

# सायबर सुरक्षा क्षेत्रात भारताचे निर्णायक पाऊल

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

भारतातील सायबर सुरक्षेच्या वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर सायबर इंडिया एक्स्पो 2025 चे यशस्वी आयोजन बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई येथे करण्यात आले. मिडिया फुसन द्वारे आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमात धोरणनिर्माते, तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, स्टार्टअप्स आणि उद्योजक एकत्र आले.भारत सध्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सायबर हल्ल्यांचा बळी ठरत असून, यावेळी १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि भारतीय कंपन्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बृजेश सिंग, आयपीएस, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या उद्घाटनाने झाली. त्यांनी सायबर सुरक्षा ही राष्ट्रीय प्राधान्याची बाब असल्याचे सांगितले.कार्यक्रमात AI-आधारित सुरक्षा उपाय, झिरो-ट्रस्ट फ्रेमवर्क्स, क्वांटम-सेफ टेक्नॉलॉजी, आणि डेटा संरक्षण यावर चर्चा झाली. UIDAI, HDFC Life, Wipro, 63SATS Cybertech, आणि संपर्क मंत्रालय सारख्या संस्थांचे वरिष्ठ अधिकारी यात सहभागी झाले.

स्टार्ट अप इनोवेशन झोनमध्ये स्टार्टअप्सनी थेट डेमोद्वारे अत्याधुनिक सायबर सुरक्षा तंत्रज्ञान सादर केले. BFSI, हेल्थकेअर आणि हॉस्पिटॅलिटी या क्षेत्रातील सध्याच्या सायबर धोका स्थितीवरही विशेष लक्ष दिले गेले.

# भारत-श्रीलंकेत होणाऱ्या टी-20 वर्ल्डकपसाठी कॅनडाचा संघ पात्र

दुबई, दि. २२ वृत्तसंस्था

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या टी२० विश्वचषक २०२६ साठी संघांची निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार असून, कॅनडा संघाने नुकतेच आपले स्थान निश्चित केले आहे. अमेरिकन पात्रता फेरीत बहामास संघाचा सात गडी राखून पराभव करत कॅनडाने विश्वचषकाचे तिकीट मिळवले आहे. विशेष म्हणजे, कॅनडाने टी२० विश्वचषक २०२४मध्येही सहभाग घेतला होता.

टी२० विश्वचषकसाठी कॅनडाच्या समावेशानंतर आतापर्यंत एकूण १३ संघांनी आपली जागा पक्की केली आहे. यजमान म्हणून भारत आणि श्रीलंकेच्या संघांना थेट प्रवेश मिळाला आहे. तर, आयर्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तान या संघांनी आयसीसी क्रमवारीच्या आधारे आपले स्थान मिळवले आहे. याव्यतिरिक्त, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडिज हे संघ आधीच पात्र ठरले आहेत. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, स्पर्धेतील उर्वरित सात जागांसाठी अद्याप चुरस बाकी आहे. युरोपीय पात्रता फेरीतून दोन संघ (५ ते ११ जुलै), आफ्रिकन पात्रता फेरीतून दोन संघ (१९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर) आणि आशियाई ईएपी पात्रता फेरीतून तीन संघ (१ ते १७ ऑक्टोबर) मुख्य स्पर्धेत दाखल होतील.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101